नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १९३ * * नागपूर * मंगळवार, दिनांक १४ ऑक्टोबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## कोल्ड्रिफ उत्पादक श्रीसन फार्मा बंद

■ वृत्तसंस्था, चेन्नई, दि. १३ :
तामिळनाडू सरकारने सोमवारी कोल्ड्रिफ कफ सिरप बनवणाऱ्या श्रीसन फार्मास्युटिकल्सचा उत्पादन परवाना पूर्णपणे रद्द केला आणि तो कायमचा बंद करण्याची घोषणा केली. श्रीसन फार्माच्या कारखान्यात सरकारला ३५० हून अधिक गंभीर दोष आढळून आले होते. अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) श्रीसन फार्मास्युटिकल्सशी संबंधित सात ठिकाणी छापे टाकले. कोल्ड्रिफ सिरप खाल्ल्याने मध्य प्रदेशात आतापर्यंत २५ मुलांचा मृत्यू झाला आहे. ईडी अधिकाऱ्यांनी एएनआय या वृत्तसंस्थेला सांगितले की, चेन्नई झोनल ऑफिसमधील पथके श्रीसन फार्माच्या परिसरात छापे टाकत आहेत.

अग्राग्रलेख

खरीखरी..

## श्रीमंत खासदार, गरीब मंत्री

भारतीय जनता पक्षाचे केरळ मधून निवडून आलेले एकमेव खासदार आणि मल्याळम मधील चित्रपटाचे अभिनेते सुरेश गोपी हे आहेत. अभिनेते असताना ते भरपूर श्रीमंत होते. खासदार असतानाही ते चांगलेच श्रीमंत होते असे तेच म्हणतात. त्यांना भारतीय जनता पक्षाने केंद्रीय मंत्रीपद प्रदान केलेले आहे. केंद्रीय मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर लगेचच त्यांना पर्यटन आणि पेट्रोलियम मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली. आता अलीकडेच त्यांनी असे वक्तव्य केले आहे की आपली मंत्री पदावर येण्याची एक टक्काही इच्छा नव्हती परंतु, पक्षाने आदेश दिल्यामुळे आपण मंत्रिपद स्वीकारले पर्यटन आणि पेट्रोलियम केंद्रीय मंत्रिपदाचा कारभार वाहणाऱ्या खासदारांचे हे वाक्य आहे. खरं पाहता ही दोन्ही खाती चांगलीच प्रवाही आहेत असे म्हणतात. या खात्यामध्ये मंत्रालयातील पेट्रोलचा प्रभाव कितीही गतिमान असला तरी दिवसेंदिवस आपण गरीब होत आहोत, अशी या सुरेश गोपी नामक अजब मंत्रिमहोदयांची गजब तक्रार आहे. अनेक खासदार मंत्री पदासाठी तुरुतुरु करून आपली मंत्रिपदाची गाडी पुढेपुढे करण्याचा प्रयत्न करतात हे आपण वारंवार पाहिलेले आहे. अशा स्थितीमध्ये हा गंगेचा प्रवाह, उलटा करा असे म्हणणारा हा मंत्री म्हणजे वाळवंटातील ओएसिस वाटते. या गोपी साहेबांना खासदार म्हणून केरळ मधील भारतीय जनता पक्षाची ध्वजा उंचच उंच फडकवावयाची आहे, भारतीय जनता पक्षाची निष्ठेने सेवा करताना त्यांच्या लोकप्रियतेमुळे ते निवडून आले असले आणि चक्क मंत्री झाले असले तरीही त्यांच्या मनात ही खंत आहे. आचार्य अत्रे यांनी १९६६ सालात मी मंत्री झालो अशा नावाचे एक नाटक लिहिले होते. मंत्री पदावर आरुढ होत असल्यास त्याचे किती फायदे होतात याचे विडंबनात्मक चित्रण या नाटकांमध्ये होते. पण मंत्री झाल्यावर आपण दिवसेंदिवस गरिबीच्या मार्गावर चाललो आहोत असे म्हणणारा अखिल भारतातील हा पहिला मंत्री असावा. दक्षिणात्य चित्रपट अभिनेते एकेका चित्रपटासाठी १०० कोटी रुपयांपासून ते ५०० ते ७०० कोटी रुपयांपर्यंत मानधन घेतात. मंत्रिपदावर आरूढ होताच अनेक मंत्रीगण वर्षभरात वेगवेगळ्या पद्धतीने बऱ्यापैकी कमाई करतात. अशी कमाई करता येते की नाही याचा शोध घेतल्यावर, असे दिसते की नामदारकीपेक्षा अभिनयाची कारकीर्द अधिक मुद्रा फलदायी आहे. त्या बिचाऱ्या गोपींना नको असताना मंत्रिपद मिळाले आणि मंत्रिपदाचे इतर दावेदार जे कोणी आहेत. त्यांचा त्यामुळे हिरमोड होत आहे ही मोठी कमालीचीच बाब आहे. भारताच्या राजकीय जीवनात असेही घडू शकते हे किती रोमहर्षक आहे याची कल्पनाच केलेली बरी. आता पक्षाचा आदेश म्हणून मंत्रीपदावर ठेवायचे असेल, तर त्यांना होणाऱ्या नुकसानीची भरपाई त्यांच्याच श्रीमंत पक्षाने केलीच पाहिजे. त्यांचा पक्ष नक्कीच श्रीमंत आहे तसेच त्यांना मंत्रिपदावरून बाजूला केल्यास दुसऱ्या एखाद्या खासदाराचे भले होऊ शकते. यामुळे या परोपकारी अभिनय सम्राटाला पदमुक्त करून एखाद्या दुसऱ्या नेत्याला मंत्रीपदाची जबाबदारी दिली म्हणजे बिचारे तेही खुश आणि ज्याला ते मंत्रिपद मिळेल तोही खुश. सध्या आपल्या देशात असलेले एनडीएचे सरकार यावर सकारात्मक विचार करेल, अशी आशा करायला काय हरकत आहे. ज्यांना इच्छा आहे त्या खासदारांची मनीषा पूर्ण केली तर त्यांना आनंद होईल. तसेच एखाद्या अभिनेत्याला गरिबीचे जीवन जगायला लागणार नाही आणि पक्षालाही त्याचा खूप फायदा होईल, बाकी निर्णय पक्षाचा!


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# आरएसएस देशभक्त संघटना

## फडणवीस यांची काँग्रेसवर टीका, स्थानिकच्या निवडणुकीत शक्य तिथे युती करण्याचे संकेत

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. १३ :
राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही एक सांस्कृतिक शक्ती व देशभक्त संघटना आहे. त्यामुळे या संघटनेवर बंदी घालण्याची मागणी करणाऱ्यांकडे आम्ही ढुंकूणही पाहत नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संघावर बंदी घालण्यासंबंधी काँग्रेसने केलेली मागणी धुडकावून लावली आहे.

केरळच्या तिरुवनंतपुरम येथील एका २६ वर्षीय अभियंत्याने ९ ऑक्टोबर रोजी आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली. तत्पूर्वी, एका सुसाईड नोटमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शिबिरात झालेल्या लैंगिक शोषणामुळे आपण हे टोकाचे पाऊल उचलत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचे सुपुत्र प्रियांक खरगे यांनी कर्नाटक सरकारकडे एका पत्राद्वारे संघावर बंदी घालण्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी वरील शब्दांत ही मागणी धुडकावून लावली आहे.



देवेंद्र फडणवीस म्हणाले, कर्नाटकचे नेते प्रियांक खरगे प्रसिद्धीसाठी असल्या गोष्टी करत असतात. त्यांना कोणताही आधार नाही. ते आपल्या वडिलांच्या भरवशावर राजकारण करणारे नेते आहेत. मी त्यांना एवढेच सांगू इच्छितो की, यापूर्वी अनेकदा संघावर बंदी घालण्याचा प्रयत्न झाला किंबहुना बंदीही घालण्यात आली. ज्या इंदिरा गांधींनी संघावर बंदी घातली, त्यांना सत्तेतून पायउतार व्हावे लागले. त्यामुळे संघ एक सांस्कृतिक शक्ती आहे. एक देशभक्त संघटना आहे. राष्ट्रीय विचारांनी प्रेरित मूल्याधिष्ठित अशा प्रकारच्या मानवनिर्मितीचे कार्य संघ करतो. त्यामुळे प्रसिद्धीसाठी पत्र लिहिणाऱ्यांकडे आम्ही ढुंकूणही पाहत नाही. युती करण्याचा मुद्दा आम्ही खालच्या पातळीवर सोडला आहे. पण जिथे शक्य आहे, तिथे युती केली पाहिजे अशा प्रकारचे निर्देश देण्यात आलेत. विशेषतः एखाद्या ठिकाणी युती झाली नाही तरी मित्र पक्षांवर टीका करू नये अशी सूचना करण्यात आली आहे. माज्या मते, महायुती म्हणून चांगले यश आमच्या तिन्ही पक्षांना मिळेल. काही कार्यकर्त्यांनी स्वबळावर निवडणूक लढवण्याचा आग्रह धरला आहे. पण अशी मागणी नेहमीच होत असते.

### भाजप निवडणुकांसाठी सज्ज

मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शक्य आहे तिथे महायुतीमधील मित्रपक्षांसोबत युती करण्याचे संकेत दिले. ते म्हणाले, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संपूर्ण महाराष्ट्रात विभागनिहाय आमचे दौरे लावलेत. राज्यात लवकरच महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपंचायतीच्या निवडणुका आहेत. या निवडणुकांचा आढावा घेण्यासाठी या बैठका लावण्यात आल्यात. आम्ही यापूर्वी मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण, पश्चिम महाराष्ट्र या 4 विभागांचा आढावा घेतला. आता अमरावती विभागाचा आढावा घेतला जात आहे. मुंबई विभागाचा आढावा पुढल्या आठवड्यात घेतला जाईल. एकूणच कार्यकर्त्यांची मानसिक तयारी चांगली आहे. निवडणुकीसाठी भाजप पूर्णपणे सज्ज आहे.

## दहावी-बारावी बोर्डाच्या परीक्षांच्या तारखा जाहीर

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. १३ :
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावी बोर्डाच्या फेब्रु-मार्च २०२६ मधील परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी करण्यासाठी आणि अभ्यासक्रमाचे योग्य नियोजन करता यावे, या हेतूने मंडळाने यंदाही परीक्षा दोन आठवडे आधी घेण्याचा निर्णय घेतला आहे.

यानुसार, राज्यभरातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा आयोजित केल्या जातील. मंडळाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, बारावी बोर्डाची लेखी परीक्षा मंगळवार, १० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार, १८ मार्च २०२६ या कालावधीत संपन्न होईल. दुसरीकडे, दहावी बोर्डाची लेखी परीक्षा शुक्रवार, २० फेब्रुवारी २०२६ ते बुधवार, १८ मार्च २०२६ या दरम्यान घेण्यात येईल.

## पश्चिम बंगालमधील स्टेशनवर चेंगराचेंगरी

■ वृत्तसंस्था,
कोलकाता, दि. १३ :
रविवारी संध्याकाळी बर्दवान रेल्वे स्थानकावर प्रवाशांनी ट्रेनमध्ये चढण्यासाठी गर्दी केली तेव्हा चेंगराचेंगरी झाली. स्टेशनच्या पायऱ्यांवर चेंगराचेंगरी झाल्याने किमान सात प्रवासी जखमी झाले. सर्व जखमींना तातडीने बर्दवान मेडिकल कॉलेज रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. बर्दवान स्थानकावर प्लॅटफॉर्म ४, ६ आणि ७ वर तीन गाड्या उभ्या होत्या. गाड्या पकडण्याच्या घाईत प्रवासी पायऱ्यांवरून खाली उतरू लागले. अरुंद पायऱ्यांमुळे गर्दी वाढली आणि धक्काबुक्की सुरू झाली.

## धुळ्यात मंकीपॉक्सचा महाराष्ट्रातील पहिला रुग्ण

■ महासागर प्रतिनिधी, धुळे, दि. १३ :
विदेशातून येथे आलेल्या एका व्यक्तीला मंकी पॉक्स (एमपॉक्स) हा संसर्गजन्य आजार झाला आहे. या आजाराचा हा राज्यातील पहिला रुग्ण असून संबंधिताचे दोन्ही अहवाल सकारात्मक आल्याने आरोग्य विभाग सतर्क झाला आहे. या रुग्णाला शहरातील हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या सर्वोपचार रुग्णालयात स्वतंत्र विलगीकरण कक्षात ठेवण्यात आल्याची माहिती अधिष्ठाता डॉ. सयाजी भामरे यांनी दिली.



शहरातील ४४ वर्षांची ही व्यक्ती दोन ऑक्टोबर रोजी सौदी अरेबियाहून आली होती. चार वर्षांपासून संबंधित सौदी अरेबियात वास्तव्यास आहे. मुलीचे लग्न असल्याने तो धुळ्यात आला.शहरात आल्यावर त्याला त्वचेचा त्रास जाणवू लागला. त्यामुळे तीन ऑक्टोबर रोजी हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयात तो दाखल झाला. त्याला संसर्गजन्य आजार असल्याचे लक्षात येताच त्याच्या रक्ताचे नमुने घेण्यात आले.

दोन वेळा त्याचे रक्ताचे नमुने पुणे येथील राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले. दोन्ही अहवाल सकारात्मक आले. त्यामुळे राज्यातील हा मंकी पॉक्सचा पहिला रुग्ण असल्याचे राष्ट्रीय विज्ञान संस्थेने हिरे शासकीय रुग्णालयाला कळविले आहे. त्यामुळे संपूर्ण रुग्णालय प्रशासन सतर्क झाले आहे. सदर रुग्णाला विलगीकरण कक्षात ठेवण्यात आले आहे.

## राज्य पातळीवर बोलताना जातिवाचक बोलू नका शरद पवारांच्या कार्यकर्त्यांना सूचना

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. १३ :
महाराष्ट्रात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असून त्यानुसार सर्वच राजकीय पक्षांनी तयारी सुरु केली आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीत राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या ५० टक्के तरुणांना संधी देणार असल्याचे शरद पवारांनी जाहीर केले आहे. तसेच यावेळी धर्मनिरपेक्षता जपण्याचे आवाहनही शरद पवारांनी सर्वच पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले आहे.



बैठकीत बोलताना शरद पवार यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांच्या वादग्रस्त विधानाचा निषेध केला आहे. ते म्हणाले, पूर्वी आपल्या पक्षात असणारे एक आमदार सध्या जाती-जातीत तणाव निर्माण होईल अशा प्रकारची वक्तव्ये करत आहेत, हे अत्यंत चुकीचे आहे. जातीय सलोखा ठेवा, स्थानिक पातळीवर, राज्य पातळीवर बोलत असताना जातिवाचक बोलू नका, बोलताना प्रेमाची भाषा वापरा, आपण करत असलेल्या विधानामुळे जातीय सलोखा बिघडणार नाही याची काळजी घ्या, अशा सूचना शरद पवार यांनी दिल्या आहेत.

पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, राजकारणात जाती धर्मावर राजकारण करण्याची महाराष्ट्राची परंपरा नाही. लोकांच्या लोकप्रियतेपेक्षा ते जास्त महत्वाचे आहे. वाचाळवीर वाढले आहेत, दुदैव आहे कोणी कोणाकडून काय खरेदी करावे यावर सरकार गप्प बसते? सरकारचा त्याला पाठिंबा आहे का? दरी निर्माण केली जात असल्याचे देखील पवार म्हणाले.

राजकारणात तरुणांना संधी देण्याबाबत बोलताना शरद पवार म्हणाले, जास्तीत जास्त तरुणांना संधी कशा प्रकारे देता येतील यासाठी प्रयत्न करा. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत आगामी काळात कशा प्रकारे युती करायची याबाबत महाविकास आघाडीच्या नेत्यांची उद्या बैठक पार पडणार असल्याची देखील माहिती बैठकीत देण्यात आली. येत्या आठवडाभरात स्थानिक पातळीवरील आघाडीबाबत निर्णय करा, अशा सूचनाही शरद पवारांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. तसेच आपल्याकडे इच्छुकांची संख्या खूप आहे, काम करणाऱ्यांची संख्या खूप आहे. आज अल्पसंख्यांक समाजाचा निर्णय घेतला असेच युवक आणि युवतींचा निर्णय होणार असल्याचे शरद पवारांनी सांगितले.

## एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी होणार गोड

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :
राज्यभरातील ८५ हजार पेक्षा अधिक एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे. एसटी कर्मचाऱ्यांना प्रत्येकी ६ हजार रुपयांची दिवाळी भेट अर्थात सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. तसेच पात्र कर्मचाऱ्यांना दिवाळी अग्रिम १२५०० रुपयांची सण उचल देखील मिळणार आहे. इतकेच नव्हे तर वेतन वाढीचा फरक वेतनासोबत देण्यासाठी महामंडळाला दरमहा ६५ कोटी रुपये देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केला आहे.

एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी ऐन दिवाळीच्या तोंडावर अनेक प्रलंबित मागण्यांसाठी 'चक्का जाम' आंदोलनाची घोषणा केली होती, ज्यामुळे प्रवाशांना मोठा मनस्ताप होण्याची शक्यता होती. मात्र, आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीनंतर एसटी कर्मचाऱ्यांना ६०० रुपये दिवाळी भेट आणि १२,५०० रुपयांची उचल देण्याचा महत्त्वाचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. एवढेच नाही, तर कर्मचाऱ्यांच्या वेतनातील फरक म्हणून सरासरी ७,५०० रुपयांचा वेतनवाढ फरक हप्ता दर महिन्याला देण्याचेही मान्य करण्यात आले आहे. या निर्णयासाठी राज्य सरकार एसटी महामंडळाला दरमहा ६५ कोटी रुपये देणार असून, यामुळे एसटी कर्मचाऱ्यांची यंदाची दिवाळी गोड होणार आहे.



### कर्मचाऱ्यांना ६ हजार रुपये सानुग्रह अनुदान

एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या महाराष्ट्र कामगार संघटना संयुक्त कृती समितीमधील १६ संघटना आणि महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेस या संघटनांनी सोमवार, १३ ऑक्टोबर २०२५ पासून चक्का जाम आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र, आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक पार पडली. या बैठकीत बहुतांशी मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन सरकारकडून मिळाल्यानंतर, संघटनांनी १३ ऑक्टोबरच्या रात्रीपासून सुरू होणारे चक्का जाम आंदोलन मागे घेतल्याचे जाहीर केले आहे.

२०१८ पासून एसटी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता फरक देण्यात आलेला नाही. सन २०२० ते २०२४ या कालावधीतील वेतनवाढ फरकाची रक्कम थकीत आहे. याशिवाय इतर अनेक रक्कमा थकीत आहेत. एसटी कर्मचाऱ्यांची एकूण ४००० कोटी रुपयांपेक्षा जास्त थकीत रक्कम मिळालेली नाहीत. थकीत रक्कम कर्मचाऱ्यांना मिळण्यासाठी एक वेळचा पर्याय म्हणून सरकारने ही रक्कम एसटीला दिली पाहिजे, अशी मागणीही कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे.




## विरोधी पक्षासाठी निकष, मग उपमुख्यमंत्री पदे वैधानिक कशी?



उद्धव ठाकरे यांचा सरकारला सवाल

**छत्रपती संभाजीनगर** : एवढं मजबूत सरकार कधीच नव्हतं. तरीही विरोधी पक्ष नेते पदासाठी संख्याबळ, कायदे, नियम सांगितले जातात. जर कायदेच पाळायचे असतील तर राज्यात नेमण्यात आलेले दोन उपमुख्यमंत्री पदे संसदीय आहेत काय, असा सवाल करत उद्धव ठाकरे यांनी विरोधी पक्ष नेतेपदाचा प्रश्न हंबरडा मोर्चातून उपस्थित केला.या पदाला नाही म्हटले तरी अधिकार असतात. यंत्रणेला विचारता येते. पण हे करु द्यायचे नाही. ते दोन हाफ उपमुख्यमंत्री पदे संविधानाला धरुन आहेत काय, असा सवाल ठाकरे यांनी उपस्थित केला. विरोधी पक्ष नेते पद मिळाले नाही तरी काही बिघडत नाही. दिवाळीपर्यंत पॅकेजची अंमलबजावणी झाली नाही, हे तपासू. जे अधिकारी ऐकत नसतील, त्यांना आसूड दाखवा असे म्हणत ठाकरे यांनी राज्याच्या विरोधी पक्ष नेते पदाचा विषय चर्चेत आणला. शेतकऱ्यांच्या मोर्चात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही टीका केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी मुंबईत येऊन गेले. त्यांची दोन -तीन भाषणे झाली म्हणे. पण एकाही ठिकाणीच्या भाषणात त्यांच्या शेतकऱ्यांचा उल्लेख होता का, ज्या महाराष्ट्रात आपण जातो आहोत त्या राज्याची परिस्थिती काय आहे, हे त्यांना माहिती नसते?, त्यांच्याकडून आपण काय मागणार आणि आपण काय मागणार, असे ठाकरे म्हणाले. एका अटीवर पॅकेजचे समर्थन करायलाही तयार आहे. जर मनरेगातून साडेतीन लाख रुपयांपर्यंतचे काम केले जाणार असेल तर दिवाळीपूर्वी त्याच्या खात्यात एक लाख रुपये टाका. मग पुढचे पुढे पाहू, असेही ठाकरे म्हणाले.

## हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशनच्या अमृतमहोत्सवानिमित्त
# दोन दिवसीय रिजनल कन्व्हेंशन



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १३ :**
हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया (एचआरएडब्ल्यूआय) च्या अमृतमहोत्सवानिमित्त २०वे रिजनल कन्व्हेंशन ताज लँड्स एंड, वांद्रे येथे पार पडले. दोन दिवसीय रिजनल कन्व्हेंशन पर्यटन क्षेत्राला चालना देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरले. दोन दिवसीय रिजनल कन्व्हेंशनमध्ये पर्यटनाच्या दृष्टीने अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा झाली.

या कन्व्हेन्शन कार्यक्रमाला पर्यटन क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून, पर्यटनाला अधिक चालना मिळावी या दृष्टीने महत्त्वाचे मुद्दे मांडले. महाराष्ट्राच्या पर्यटन क्षेत्राला जागतिक ओळख मिळण्यासाठी कन्व्हेंशनमध्ये झालेला संवाद मोलाचा ठरला.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे म्हणाले, पर्यटन क्षेत्राला अधिक चालना मिळावी म्हणून महाराष्ट्र पर्यटन एका नव्या पर्वाची सुरुवात करत आहे.

नुकताच युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांचा समावेश करण्यात आला आहे. या स्थळांना पर्यटनाच्या दृष्टीने जागतिक दर्जा मिळावा, म्हणून आम्ही आदरातिथ्य क्षेत्राला आमच्याबरोबर काम करण्याचे आमंत्रण देत आहोत.

महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल यांनी सांगितले की, ब्ल्यू फ्लॅग समुद्रकिनाऱ्यांच्या यादीमध्ये महाराष्ट्रातील पाच समुद्र किनाऱ्यांचा, यात डहाणूमधील पारनाका, रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन व नागाव, तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर व लाडघर यांचा समावेश झाला आहे. सिंधुदुर्गमध्ये पाण्याखालील पर्यटन प्रकल्पाचेही अनावरण करण्यात आले आहे. निवृत्त युद्धनौका आयएनएस गुलदारचे पाण्याखाली संग्रहालय आणि कृत्रिम बेट तयार करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

या रिजनल कन्व्हेंशनमध्ये पर्यटन संचालनालयाच्या वतीनेसहाय्यक संचालक सुशील पवार, व विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सहभाग घेतला.

एच.आर.ए.डब्ल्यू.आय अध्यक्ष जिमी शॉ यांनी सांगितले की, १९५१ मध्ये असोसिएशनची स्थापना झाली. असोसिएशनने पश्चिम भारतात आपले स्थान अधिक बळकट केले. या ७५व्या वर्धापनदिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने पर्यटन उद्योगाला अधिक चालना आणि बळकटपणा देण्यासाठी प्रयत्न करू. यावेळी अभिनेते व दिग्दर्शक बोमन ईराणी यांनी असोसिएशनच्या माजी अध्यक्षांना पुरस्कार प्रदान करून त्यांचा सन्मान केला.

## एकनाथ शिंदेंनी सुरू केलेल्या आठ योजना फडणवीस सरकारकडून बंद

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १३ :**
लाडकी बहीण योजनेमुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर ताण येत असून अनेक विभागांचा निधी महिला व बालविकास मंत्रालयाकडे वळवल्याचा दावा अनेकदा सरकारमधील मंत्र्यांनीच केला आहे. सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी यावरून सरकारवर जाहीर नाराजी देखील व्यक्त केली होती. अशातच गोरगरिबांसाठी व शेतकऱ्यांसाठी राज्यातील महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीआधी चालू केलेल्या अनेक योजना बंद असल्याची तक्रार सातत्याने ऐकायला मिळत आहे.

निधीअभावी अनेक योजना रखडलेल्या असताना विद्यमान उपमुख्यमंत्री व माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची महत्त्वकांक्षी आनंदाचा शिधा योजना बंद केल्यामुळे विरोधक सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करत आहेत. दरम्यान, शिवसेनेचे (उबाठा) नेते अंबादास दानवे यांनी अशा आठ योजनांची यादी जाहीर केली आहे ज्या एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना सरकारने चालू केल्या होत्या. मात्र, या योजना आता बंद करण्यात आल्या आहेत असा दावा दानवे यांनी केला आहे. तर, एकनाथ शिंदेंना चिमटा काढला आहे.

दानवे यांनी एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की सामान्यांना कणभर लाभाची अपेक्षा असलेल्या योजना बंद करून देवेंद्र फडणवीस सरकारने आपल्याच सहकाऱ्यांच्या निर्णयांवर फुल्या मारल्या आहेत.

**या योजना बंद**
* आनंदाचा शिधा योजना
* माझी सुंदर शाळा योजना
* १ रुपयात पीकविमा योजना
* स्वच्छता मॉनिटर योजना
* १ राज्य १ गणवेश योजना
* लाडक्या भावाला अपरेन्टीसशिप
* योजनादूत योजना
* मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना बंद

## दीपक ठाकूर हिंदुजा रिन्यूएबल्स एनर्जीचे नवे संचालक



**मुंबई:** हिंदुजा ग्रुपचा एक भाग असलेल्या हिंदुजा रिन्यूएबल्स एनर्जी प्रायव्हेट लिमिटेडने दीपक ठाकूर यांची व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून 1 ऑक्टोबर 2025 पासून नियुक्ती केली आहे. त्यांना अक्षय ऊर्जा, पायाभूत सुविधा, औद्योगिक उत्पादने आणि इलेक्ट्रॉनिक्स या क्षेत्रांमध्ये तीन दशकांहून अधिक काळ वैविध्यपूर्ण कामाचा अनुभव आहे. दीपक यांनी महिंद्रा ग्रुप, रिलायन्स, स्टर्लिंग अँड विल्सन, एल अँड टी, हनीवेल आणि थर्मॅक्स या अनेक संस्थांमध्ये नेतृत्वाच्या भूमिका सांभाळल्या आहेत. त्यांचा अनुभव सौर, पवन, स्टोरेज आणि हायब्रिड प्रणालींमध्ये प्रकल्प विकास, अप्स्ट्रीम तंत्रज्ञान, उत्पादन आणि मालमत्ता पुनर्वापर या सर्व अक्षय ऊर्जा मूल्य साखळीमध्ये विस्तारलेला आहे. ते सुमित पांडे यांचे उत्तराधिकारी असून त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे .दीपक यांच्या नियुक्तीवर भाष्य करताना अध्यक्ष शोम हिंदुजा म्हणाले, अक्षय ऊर्जा क्षेत्रात आघाडीची कंपनी होण्याच्या आमच्या आकांक्षेवर आम्ही काम करत असताना दीपक यांचा अनुभव आणि नेतृत्व आमच्या आगामी प्रवासात महत्त्वपूर्ण ठरेल. मंडळावर दीपक आमच्यासोबत असल्याचा आम्हाला आनंद आहे आणि हिंदुजा रिन्यूएबल्स एकत्रितपणे उभारण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत. तसेच मी सुमित यांचे हिंदुजा रिन्यूएबल्ससाठीच्या मूलभूत योगदानाबद्दल आभार मानतो आणि त्यांच्या भविष्यासाठी शुभेच्छा देतो

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धात्मक अभियान राबविण्याची कार्यवाही सुरू

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :**
मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धात्मक अभियानास दोन वर्षात मोठा प्रतिसाद लाभला आहे. २०२५-२६ मध्ये हे अभियान राबविण्यासाठी ८६.७३ कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली असून सुधारित निकष आणि नवीन उपक्रमांसह या अभियानाचा तिसरा टप्पा राबविण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरू असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली.

२०२५-२६ या वर्षाकरिता मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान राबविताना या अभियानाच्या निकषांमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. यावर्षीही अभियानासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. २०२५-२६ या वर्षामध्ये सदर अभियान सुधारित निकषांसह राबविण्याच्या अनुषंगाने सर्व संचालकांशी समन्वय साधून सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत आयुक्त (शिक्षण) यांना कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने २०२५-२६ या वर्षाकरिता मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-३ अभियान राबविण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त (शिक्षण) यांच्यामार्फत २९ ऑगस्ट २०२५ रोजी शासनास प्राप्त झाला आहे. या प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून हे अभियान नवीन उपक्रमांसह राज्यभरात राबविण्यात येणार आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या ३० नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयान्वये २०२३-२४ मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे स्पर्धात्मक अभियान राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांकरिता १ जानेवारी २०२४ ते १५ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत राबविण्यात आले. या अभियानास विद्यार्थी व शिक्षकांबरोबरच माजी विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमी नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. ९५ टक्के शाळांमधील सुमारे दोन कोटी विद्यार्थी या अभियानांतर्गत विविध उपक्रमात सहभागी झाले होते. या अभियानातील काही उपक्रमांची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये देखील झाली आहे. २०२४-२५ मध्ये देखील मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२ हे स्पर्धात्मक अभियान काही नवनवीन उपक्रमांसह २६ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये २९ जुलै २०२४ ते १५ सप्टेंबर २०२४ या कालावधीत राबविण्यात आले. १८ नोव्हेंबर २०२४ व ९ जानेवारी २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये पारितोषिकाची ७३.८२ कोटींची रक्कम वितरीत करण्यात आली आहे. सदर अभियानास २०२३-२४ प्रमाणेच मोठा प्रतिसाद मिळाला.

आता २०२५-२६ या वर्षाकरिता मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे स्पर्धात्मक अभियान राबविण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून सदर अभियान नवीन उपक्रमांसह राज्यभरात राबविण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

## शरद पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसची रणनीती बैठक
### आगामी निवडणुकीसाठी गडद तयारी

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १३ :**
स्थानिक स्वराज्य संस्था आणि पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीची रणनिती ठरवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने आज महत्त्वपूर्ण बैठक घेतली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित या बैठकीत पक्षाच्या आगामी योजना आणि संघटनात्मक तयारीवर सखोल चर्चा झाली.

पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली, परभणी, नांदेड, बीड, धाराशिव आणि लातूर यांसह विविध जिल्ह्यांतील खासदार आणि आमदारांनी उपस्थिती लावली. पक्षाच्या फ्रंटल सेलच्या राज्यप्रमुख व प्रदेश पदाधिकाऱ्यांनी पक्षाच्या रणनीतीत आवश्यक त्या सूचना मांडल्या.
बैठकीत पक्षाचे प्रदेश अध्यक्ष, विधीमंडळ



पक्षनेते, माजी मंत्री, प्रदेश सरचिटणीस व अन्य वरिष्ठ नेते सहभागी होते. पक्षाच्या प्रत्येक विभागाला आगामी निवडणुकीसाठी बांधणी आणि भूमिकांचे निर्देश देण्यात आले.

या बैठकीचा उद्देश आगामी निवडणुकीत राज्यभरात संघटनात्मक ताकद वाढवणे आणि रणनीती ठरवणे हा होता. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी प्रत्येक जिल्ह्यातील परिस्थितीची माहिती दिली आणि यासाठी स्थानिक सेल आणि पदाधिकारी सक्रिय होण्याचे आदेश दिले.

अशा प्रकारे, शरद पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसने आगामी निवडणुकीसाठी रणनितीची तयारी सखोल आणि व्यापक पातळीवर सुरु केली आहे.

## ठाकरे बंधूंच्या युतीचा काडीचा फायदा नाही : प्रवीण दरेकर



**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या संभाव्य युतीचा भाजपसह आगामी निवडणुकांवर कोणताही परिणाम होणार नसल्याचा दावा भाजप नेते तथा आमदार प्रवीण दरेकर यांनी केला आहे. त्यांच्या या विधानाची राज्याच्या राजकीय वतुर्ळात खमंग चर्चा रंगली आहे.राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा फड रंगणार आहे. यात मुंबई महापालिकेच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राज व उद्धव ठाकरे मराठीच्या मुद्यावर एकत्र आल्यामुळे मुंबई महापालिकेत ठाकरे गट व मनसेचाच वरचष्मा राहील असा दावा केला जात आहे. पण भाजपने हा दावा फेटाळून लावला आहे. भाजप आमदार प्रवीण दरेकर यांनी सोमवारी याविषयी बोलताना ठाकरे बंधूंच्या भेटीगाठीचा आगामी निवडणुकीवर कोणताही परिणाम होणार नसल्याचा ठाम विश्वास व्यक्त केला. प्रवीण दरेकर म्हणाले, ठाकरे बंधूंच्या भेटीचा आगामी निवडणुकांवर कोणताही परिणाम होणार नाही. याचे मुख्य कारण म्हणजे विधानसभा निवडणुकीत जनतेने महायुतीला स्पष्ट कौल दिला. मुंबईत महायुतीचे आमदार मोठ्या प्रमाणात निवडून आलेत.

## शेती हा केवळ व्यवसाय नाही तर आपल्या संस्कृतीचा श्वास : कृषिमंत्री भरणे



■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि. १३ :**
कृषी पदवीधरांनी केवळ शासकीय नोकरीच्या मागे न लागता शास्त्रीय पद्धतीने शेती करून समाजात स्वतःचे उदाहरण निर्माण करावे, असे आवाहन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. शेती हा केवळ व्यवसाय नसून आपल्या संस्कृतीचा श्वास आहे, तो जिवंत ठेवणे हे आपले आद्य कर्तव्य आहे, असे ते म्हणाले. 'ॲग्रीकॉस दिवाळी अंक २०२५' च्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. पुणे जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेच्या मुख्य कार्यालयात हा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, यशदाचे अतिरिक्त महासंचालक डॉ. शेखर गायकवाड, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुगाडे, उपाध्यक्ष सुनील चांदेरे, ॲग्रीकॉस दिवाळी अंक संपादक मंडळाचे सदस्य, विद्यार्थी आणि कृषी विद्यापीठांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

कृषीमंत्री भरणे यांनी यावेळी राज्यातील शेतकऱ्यांच्या स्थितीवरही भाष्य केले. अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्याने आज राज्यभरातील शेतकरी खचला आहे. त्याला पुन्हा उभे करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी एकतीस हजार सहाशे कोटी रुपयांचे विशेष पॅकेज जाहीर केले आहे. शेतकऱ्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी कृषी विभागामार्फत ५० हून अधिक नवीन योजना राबविण्यात येत आहेत. या संकटाच्या काळात कृषी पदवीधरांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे, असे त्यांनी सांगितले. 'ॲग्रीकॉस दिवाळी अंक २०२५' हा ॲग्रीकॉस आणि विनोद या विषयावर आधारित असून, शेती, ग्रामीण जीवन, नवकल्पना आणि विनोदी लेखन यांचा समतोल साधणारा आहे.

## आष्टीत बिबट्याच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी, बीड, दि. १३ :**
आष्टी तालुक्यातील बावी दरेवाडी येथे एका शेतकऱ्याचा मृतदेह सोमवारी सकाळी छिन्नविछिन्न अवस्थेत व काही अवयव गायब असलेल्या अवस्थेत आढळून आला. बिबट्याने हल्ला केल्यानेच शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे असून, वनविभागाकडून अधिकृत माहिती मिळू शकली नसली तरी घटनास्थळाचा पंचनामा सुरू असल्याचे सांगण्यात आले. या घटनेने मात्र आष्टी तालुक्यात भीतीचे वातावरण पसरले.

राजू विश्वनाथ गोल्हार (वय ३५) असे मृत शेतकऱ्याचे नाव असून, त्यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी आष्टीच्या शासकीय ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे. राजू गोल्हार हे रविवार गुरे चारण्यासाठी गावानजीकच्या शेतशिवारात गेले होते. सायंकाळी गुरे परतली. पण शेतकरी राजू गोल्हार घरी काही परतले नाहीत. त्यांचा शोध कुटुंबियांकडून सुरू होता. अखेर त्यांचा मृतदेह शेतापासून दूर दोन किमी अंतरावर आढळला असून त्यांच्या शरीराचे हात-पाय असे काही अवयव आढळून आले नाहीत. शिवाय उर्वरीत मृतदेहावर अनेक ठिकाणी हल्ल्यांच्या खाणा-खुणा असून, हा प्रकार बिबट्यानेच केलेल्या हल्ल्याचा असल्याचा अंदाज ग्रामस्थांमधून वर्तविण्यात येत आहे. दरम्यान या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून वन विभागाच्या पथकाला देखील पाचारण करण्यात आले आहे. पंचनामा सुरू होता. तर शवविच्छेदनाच्या अहवालानंतरच राजू गोल्हार यांचा मृत्यू बिबट्याच्या हल्ल्यात झाला की अन्य काही कारण आहे, हे स्पष्ट होईल.

## आमदाराला हनीट्रॅपमध्ये अडवण्याचा प्रयत्न
### महिला असल्याचे भासवून नग्न फोटो पाठवणारा अटकेत

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. १३ :**
पुरुष असूनही महिला असल्याचे भासवून राज्यातील एका आमदाराला हनीट्रॅपमध्ये अडकवण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका भामट्याला चितळसर पोलिसांनी कोल्हापूर येथून अटक केली आहे. हा भामटा पीडित आमदाराला महिलांचे नग्न फोटो पाठवून 10 लाख रुपयांची खंडणी मागत होता. पण हा प्रकार आपले राजकीय आयुष्य उद्धवस्त करणारा असल्याचे लक्षात येताच आमदाराने पोलिसांत धाव घेऊन आपबीती कथन केली. परिणामी, वेळीच या प्रकरणाचा भांडाफोड झाला.

मोहन पवार (26) असे आरोपीचे नाव आहे. तो महिला असल्याचे भासवून समोरच्या व्यक्तीशी चॅट करत असे. आमदार महोदयांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ते 2024 मध्ये विधानसभा मतदारसंघात असताना त्यांच्या व्हॉट्सॲप क्रमांकावरून एक महिला त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत होती. सुरुवातीला त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. पण वारंवार संपर्क होत असल्यामुळे एकदा त्यांनी फोन उचलला. त्यावेळी महिलेने त्यांच्याशी मैत्री करण्याची इच्छा प्रकट केली. त्यांनी तिला नकार दिला. पण त्यानंतरही ती महिला वारंवार त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करू लागली. अखेर त्यांनी तिला ब्लॉक केले.

त्यानंतर 2024 मध्ये आमदार विधानसभा निवडणुकीच्या आखाड्यात उतरलेत. त्यावेळी सदर महिलेने दुसऱ्या एका मोबाईल क्रमांकावरून त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.

## काँग्रेसची ठाकरेंसोबत जाण्यास नकारघंटा
### महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याची इच्छा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :**
काँग्रेसच्या मुंबईतील नेत्यांनी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत ठाकरे बंधूंसोबत न लढवता स्वबळावर लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. काँग्रेसने ही निवडणूक ठाकरे बंधूंसोबत मिळून लढली तर त्याचा फायदा केवळ ठाकरेंना होईल. त्यामुळे काँग्रेसने ही निवडणूक स्वबळावर लढावी, असे या नेत्यांनी म्हटले आहे. आता काँग्रेस या प्रकरणी कोणता निर्णय घेते हे पाहणे लक्षणीय ठरणार आहे.

राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा फड रंगणार आहे. यात मुंबई महापालिकेच्या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसची सोमवारी सांताक्रूझच्या गॅलेक्सी हॉटेलमध्ये एक बैठक पार पडली. या बैठकीला काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, मुंबई अध्यक्षा वर्षा गायकवाड, भाई जगताप आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत मुंबई महापालिकेच्या निवडणुकीची रणनीती ठरवण्यात आली. त्यात प्रामुख्याने एकला चलो रे च्या भूमिकेवर विचारमंथन करण्यात आले.

यासंबंधीच्या माहितीनुसार, प्रस्तुत बैठकीत राज व उद्धव ठाकरे यांच्या संभाव्य युतीवरही सल्लामसलत करण्यात आली. त्यात राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला महाविकास आघाडीत घेण्यास कोणतीही तडजोड न करण्याचा निर्णय घेण्यात



आला. विशेषतः या प्रकरणी काँग्रेसच्या दिल्लीतील हायकमांडशी अनुकूल चर्चा सुरू आहे. पण राज्यातील नेते मनसेसोबत जाण्यास फारसे अनुकूल नसल्याचे आज स्पष्ट झाले आहे. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या मतदारांचा शिवसेनेच्या ठाकरे गटाला फायदा होतो. पण त्यांची मते काँग्रेसकडे ट्रान्सफर होत नाहीत.

त्यामुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत काँग्रेसने ठाकरे बंधूंसोबत युती केली किंवा ही निवडणूक महाविकास आघाडी म्हणून लढवली तर त्याचा फटका काँग्रेसला बसेल आणि फायदा ठाकरेंना होईल, असा सूर या नेत्यांनी आळवला. काँग्रेसने मुंबईत कोणत्याही जागेवर मैत्रिपूर्ण लढत लढू नये. ही निवडणूक पूर्ण ताकदीने लढावी, असा सल्लाही या नेत्यांनी पक्षश्रेष्ठींना दिला. त्यामुळे काँग्रेस आगामी काळात मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत कोणता निर्णय घेते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## घाटकोपरमधील गोल्ड क्रेस्ट इमारतीला आग

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १३ :**
मुंबईमधील घाटकोपर येथील गोल्डक्रेस्ट नावाच्या एका व्यावसायिक इमारतीला आग लागल्याची घटना समोर आली आहे. आगीची माहिती मिळताच मुंबई अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झालं आहे. अग्निशमन दलाच्या जवानांकडून आग विझवण्याचे प्रयत्न चालू आहेत. दरम्यान, काही लोक इमारतीत अडकल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे अग्निशमन दलाची चिंता वाढली आहे.

घाटकोपर पश्चिमेकडील गोल्ड क्रेस्ट बिझनेस पार्क या व्यावसायिक इमारतीच्या तळमजल्यावर आग लागली आहे. आगीचे लोळ इमारच्या वरपर्यंत दिसत असून अग्निशन दलाकडून आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न चालू आहेत. फायर अलार्म वाजताच या इमारतीत काम करणारे अनेकजण इमारतीतून बाहेर पडले. तर काही जणांना अग्निशमन दलाने बाहेर काढलं. अजूनही अग्निशमन दल वेगवेगळ्या मजल्यावरील खिडक्यांना शिडी लावून त्या शिडीद्वारे अनेकांना बाहेर काढत आहेत. गोल्ड क्रेस्ट ही पूर्णपणे व्यावसायिक इमारत आहे. या इमारतीत अनेक कंपन्यांची कार्यालयं आहेत. अग्निशमन दलाचे जवान आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करत असून लवकरात लवकर आगीवर नियंत्रण मिळवणं गरजेचं आहे.

# टॅक्सी सेवेसाठी १५ नोव्हेंबरपर्यंत मुदत

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १३ :**
वसई - विरार महानगरपालिका क्षेत्रात १५ नोव्हेंबरपर्यंत टॅक्सी, रिक्षा चालकांना मीटरवर आधारित सेवा सुरू करण्यासाठी मुदत देण्यात येत आहे. या क्षेत्रात मीटरवर आधारित टॅक्सी, रिक्षा सेवा १५ नोव्हेंबरपासून सुरू करावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. मंत्रालयात वसई - विरार महापालिका क्षेत्रातील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत आयोजित बैठकीत मंत्री प्रताप सरनाईक बोलत होते.

बैठकीस आमदार स्नेहा दुबे, एस.टी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, वसई - विरार महानगरपालिका आयुक्त मनोज सूर्यवंशी, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर आदी उपस्थित होते .

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, वसई - विरार महानगरपालिका क्षेत्रात शेअर टॅक्सी सेवेला परवानगी आहे. टॅक्सी, रिक्षा चालकांनी प्रवाशांची लुबाडणूक करू नये, प्रवाशांच्या तक्रारी आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. वसई - विरार महानगरपालिका क्षेत्रातून महामंडळाने ठाणे,




### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

कल्याण मार्गावर लांब पल्ल्याची बस सेवा सुरू करावी. प्रवाशी संख्या लक्षात घेता शहर बस वाहतूक पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावी. महापालिका क्षेत्रात असलेल्या महामंडळाच्या जागांचा पार्किंग जागांसाठी उपयोग करावा, यासाठी जागा लागल्यास महानगरपालिकेने जागेचे नियोजन करावे, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. वसई - विरार महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या विरार, वसई, नालासोपारा येथे बस डेपो सुरू करावेत. नागरिकांना परिवहन सेवा सुलभरित्या मिळावी, याबाबत महानगरपालिकेने कार्यपद्धती ठरवून अंमलबजावणी करावी, असे निर्देशही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

# ग्रामीण भागात देखील रोजगार मेळावे आयोजित करावेत : अंजली आंबेडकर

■ महासागर प्रतिनिधी
**अकोला, दि. १३ :**

ग्रामीण भागातही रोजगार मेळाव्याचे आयोजन करणे आवश्यक आहे, असे मत वंचित बहुजन आघाडीच्या नेत्या प्रा. अंजली आंबेडकर यांनी व्यक्त केले. त्या भारतीय बौद्ध महासभा, तिष्णगत मल्टिपर्पज वेल्फेअर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रोजगार व करियर मार्गदर्शन मेळाव्यात बोलत होत्या. या मेळाव्यात विविध कंपन्यांमध्ये एकूण २१५ उमेदवारांनी रोजगारासाठी आपल्या नावाची नोंदणी केलेली आहे.




इंद्रप्रस्थ टॉवर येथे झालेल्या मेळाव्यात बौद्ध महासभेचे अध्यक्ष पी. जे. वानखडे, प्रा. स्वप्निल बोरकर व डॉ. धर्मेंद्र राऊत, अरुण खिरडकर, विष्णुदास मोंडोकार उपस्थित होते. ग्रामीण भागातही अशा मेळाव्याचे आयोजन करण्यात यावे असे प्रा. आंबेडकर म्हणाल्या. यासाठी जिल्हा परिषद सुद्धा सहकार्य करण्यास तयार राहील असेही त्यांनी नमूद केले.

सूत्रसंचालन दीपा बाहेकर यांनी केले. प्रास्ताविक संजय गवई तर आभार राजेश दारोकार यांनी मानले. यावेळी बौद्ध महासभेचे पदाधिकारी, तीष्णगत मल्टिपर्पज वेल्फेअर सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांसह नरेश मूर्ती, पी. बी. भातकुले, देवानंद डोंगरे, किरण पळसपगार, एकनाथ वानखडे, मनोज गवई, शशिकांत गायकवाड, डॉ. गजानन इंगळे, इंजिनिअर विनोद खंडारे, डॉ. मुकुंद तायडे, प्रा. प्रकाश बोरकर, अनिता सिरसाट, सेवानंद तायडे, कुणाल दारोकार, शुद्धोधन गवई, बाळकृष्ण बोदडे ,अमनकिर्ती गवई, प्रणित गवई, नीलेश देव, सिद्धार्थ गवई, श्वेता सिरसाट होत्या.

# विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात रासायनिक सोसायटी 'एक्यम' चे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. १३ :**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागाच्यावतीने एकदिवसीय विद्यापीठस्तरीय कार्यशाळा व रासायनिक सोसायटी 'एक्यम-२०२५-२६'चे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी व वक्ते म्हणून रिसर्च अ‍ॅन्ड डेव्हलपमेंट अ‍ॅन्ड ग्लोबल सी.आर.ओ., आलम्पसब लॅब प्रा.लि. चे संचालक डॉ. गिरीश हतनापुरे, डॉ. अविनाश रामटेके, रिसर्च अ‍ॅन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशनच्या संचालक डॉ. स्वाती शेरकर, विभागप्रमुख डॉ. प्रशांत गावंडे, डॉ. मनिषा कोडापे, डॉ. जागृती बारब्दे उपस्थित होते.



विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन सुध्दा यावेळी करण्यात आले. डॉ. स्वाती शेरकर, डॉ. प्रशांत गावंडे यांनीही यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यापीठ गीत, सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने सोहळ्याची सुरुवात झाली.

प्रास्ताविक व स्वागतपर भाषण डॉ. मनिषा कोडापे यांनी केले. मागील वर्षीच्या सोसायटीचा वार्षिक अहवाल सचिव कु. श्रावणी ठाकरे, अध्यक्ष प्रांजली चव्हाण यांनी सोसायटीच्या संभाव्य योजना मांडल्या. यावेळी सोसायटीचे नवे पदाधिकारी घोषित करण्यात आले. अध्यक्ष प्रांजली चव्हाण, उपाध्यक्ष नंदिनी वनवे, सचिव श्रावणी ठाकरे, संयुक्त सचिव वैष्णवी क्षीरसागर, खजिनदार प्रांजली नंदनवार, सहखजिनदार गायत्री निवाळ, संपादक हकीम नवशाद, सहसंपादक सुमित लोण, श्रावणी चौधरी तसेच एम.एस्सी. पहिल्या व दुस-यावर्षातील वर्ग प्रतिनिधींचा यावेळी सन्मान करण्यात आला.

तसेच नेट-सेठ्उत्तीर्ण अश्विनी दरसवार, आरती कुंभारे, हर्षद शेरकी, स्नेहल साबळे, शुभम कु-हाडे, अभिषेक शेळके आणि अंकिता शेंडोकार यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन कु. श्रेया चव्हाण व कु. कोमल सावके यांनी, तर आभार नफिसा चव्हाण हिने मानले. कार्यक्रमाला अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, श्रीराम सातव, व्यवहारे, श्रीमती कल्पना बैस, विद्यापीठातील सीएचबी शिक्षकवर्ग डॉ. स्वाती गडाखे, पायल जाधव, आदेश नवघरे, स्मिता नंद, डॉ. प्रिती ठाकरे, पृथा शर्मा, वैष्णवी बंड, आरती कुंभारे, अभिषेक सगने, शिक्षक तसेच विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्जाला कंटाळून शेतकऱ्याने केली आत्महत्या

**आर्णी:** कर्जाला कंटाळून शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना आर्णी तालुक्यातील देवगाव येथे घडली. सन हरी देवकर (४५) असे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे. या प्रकारणी मिळालेल्या माहितीनुसार, आर्णी तालुक्यातील देवगाव येथील शेतकरी किसन हरी देवकर यांच्याकडे देवगाव शेत शिवारात एक हे. २३ आर शेती आहे. यामध्ये मृतकाच्या आईसह पाच वारस आहे. दरम्यान यावर्षी सर्वांच्या सहमतीने संपूर्ण शेती मृतक किसन देवकर यांनी वाहिली होती. यावर्षी झालेल्या सततधार पावसामुळे,



शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे पीक गेल्याने पेरणीसाठी काढलेल्या कर्जाचीही परतफेड होणार नाही, शेतकरी किसन हरी देवकर याने गुरुवारी राहत्या घरी विषारी कीटकनाशक प्राशन केले असता कुटुंबियांनी त्यांना तत्काळ लोणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचाराकरिता दाखल करण्यात आले होते. प्रकृती बिघडल्याने शेतकरी किसन देवकर यांना तत्काळ यवतमाळ येथील शासकीय जिल्हा रुग्णालयात दाखल केले, मात्र शुक्रवारी मध्यरात्री उपचारा दरम्यान शेतकऱ्याच्या मृत्यू झाला.

## 'स्वच्छ अकोला' फक्त कागदावरच

## रस्त्याच्याकडेला साचले कचऱ्याचे ढीग



■ महासागर प्रतिनिधी
**अकोला, दि. १३ :**

शहरातील विविध भागांत महापालिकेच्या हलगर्जीपणामुळे साचलेल्या कचऱ्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सिंधी कॅम्प परिसर, जेल रोड, तेलीपुरा चौक, मोर्णा नदीकाठचा नाला, मलकापूर, खडकी या भागांतील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर कचरा साचला आहे. 'स्वच्छ अकोला'चा नारा केवळ कागदापुरता मर्यादित राहिला असून, प्रत्यक्षात शहरात गलिच्छ चित्र पाहायला मिळत आहे. शहरात दररोज कचरा संकलनासाठी कंत्राटदाराने नियुक्त घंटागाडी घरोघरी जातात आणि रोज कचरा गोळा करण्याचा दावा महापालिका करते, मात्र प्रत्यक्षात सफाईचे काम अपूर्ण आहे. निवडक भागातच साफसफाई केली जाते, असा नागरिकांचा आरोप होत आहे.

त्यात काहीअंशी सत्यताही आहे कारण शहरातील काही उच्चभ्रू वस्त्यांमध्ये रस्त्याच्या कडेला कचरा टाकला जात असल्याने कचराकुंडी तयार झाली असून. त्यावर मोकाट गुराढोरांचा वावर वाढल्याचे चित्र दिसून आले. आरोग्य विभागानेही मान्य केले आहे की, शहरात साचलेला कचरा आणि दुर्गंधीमुळे डेंग्यू, मलेरिया, टायफॉईड सारख्या संसर्गजन्य रोगांचा धोका वाढला आहे. तरीही स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत आहे.

## कार्यालय नगर परिषद कळमेश्वर ब्राम्हणी

ता. नागपूर, जि. नागपुर

जावक क्र.- न.प.क.ब्रा/बीबी/०२०७४/२०२५. दि. १३ ऑक्ट २०२५

**निविदा सुचना**

सन २०२५-२६ या वित्तीय वर्षात नगर परिषद कळमेश्वर ब्राम्हणी तर्फे एकून ०२ विद्युत विकाम कामाकरिता, अनुभवी व सक्षम कंत्राटदार यांचे कडुन निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदेचा विस्तृत नमुना, कामाचा तपशिल व अटी हे विद्युत विभाग येथे, निविदा सूचना दिनांक- १३.१०.२०२५ ला प्रसिध्द झाल्यापासून पाहण्यास उपलब्ध होईल.

टीपः- कुठल्याही कारणास्तव निविदा मंजूर / नामंजूर करण्याचे अधिकार प्रशासक तथा मुख्याधिकारी न.प कळमेश्वर -ब्राम्हणी यांचे कडे राखीव ठेवण्यात आले आहे.

प्रशासक तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद कळमेश्वर ब्राम्हणी

कार्यालय
## ग्रामपंचायत सोनुर्ली
### पंचायत समिती नागपूर, जिल्हापरिषद् नागपूर

ग्रा.प. सोनुर्ली अंतर्गत विविध बांधकाम, करिता लागणारे बांधकाम साहित्य

सूचना क्रमांक - ०१ २५ - २६ ( ई निविदा ) ( पहिली वेळ )

ग्रा.प सोनुर्लीअंतर्गत विविध बांधकामकामाकरिता लागणारे साहित्य खेदी करण्याकरिता जिल्हा परिषद वेबसाईटवर http//mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई - निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे .

| अ क्र. | तपशील | दरपत्रक विक्रीचा कालवधी दिनांक व दरपत्रक सिविकृतीचा अंतिम दिनांक | दरपत्रक उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सन २०२५/२६ वित्तीय वर्षामध्ये ग्रा.प. सोनुर्ली अंतर्गत विविध शासकीय योजनेतून मंजूर वार्षिक बांधकामा करिता लागणारे साहित्य खेदी करण्याकरीत ई- निविदा ऑनलाइन मागविण्यात येत आहे . | दिनांक १३/१०/२०२५ ला सकाळी १०.०० वा पासून ते १८/१०/२०२५ सा.०५.०० वा पर्यंत उपलब्ध राहील | दिनांक २०/१०/२०२५ ला सकाळी १०.०० वाजता किंवा सोईनुसार उघडण्यात येईल . |
| २. | ग्रामपंचायत सोनुर्ली अंतर्गत पेबिंग ब्लॉक लावणे सिमेंट रस्ता बांधकाम करणे साहित्य आणि आरो प्लांट बांधकाम करिता ई- निविदा मागविण्यात येत आहे | | |

सरपंच /सचिव
ग्रा.प. सोनुर्ली

PRE-OFFER ADVERTISEMENT IN ACCORDANCE WITH REGULATION 18(7) OF THE SECURITIES AND EXCHANGE BOARD OF INDIA (SUBSTANTIAL ACQUISITION OF SHARES AND TAKEOVERS) REGULATIONS, 2011, AND SUBSEQUENT AMENDMENTS THERETO, AND CORRIGENDUM TO THE DETAILED PUBLIC ANNOUNCEMENT WITH RESPECT TO THE OPEN OFFER, FOR THE ATTENTION OF THE PUBLIC SHAREHOLDERS OF

# HARI GOVIND INTERNATIONAL LIMITED

Registered Office: 125, Wardhman Nagar Nr. Radha Krishna Mandir, Nagpur, Maharashtra, India, 440008;
Email: hgil.ngp@gmail.com Website: www.hgil.in Tel. No.: +91 9373126605 CIN: L99999MH1989PLC050528

**OPEN OFFER ACQUISITION OF UP TO 22,16,500 (TWENTY-TWO LAKHS SIXTEEN THOUSAND FIVE HUNDRED) FULLY PAID-UP EQUITY SHARES HAVING FACE VALUE OF INR 10/- (INDIAN RUPEES TEN ONLY) EACH ("EQUITY SHARES"), REPRESENTING 26.00% (TWENTY SIX PERCENT) OF THE EXPANDED SHARE CAPITAL ("AS DEFINED BELOW") OF THE TARGET COMPANY, AT A PRICE OF INR 10/- (INDIAN RUPEES TEN ONLY) PER EQUITY SHARE ("OFFER PRICE") FROM THE PUBLIC SHAREHOLDERS OF THE TARGET COMPANY BY SHAJU THOMAS ("ACQUIRER 1") AND LINTA PURAYIDATHIL JOSE ("ACQUIRER 2") ("ACQUIRER 1" AND "ACQUIRER 2" HEREINAFTER COLLECTIVELY REFERRED TO AS "ACQUIRERS"), IN ACCORDANCE WITH THE SECURITIES AND EXCHANGE BOARD OF INDIA (SUBSTANTIAL ACQUISITION OF SHARES AND TAKEOVERS) REGULATIONS, 2011, AS AMENDED ("SEBI (SAST) REGULATIONS").**

This pre-offer advertisement is issued by Marwadi Chandarana Intermediaries Brokers Private Limited (**"Manager to the Offer"**) for and on behalf of Acquirers pursuant to Regulation 18(7) of Securities and Exchange Board of India (Substantial Acquisition of Shares and Takeovers) Regulations, 2011, as amended (**"SEBI (SAST) Regulations, 2011"**).

This Pre-Offer Advertisement should be read in continuation of, and in conjunction with the: (i) Public Announcement dated May 14, 2025 ("Public Announcement" or "PA"); (ii) Detailed Public Statement which was published on May 20, 2025 in the newspapers namely Financial Express (English), Jansatta (Hindi), Mahasagar (Marathi) and Mumbai Lakshadeep (Marathi) ("Detailed Public Statement"/"DPS"); (iii) Draft Letter of Offer dated May 28, 2025 ("Draft Letter of Offer"/"DLoF"); (iv) Letter of Offer dated October 08, 2025, along with Form of Acceptance ("Letter of Offer"/"LoF") and (v) Corrigendum to the DLOF dated September 12, 2025 and Corrigendum 2 to PA, DPS and DLOF dated October 09, 2025. This Pre-Offer Advertisement is being issued in all the newspaper in which the DPS was published.

*Capitalized terms used in this advertisement, but not defined herein, shall have the same meanings assigned to such terms in the PA, DPS and the Letter of Offer.*

The Equity Shareholders of the Target Company are requested to kindly note the following information related to the Open Offer:

1. **Offer price:** The Offer Price is ₹ 10/- (Indian Rupees Ten Only) per Equity Share payable in cash. There has not been any revision in the Offer Price. For further details relating to offer price, please refer paragraph 7.1 (Justification of Offer Price) of the LOF.
2. **Recommendation of the Committee of Independent Directors ("IDC"):** The recommendation of committee of Independent Directors of the Target Company (**"IDC"**) in relation to the Open Offer was approved on October 9, 2025 in the newspapers where the DPS was published (**"IDC Recommendation"**). The relevant extract of the IDC recommendation is given below:

| | |
|---|---|
| **Members of the Committee of Independent Directors** | 1. Rishin Rasheed -Chairman<br>2. Reveesh Moolamkuzhiyil Varghese - Member<br>3. Aruna Mahesh Menkudale - Member |
| **Recommendation on the Open offer, as to whether the offer is fair and reasonable** | IDC is of the view that Open Offer is fair and reasonable. |
| **Summary of reasons for recommendation** | IDC has taken into consideration the following for making the recommendation:<br>IDC has reviewed (a) The Public Announcement (**"PA"**) dated May 14, 2025 in connection with the Offer issued on behalf of the Acquirers; (b) The Detailed Public Statement (**"DPS"**) dated May 20, 2025; and (c) The Letter of Offer (**"LoF"**) dated October 08, 2025.<br>Based on the review of PA, DPS and LoF, the IDC is of the opinion that the Offer Price of ₹10 per equity share for public shareholders offered by the Acquirers (more than the highest price amongst the selective criteria mentioned under Justification of Offer Price) is in line with the regulation prescribed by SEBI under the Regulations and prima facie appears to be justified. However, the Public Shareholders should independently evaluate the Offer and take informed decision in the matter. |
| **Disclosure of the voting pattern** | The recommendations were unanimously approved by the members of the IDC present at the meeting of the IDC held on October 9, 2025. |
| **Details of Independent Advisors, if any.** | None |

For further details, please see the IDC Recommendation which is available on the websites of the Stock Exchange (www.bseindia.com) and SEBI at (www.sebi.gov.in)

3. **Other Details of the Open Offer**

3.1. The Open Offer is a mandatory offer being made under Regulation 3(1) and 4, and other applicable regulations of the SEBI (SAST) Regulations to the Public Shareholders of the Target Company.

3.2. There was no Competitive Bid.

3.3. The dispatch of Letter of Offer to the Public Shareholders as on the Identified Date i.e., October 3, 2025 is in accordance with Regulation 18(2) of SEBI (SAST) Regulations, 2011 and has been completed (either through electronic mode or physical mode) on October 08, 2025 & October 9, 2025. The Identified Date was relevant only for the purpose of determining the Public Shareholders to whom the LoF was to be sent. It is clarified that all the Public Shareholders (even if they acquire equity shares and become shareholders of the Target Company after the Identified Date) are eligible to participate in the Open Offer.

3.4. Please note that a copy of the LOF (which inter alia includes detailed instructions in relation to the procedure for acceptance and settlement of the Open Offer in Paragraph 9 - "Procedure for Acceptance and Settlement of the Offer") as well as the Form of Acceptance and share transfer form (Form SH-4) is also available for download on the websites of SEBI, the Stock Exchange, the Registrar to the Offer and the Manager to Offer at www.sebi.gov.in, www.bseindia.com, www.satellitecorporate.com and ib.marwadichandaranagroup.com respectively.

3.5. Accidental omission to dispatch the LOF to any person to whom the Offer is made or the non-receipt or delayed receipt of the LOF by any such person will not invalidate the Offer in any way.

3.6. Non-receipt / non-availability of the LOF and the Form of Acceptance does not preclude a Public Shareholder from participating in the Open Offer. Please see the manner of participating in the Open Offer described below in brief. Since the Acquirer has acquired and exercises joint control over the Target Company along with the Existing Promoters pursuant to consummation of the Underlying Transaction, kindly note that the Open Offer is being implemented by the Acquirer through the stock exchange mechanism made available by the Stock Exchange i.e., BSE, in the form of a separate window ("Acquisition Window") in accordance with SEBI (SAST) Regulations, other applicable SEBI circulars and guidelines issued by the Stock Exchanges and the Clearing Corporation.

a) **In case of Public Shareholders holding Equity Shares in dematerialized form:** Public Shareholders who are holding Equity Shares in dematerialized form and who desire to tender their Equity Shares in dematerialized form under the Open Offer would have to do so through their respective Selling Broker by giving the details of Equity Shares they intend to tender under the Open Offer. Public Shareholders should tender their Equity Shares before market hours close on the last day of the Tendering Period. The Selling Broker would be required to place an order/bid on behalf of the Public Shareholders who wish to tender Equity Shares in the Open Offer using the Acquisition Window of the Stock Exchanges. Before placing the bid, lien will be required to be marked on the tendered Equity Shares. Please also read the detailed procedure described in paragraph 9.11(Procedure for tendering shares held in Dematerialized Form), 9.17 (Acceptance of Equity Shares) and 9.18 (Settlement Process) of the LOF.

b) **In case of Public Shareholders holding Equity Shares in physical form:** Public Shareholders who are holding Equity Shares in physical form and intend to participate in the Open Offer will be required to approach their respective Selling Broker along with the complete set of documents for verification procedures to be carried out, including the (i) original share certificate(s), (ii) valid share transfer form(s), i.e. Form SH-4, duly filled and signed by the transferors (i.e., by all registered shareholders in same order and as per the specimen signatures registered with the Target Company) and duly witnessed at the appropriate place, (iii) self-attested copy of the shareholder's PAN Card, (iv) Form of Acceptance duly completed and signed in accordance with the instructions contained therein, by sole/joint Public Shareholders whose name(s) appears on the share certificate(s) in the same order in which they hold Equity Shares, and (v) such other documents described in paragraph 9.12 of the LOF. Selling Broker shall place the bid on behalf of the Public Shareholder holding Equity Shares in physical form who wishes to tender Equity Shares in the Open Offer, using the Acquisition Window of the Stock Exchange. Upon placing the bid, the Selling Broker shall provide a TRS generated by the bidding system of the Stock Exchange to the Public Shareholder. The Selling Broker/ Public Shareholder has to deliver the original share certificate(s) and documents (as mentioned above) along with the TRS either by registered post/speed post or courier or hand delivery to the Registrar to the Offer i.e., Satellite Corporate Services Pvt Ltd, so as to reach them no later than the Offer Closing Date (by 5:00 p.m. Indian Standard Time). The envelope should be super scribed as "HGIL Open Offer". Please also read and follow the detailed procedure described in paragraph 9.12 of the LOF. The Public Shareholders holding Equity Shares in physical form are required to attach all relevant documents such as Form SH-4, self-attested copy of the PAN Card, etc., along with the share certificate(s). Please also read the detailed procedure described in paragraph 9.12 (Procedure to be followed by the registered Shareholders holding Equity Shares in physical form), 9.17 (Acceptance of Equity Shares) and 9.18 (Settlement Process) of the LOF.

c) Alternatively, in case of non-receipt of the LOF, Public Shareholders holding the Equity Shares may participate in the Open Offer by providing their application in plain paper in writing signed by all shareholder(s), stating name, address, number of shares held, client ID number, DP name, DP ID number, number of shares being tendered and other relevant documents as mentioned in the LOF. Such Public Shareholders have to ensure that their order is entered in the electronic platform to be made available by the Stock Exchange before the closure of the Tendering Period. Physical share certificates and other relevant documents should not be sent to the Acquirer, the Target Company or the Manager to the Offer. Please also read the detailed procedure described in paragraph 9.15 (Procedure for Tendering the Shares in case of Non-Receipt of the Letter of Offer), 9.17 (Acceptance of Equity Shares) and 9.18 (Settlement Process) of the LOF.

4. In accordance with Regulation 16(1) of the SEBI (SAST) Regulations, the draft letter of offer dated May 28, 2025 ("DLOF") was filed with SEBI on the same date. SEBI issued its observations on the DLOF vide its letter bearing reference no. SEBI/HO/CFD-RAC-DCR1/P/OW/2025/0000025659/1 dated September 29, 2025, in accordance with Regulation 16(4) of the SEBI (SAST) Regulations ("SEBI Observation Letter"). SEBI's observations have been incorporated in the LOF. This Pre-Offer Advertisement and Corrigendum also serves as a corrigendum to the DPS and the PA, and as required in terms of the SEBI Observation Letter, reflects the changes made in the LOF as compared to the DPS and the PA.

5. **For Material Updates in the LoF:**
The comments specified in the SEBI Observation Letter and certain changes (occurring after the date of the Public Announcement) which may be material have been incorporated in the LOF and for the same corrigendum dated September 12, 2025 and October 09, 2025 have been published in the same newspapaer where DPS have been published. Further to clarify, the offer size has reduced due to less allotment of shares in preferential allotment by the Company vide their board resolution dated August 14, 2025 and August 16, 2025 as disclosed in LOF.

6. **Due to clerical error, following table in corrigendum and LoF shall be read as follows:**

| Sr. No. | Shareholder category | Shareholding &voting rights prior to the agreement / acquisition and offer (A) | | Shares/voting rights agreed to be acquired which triggered off the SEBI (SAST) Regulation | | Shares/Voting rights to be acquired in the open offer (assuming full acceptances) (D) | | Shareholding/voting rights after the acquisition and Offer | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | No. | % (1) | No. | % (2) | No. | % (2) | No. | % (2) |
| 1. | **Promoter and Promoter Group** | | | | | | | | |
| | **a. Parties to Agreement** | | | | | | | | |
| | Jugal Kishore Maniyar (Seller-1) | 18,75,000 | 37.50% | (11,25,000) | (13.20) % | NIL | NIL | 7,50,000 | 8.79% |
| | Sunita Maniyar (Seller-2) | 18,75,000 | 37.50% | (18,75,000) | (21.99) % | NIL | NIL | NIL | NIL |
| 2. | **Acquirers** | | | | | | | | |
| | Shaju Thomas (Acquirer-1) | NIL | NIL | 35,00,000 | 41.06% | 17,24,000 | 20.22% | 52,24,000 | 61.28% |
| | Linta Jose (Acquirer-2) | NIL | NIL | 10,00,000 | 11.73% | 4,92,500 | 5.78% | 14,92,500 | 17.51% |
| 3 | Public Category | 12,50,000 | 25% | 20,25,000 | 23.75% | (22,16,500) | (26.00) % | 10,58,500 | 12.42% |
| | **Total** | **50,00,000** | **100%** | **35,25,000** | **43.02%** | **NIL** | **NIL** | **85,25,000** | **100.00** |

7. **Revised Schedule of Activities:**
The Schedule of Activities have been revised and the necessary changes have been incorporated in the LoF. The Revised Schedule of Activities is in compliance with the applicable provisions of SEBI (SAST) Regulations, 2011 and the same is as under:

| S.N. | Nature of Activity | Original Schedule Day & Date | Revised Schedule[1] Day & Date |
|---|---|---|---|
| 1) | Issue of PA | Wednesday, May 14,2025 | Wednesday, May 14,2025 |
| 2) | Publication of DPS in newspapers | Wednesday, May 21,2025 | Wednesday, May 21,2025 |
| 3) | Last date for Filing of draft letter of offer (DLOF) with SEBI | Wednesday, May 28,2025 | Wednesday, May 28,2025 |
| 4) | Last date for public announcement of a competing offer | Wednesday, June 11, 2025 | Wednesday, June 11, 2025 |
| 5) | Last date for receipt of comments from SEBI on the draft letter of offer (in the event SEBI has not sought clarification or additional information from the Manager to the Offer) | Wednesday, June 18, 2025 | Monday, 29 September, 2025 |
| 6) | Identified Date* | Friday, June 20, 2025 | Friday, 3 October, 2025 |
| 7) | Last date for dispatch of the Letter of Offer to the Public Shareholders whose names appear on the register of members on the Identified Date | Friday, June 27, 2025 | Thursday, 9 October, 2025 |
| 8) | Last date by which a committee of independent directors of the Target Company is required to give its recommendation to the Public Shareholders of the Target Company for this Offer | Wednesday, July 02, 2025 | Tuesday, 14 October, 2025 |
| 9) | Last date for upward revision of the Offer Price and/or the Offer Size | Wednesday, July 02, 2025 | Tuesday, 14 October, 2025 |
| 10) | Date of publication of advertisement for Offer opening | Thursday, July 03, 2025 | Wednesday, 15 October, 2025 |
| 11) | Commencement of tendering period (**"Offer Opening Date"**) | Friday, July 04, 2025 | Thursday, 16 October, 2025 |
| 12) | Closure of tendering period (**"Offer Closing date"**) | Thursday, July 17, 2025 | Friday, 31 October, 2025 |
| 13) | Last date of communicating of rejection/ acceptance and payment of consideration for accepted tenders/ return of unaccepted shares | Thursday, July 31, 2025 | Monday, 17 November, 2025 |
| 14) | Last date for publication of post-Offer public announcement in the newspapers in which this DLOF has been published | Thursday, August 07, 2025 | Monday, 24 November, 2025 |

Notes:
*(1) Where last dates are mentioned for certain activities, such activities may take place on or before the respective last dates.*
*(2) The above timelines are indicative (prepared on the basis of timelines provided under the SEBI (SAST) Regulations) and subject to receipt of the Required Statutory Approval and other approvals and may have to be revised accordingly.*
*(3) Identified Date refers to the date falling on the 10th Working Day prior to the commencement of the Tendering Period. The Identified Date is only for the purpose of determining the Public Shareholders as on such date to whom the LOF will be sent. It is clarified that all holders (registered or unregistered) of Equity Shares (except those who are excluded from the ambit of Public Shareholders) are eligible to participate in the Open Offer at any time during the Tendering Period.*
*(4) Actual date of receipt of SEBI's observations on the DLOF.*

8. **Other Information**

8.1. The Acquirer accept the responsibility for the information contained in this Pre-Offer Advertisement (other than the information pertaining to the Target Company or the Sellers, which has been obtained from publicly available sources or provided by the Target Company / the Sellers) and also for the obligations of the Acquirer laid down in the SEBI (SAST) Regulations in respect of the Open Offer.

8.2. All references to "Indian Rupees" or "INR" are to Indian Rupees, the official currency of the Republic of India.

8.3. This Pre-Offer Advertisement is expected to be available on SEBI's website at (www.sebi.gov.in).

This advertisement will be available on the website of SEBI i.e., www.sebi.gov.in.

**ISSUED ON BEHALF OF THE ACQUIRERS BY THE MANAGER TO THE OPEN OFFER:**

MARWADI CHANDARANA GROUP
**Marwadi Chandarana Intermediaries Brokers Private Limited**
X-change Plaza, Office no. 1201 to 1205, 12th Floor, Building No. 53E, Zone-5, Road 5E, Gift City, Gandhinagar - 382355, Gujarat, India
**Tel. No.:** 022-69120027;
**Email:** mb@marwadichandarana.com;
**Website:** ib.marwadichandaranagroup.com;
**Contact Person:** Radhika Maheshwari / Jigar Desai;
**SEBI Registration Number:** INM000013165

SATELLITE
**Satellite Corporate Services Pvt Ltd**
A 106& 107, Dattani Plaza, East West Compound, Andheri Kurla Road, Safed Pool Sakinaka, Mumbai - 400072
**Tel. No.:** 022 - 28520461 / 462
**Fax No.:** 022 - 28511809
**Email id:** service@satellitecorporate.com;
**Contact Person:** Mr. Michael Monteiro
**SEBI Registration Number:** INR000003639
**Website:** www.satellitecorporate.com

For and on behalf of Acquirers
Mr. Shaju Thomas
Mrs. Linta Purayidathil Jose

Place : Malapuram
Date : October 13, 2025


# सरन्यायाधीशांवर बूट फेकणारा मोकाट कसा?

सर्वोच्च न्यायालयात सुनावणी चालू असताना एका वकिलाने, सनातन का अपमान, नही सहेगा हिंदुस्थान अशा घोषणा देत सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या दिशेने बूट फेकून मारला, या घटनेने सर्वसामान्य माणूसही हादरला. सर्वच राजकीय पक्षांनी या घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला. देशात चोहोबाजूने संताप प्रकटला. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सरन्यायाधीश गवई यांना फोन करून या घटनेचा निषेध केला. पण संसदीय लोकशाहीत देशाच्या न्यायव्यवस्थेचे सर्वोच्च मंदिर असलेल्या सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीशांवर वकिलच बूट फेकून मारतो ही घटनाच मती गुंग करणारी आहे. न्यायव्यवस्थेत सरन्यायाधीश हे सर्वोच्च स्थान आहे. त्या वकिलाची त्यांच्यावर बूट फेकून मारण्याची हिम्मत झालीच कशी ? सनातन धर्माचा अपमान झाला म्हणून आपण सरन्यायाधीशांचा बदला घेण्याचा प्रयत्न केला हे त्या वकिलाला देशाला दाखवून द्यायचे होते की कोणाला खूश करण्यासाठी त्याने हे कृत्य केले ? सरन्यायाधीशांवर बूट फेकून मारणारा वकिल ७२ वर्षाचा आहे. त्याला पोलिसांनी तत्काळ ताब्यात घेतले पण त्याला अटक करून कोठडीत का रवानगी केली नाही ? म्हणे, त्याच्या विरोधात कोणी तक्रार दिली नाही. त्याची चौकशी करून त्याला पोलिसांनी घरी सोडले. सर्वसामान्य माणूस सर्वोच्च न्यायालयात सहज प्रवेश करू शकत नाही. सरन्यायाधीशांपर्यंत पोचू शकत नाही. न्यायव्यवस्थेला सुरक्षा व्यवस्थेने घेरलेले असते. पंतप्रधान किंवा मुख्यमंत्री यांच्या दौऱ्यात रस्त्यावर कोणी काळे झेंडे दाखवले तरी पोलीस त्याची उचलबांगडी करतात, त्याला पोलिसी हिसका दाखवतात व त्याच्यावर गुन्हे नोंदवले जातात. मग सरन्यायाधीशांवर भर कोर्टात बूट फेकणारे ज्येष्ठ वकील राकेश किशोर याची सहज सुटका कशी होऊ शकते ? तो म्हणतो- या कृत्याचा आपणास मुळीच पश्चात्ताप होत नाही, आपण तुरूंगात जाण्यास तयार आहोत. मी माफी मागणार नाही. दैवी शक्तिने हे काम माझ्याकडून करवून घेतले हा वकिल दिल्लीतील मयुर विहारमधे राहतो.

मध्य प्रदेशमधील खजुराहोच्या जावरी मंदिरात भगवान विष्णुची मूर्ती आहे. तिच्या जीर्णोध्दाराच्या केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी चालू होती. हा विषय न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात नसून पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत आहे असे सरन्यायाधीश व न्या.विनोद चंद्रन यांनी वकिलाना वारंवार सांगून पाहिले, पण भगवान विष्णुचे नाव घेत तो वकिल आपले म्हणणे सतत मांडत राहीला. जर तो भगवान विष्णुचा भक्त असेल तर त्याने त्यांना प्रार्थना करावी, असे भाष्य सरन्यायाधीशांनी केले. पण विश्व हिंदु परिषदेने त्यांच्या वक्तव्याला आक्षेप घेतला व न्यायधीशांनी बोलण्यावर नियंत्रण ठेवावे असे म्हटले. सरन्यायाधीश गवई यांनीही तत्काळ आपण सर्व धर्मांचा विश्वास करतो व सर्व धर्मांचा आदर करतो असे म्हटले. खरं तर हा विषय इथेच संपायला हवा होता. पण सरन्यायाधीशांच्या वक्तव्याने हिंदु धर्माच्या श्रध्देची थट्टा केली, अशा प्रतिक्रियांचा सोशल मिडियावर पाऊस पडला.

या घटनेनंतर स्वत: गवई यांनी म्हटले की, अशा प्रकारामुळे विचलीत होऊ नका, आम्ही विचलीत झालेलो नाही. अशा गोष्टींनी मला काही फरक पडत नाही. या घटनेनंतर पंतप्रधान मोदींनी गवई यांना लगेचच फोन केला, मोदींनी म्हटले आपल्या समाजात अशा कृत्यांना समाजात स्थान नाही. हे निषेधार्ह आहे. सरन्यायाधीशांनी दाखवलेला संयम कौतुकास्पद आहे. भूषण गवई हे देशाचे दुसरे दलित सरन्यायाधीश आहेत. त्यांच्याअगोदर बालकृष्णन हे दलित सरन्यायाधीश होते. न्यायसंस्थेच्या सर्वोच्च पदावर असलेले गवई हे दलित आहेत म्हणून काही घटकांना रूचलेले नाही का ? देशात किंवा राज्यात सत्तेच्या परिघात असलेल्या प्रमुख नेत्यावर असा हल्ला झाला असता तर भाजपाने देशभर रान पेटवले असते. पण सरन्यायाधीश गवईंवर सर्वोच्च न्यायालयात बूट फेकून मारल्याची घटना दुपारी साडेबारा वाजता घडली, सर्व राजकीय पक्षांकडून या घटनेचा निषेध केला जात असताना भाजपाचे सर्व राष्ट्रीय नेते व प्रवक्ते चूपचाप बसले होते. रात्री साडेआठ वाजता पंतप्रधानांनी ट्वीट करून या घटनेचा निषेध नोंदवला. तोपर्यंत सोशल मिडियावर गवईंवर बूट फेकणाऱ्या वकिलाचे कौतुक चालू होते, वृत्तवाहिन्यांवर त्याच्या मुलाखती चालू होत्या. त्याने सरन्यायाधीशांवर बूट फेकून मोठी मर्दुमकी गाजवली आहे असे त्याचे कौतुक चालू होते. तो जणू नायक आहे असे त्याचे समर्थन केले जात होते.

**राष्ट्रनामा**



**सुकृत खांडेकर**
**0९५९४२२४000**
sukritforyou@gmail.com

सरन्यायाधीशांनी सनातन धर्माची बदनामी केली असा सोशल मिडियावर धुव्वाधार प्रचार केला गेला, त्यावर सरकार काही कारवाई करीत नाही, याचेच मोठे आश्चर्य वाटते. आपल्यावर झालेल्या हल्ल्याचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी मुळीच भांडवल केले नाही. उलट त्यांनी त्या वकिलाचा बूट पोलिसांच्या स्वाधीन केला. पोलिसांनीही त्या वकिलाला चार तास ताब्यात ठेऊन त्याच्यावर गुन्हाही नोंदवला नाही. उलट त्याला चहा नाष्टा दिला, त्याला जेवण दिले व त्याचा बूट परत करून त्याला घरी सोडून दिले. हे सर्व पोलिसांनी कुणाच्या सुचनेवरून केले. म्हणे त्या वकिलाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयाने तक्रार नोंदवली नाही म्हणून कारवाई नाही. दिल्लीचे पोलीस हे केंद्र सरकारच्या अखत्यारीत येतात, म्हणूनच त्या वकिलाला राजकीय संरक्षण मिळाले का ? सरन्यायाधीशांनी त्यांच्या पदाला व प्रतिष्ठेला साजेशी सामंजस्याची व शांतीची भूमिका घेतली तर त्यांच्यावर बूट फेकणाऱ्या वकिलाला पोलिसांनी व्हिआयपी वागणूक दिली.

न्यायालयात अजून आरक्षण सुरू झालेले नाही. सरन्यायाधीश गवई हे आपल्या गुणत्तेवर सरन्यायाधीश पदावर पोचलेले आहेत. त्याचे वडिल रा. सु. गवई हे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष होते. महाराष्ट्र विधान परिषदेत अनेक वर्षे सभापती होते. संसदेत खासदार होते. बिहार व केरळचे राज्यपाल होते. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबर त्यांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला. स्वत: भूषण गवई सर्व धर्माच्या मंदिरात व धार्मिक स्थळांमधे जातात, सर्व धर्माचा आदर करतात, असे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनीच म्हटले आहे. मग त्यांच्याकडून सनातन धर्माचा अपमान झाला अशी आवई उठवून त्याचे भांडवल का करण्यात आले ?

सोशल मिडियावर तर सरन्यायाधीशांवर टीका करण्याचा अतिरेक झाला. त्यांची इम्पिचमेंट करा, राजीनामा द्या असे संदेश व्हायरल झाले. गवई हे हिंदु विरोधी आहेत असा प्रचार झाला. मग पोलीस प्रशासन बघ्याची भूमिका का घेत आहे ? ज्येष्ठ विधिज्ञ कबिल सिबल यांनी गवईंवर झालेल्या हल्ल्याचा निषेध करणारे पहिले ट्वीट केले त्यानंतर इतरांना जाग आली. गवईंनी मॉरिशसमधे बोलताना भारतात कायद्याचे राज्य आहे, बुलडोझरचे नाही असे म्हटले होते. त्यावरूनही सोशल मिडियावर गवई हे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या विरोधात आहेत, असा प्रचार केला गेला. सरन्यायाधीश म्हणून गवईंनी शपथ घेतल्यावर त्यांना शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या वकिलांचे गवईंनी जय भीम म्हणन स्वागत केले होते, याची आठवण आज करून दिली जात आहे. जय भीम म्हणणे हे काहींना रूचले नाही का ? कर्नाटकचे भाजपाचे नेते व बंगळुरूचे माजी पोलीस आयुक्त भास्करराव यांनी तर बूट फेकणाऱ्या वकिलाचे कौतूक केले आहे. त्याने जी भूमिका घेतली तसे ते वागले. त्यांच्या धाडसाचे कौतूक करतो, असे म्हटले आहे. राहुल गांधी, सोनिया गांधी, शरद पवार, अरविंद केजरीवाल, मायावती, केरळचे मुख्यमंत्री विजयन अशा विविध पक्षांच्या नेत्यांनी सरन्यायाधीशांवर झालेल्या हल्ल्याचा कडक शब्दात निषेध केला. गवईंच्या दिशेने वकिलाने बूट फेकून मारावा असे त्यांचे वक्तव्य होते का ? गवईंच्या बोलण्यातून सनातन धर्माचा अपमान झाला अशी जी आवई उठवली गेली, त्यामागे योजनाबध्द कारस्थान होते का ? यापुर्वी डॉ. मनमोहन सिंग, पी. चिदंबरम, लालकृष्ण अडवाणी, राहुल गांधी, शरद पवार, अरविंद केजरीवाल, ओमर अब्दुल्ला, नितीन गडकरी यांच्यावरही बूट फेकल्याच्या घटना घडल्या होत्या. सरन्यायाधीशांवरील हल्ल्याची इंग्रजी व भाषिक वृत्तपत्रांनी दखल घेतली पण वृत्तवाहिन्यांनी या घटनेला फारसे महत्व दिले नाही.

## ई कचऱ्याविषयी जागरूकता हवी

आज १४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक ई कचरा दिवस म्हणून साजरा केला जातो. ई कचरा कमी करणे आणि ई कचऱ्याचा पुनर्वापर या बाबत जनजागृती करणे हा या दिवसा मागचा उद्देश आहे. २०१८ साली पहिल्यांदा जागतिक कचरा दिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी धोकादायक असलेला ई कचरा ही जगातील आज सर्वात मोठी समस्या बनली आहे. आपल्या रोजच्या जगण्यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सेवांचा वापर जसा वाढत चालला आहे तसतसा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा डोंगर वाढत चालला आहे. उपयुक्तता संपलेल्या आणि तांत्रिक बिघाडामुळे वापरण्यायोग्य नसलेल्या वस्तू फेकून दिल्या जातात आणि मग त्याचा ई कचरा बनतो. जर भारताचा विचार केला तर महाराष्ट्र दरवर्षी ५० हजार टन हून अधिक ई कचरा जमा होतो तर देशात ५ लाख टन ई कचरा वर्षाला तयार होतो. महाराष्ट्र खालोखाल आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यात सर्वाधिक ई कचरा तयार होतो. आपल्या देशातच इतका ई कचरा तयार होत असेल तर जगात किती ई कचरा तयार होत असेल याचा विचार न केलेलाच बरा. ई कचऱ्याची समस्या इतकी गंभीरपणे आ वासून उभी असतानाही आपण ई कचऱ्या विषयी जागृत नाही. काहींना तर ई कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फेकतो. या कचऱ्याचा निचरा देखील आपण इतर कचऱ्या प्रमाणेच करतो. उदा. मोबाईल, चार्जर, टीव्ही, टेप, रेडिओ, टूइन वन, फ्रिज, मिक्सर, वॉशिंग मशीन, कुलर, एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक कुकर, मायक्रोव्हेव, ओव्हन, हीटर, पंखे यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू निकामी झाल्या की त्याला ई कचरा असे संबोधले जाते. यासोबतच माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उपकरणे जसे संगणक, लॅपटॉप, टॅब, फोन, मोबाईल, बॅटरी, सर्किट बोर्ड, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्ह, सिडी, व्ही सिडी यांचा ई कचऱ्यात समावेश होतो. अशा प्रकारे निकामी झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात. हे अपायकारक घटक पर्यावरणातील हवा, मती आणि पाण्यात मिसळले की सभोवतालची हवा, पाणी आणि माती दूषित होती. मोबाईलची किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते. हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आर्द्रतेमध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी आणि दूषित होते. अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी ३० दशलक्ष संगणक निकामी झालेली फेकून दिले जातात. यापैकी वीस टक्क्यांहून कमी संगणकाचे पुनर्विनिकरण केले जात नाही. युरोपमध्ये तर दरवर्षी सुमारे १०० दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, निकामी झालेली ही उपकरणे पर्यावरणाची जागा घेणे व्याप्त आहेत. निष्काळजीपणे फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरोलियम, कॅडमियम, पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खुप जास्त प्रमाणात जेव्हा हे वातावरणात मिसळले जातात तेव्हा पर्यावरणाची मोठी हानी होते. एकूणच ई कचऱ्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. हे लक्षात घेता ई कचऱ्याच्या समस्येवर वेळीच आणि गांभीर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे. ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे. ई कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाटीच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन त्याचे रिसायक्लिंग आणि त्याचे मॅन्युफॅक्चरिंग महत्वाचे आहे. त्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. पर्यावरण मंत्रालयाने सादर केलेल्या ई कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्चित केली गेली आहे. ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## सत्ता + पैसा + गुन्हेगारी = राजकारण!

राज्यात सर्वच मोठ्या शहरांत गुन्हेगारीचा आलेख दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. बीड जिल्हा हा त्यात अग्रभागी आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. एकेकाळी 'मंत्रभूमी' अशी ओळख असलेल्या नाशिक जिल्ह्याची ओळख आता 'गुन्हेगारांचा बालेकिल्ला' अशी झाली आहे. गेल्या चार महिन्यांत या शहराने केवळ खुनांच्या घटनांचे 'अर्धशतक' पार केले आहे. 'विद्देचे माहेरघर' म्हणून परिचित असलेले पुणे शहरही यात आघाडीवर आहे. एकूणच राज्यात गुन्हेगारी प्रवृत्तीने थैमान घातले आहे. चिंताजनक बाब म्हणजे, यात अल्पवयीन मुलांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. तसेच, अगदी किरकोळ कारणांवरून दिवसाढवळ्या मुडदे पाडले जात आहेत. मोबाईल बाळगावा तसे कोयते, चॉपर्स, सुरे, फायटर, तलवारी आदी शस्त्रे बाळगली जात आहेत. मुलांच्या दप्तरातील वह्या-पुस्तकांची जागा धारदार शस्त्रे घेत आहेत, हे काही महिन्यांपूर्वी नाशिकच्या एका घटनेने उघड झाले आहे.

ही जेवढी चिंताजनक बाब आहे, तेवढीच किंबहुना अधिक संतापजनक बाब म्हणजे, किमान नव्वद टक्के गुन्ह्यांत राजकीय नेत्यांचा प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष संबंध असतो. आपली दहशत रहावी, प्रत्येकवेळी निवडून यावे आणि अफाट संपत्ती मिळावी, यासाठी हे गुंडांच्या टोळ्या पोसत असतात. आजच्या अनेक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांवर खून, धमकी, खंडणी, बलात्कार, भ्रष्टाचार, फसवणूक असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. थोडक्यात, संपूर्ण राजकारण हे गुन्हेगार आणि गुन्हेगारीने बरबटले गेले आहे. काही वर्षांपूर्वी राजकारण म्हणजे समाजसेवा करण्याचा एक आदर्श मार्ग समजला जायचा. पण, आज राजकारण हा व्यवसाय होऊन, बेनामी संपत्ती कमविण्याचा 'राजमार्ग' झाला आहे. सत्तेतून पैसा आणि पैशांतून सत्ता मिळवण्यासाठी अनेक गुन्हेगार प्रवृत्तीचे 'नालायक' कारभारी दुकाने थाटून बसली आहेत. सत्ता आणि पैसा मिळवण्यासाठी हे साम, दाम, दंड, भेद या अस्त्रांचा पूर्णपणे वापर करतात. संतापजनक बाब म्हणजे, आपली दुकाने चालविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी थोर महापुरुषांच्या 'नखाचीही सर' नसलेले हे महाभाग त्यांची नावे घेतात. ती घेतांना या माफियांना 'जनाची नाही तर मनाची ही' काही वाटत नाही. अर्थात, असेल तर वाटेल ना ?

काही महाभाग तर 'राजकारण माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी (कसाही) मिळवणारच' या प्रवृत्तीने पिढ्यानपिढ्या ठाण मांडून अफाट संपत्ती कमवत आहेत. राजकारणाला आलेले हे गुन्हेगारीचे बकाल स्वरूप अत्यंत घातक आहे. यांच्या अत्याचारी आणि भ्रष्टाचारी प्रवृत्तीचा फटका सर्व सामान्य माणसाला बसत आहे. 'भस्म्या' रोग जडलेले हे 'बकासूर' कोटींचे भ्रष्टाचार करून दिवसेंदिवस श्रीमंत होत आहेत. दिवसाढवळ्या ज्या जनतेच्या पैशांवर दरोडा टाकतात, त्या जनतेची मात्र 'हाता-तोंडाची' गाठ पडणे मुश्किल होत आहे. समाजाला खऱ्या अर्थाने धोका, व्यावसायिक गुंडांकडून नव्हे तर, नेते (?) म्हणून मिरवणाऱ्या समाजसेवकाचा नकली मुखवटा परिधान केलेल्या 'व्हाईट कॉलर' गुंडांकडून आहे.

गुण्यागोविंदाने नांदणाऱ्या दोन जातींत आणि समाजात स्वत:चा स्वार्थ साधण्यासाठी तेढ निर्माण करण्यासाठी सर्व सामान्य, गरीब माणसाचे रक्त शोषण करण्याची सवय लागलेले हे रक्तपिपासू राक्षस कसे जातीयवाचक, चिथावणीखोर आणि प्रक्षोभक वक्तव्य करतात, हे सर्वांनी 'आंतरवली सराटी'च्या प्रकरणावरून (खरे तर षडयंत्रावरून) बघितलेच आहे. तेव्हाच्या राष्ट्रवादीच्या दोन आमदारांनी घडवून आणलेली दंगलसदृष्य परिस्थिती शांत करण्याऐवजी कारण नसताना, पत्रकार परिषद आणि भाषणांतून प्रक्षोभक आणि चिथावणीखोर वक्तव्य करण्यामागचे कारण काय होते? जातीयवाचक, प्रक्षोभक आणि चिथावणीखोर वक्तव्ये करायची. नंतर 'सामाजिक वीण विस्टकत चालली आहे' अशा चोराच्या उलट्या बोंबा मारायला या 'गेंड्याच्या कातडी'च्या नालायकांना लाज कशी वाटत नाही? हे न उलगडणारे कोडे आहे. मराठी माणसाबद्दल 'फुकाचा पुळका' दाखवायचा. त्याच मराठी माणसाला रस्त्यावर आणून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करायचा. मराठी महिलांना जाहीरपणे आई-बहिणीवरून अत्यंत अश्लील आणि गलिच्छ भाषेत शिवीगाळ करायची. नंतर नशा उतरल्यानंतर सकाळी सकाळी 'राजकारणाचा स्तर' कसा घसरला आहे? महिलांचा सन्मान राखला पाहिजे या विषयावर फालतू प्रवचन देणाऱ्या आणि मानव जातीला कलंक असणारा आरोपी किती 'उलट्या काळजा'चा असेल? याची कल्पनाही करवत नाही, असो.

पूर्वी राजकारण या विषयावर गप्पांचे फड रंगत असत. पण, दुर्दैवाने आज राजकारण शब्द तोंडातून निघताच सर्वजण नाके मुरडतात. याला कारण म्हणजे आजचे हे नालायक, स्वार्थी आणि नतद्रष्ट कारभारी आहेत. आज बहुतेक जण म्हणतात, महाराष्ट्राचा बिहार होत आहे. परंतु, आज महाराष्ट्र बिहारच्याही पुढे निघून गेला आहे, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.

सर्वसामान्य माणसाच्या मनात प्रचंड राग आहे. दिवसेंदिवस तो वाढतच चालला आहे. भविष्यात त्याचा प्रचंड स्फोट होऊन, बांगलादेश आणि नेपाळसारखी भीषण आणि स्फोटक परिस्थिती निर्माण झाली, तर आश्चर्य वाटायला नको. मागील वर्षी जिवाची पर्वा न करता, सुरक्षेचे कडे तोडून संसदेत घुसलेले तरुण असो. किंवा काल-परवा होणाऱ्या परिणामांची तमा न बाळगणारा सरन्यायाधीशांवर बुट फेकणारा वकील असो. ही भविष्यातील होणाऱ्या उद्रेकाची सुरुवात आहे, असे म्हणणे धाडसाचे ठरू नये. 'एकाच माळेचे मणी' असणारे किंवा 'सब घोडे बारा टक्के' असणाऱ्या या सरड्यालाही लाज वाटावी, असे 'रंग बदलणाऱ्या दगडाच्या काळजाच्या निर्ढावलेल्या या सरड्यांनी वेळीच सुधारणे त्यांच्या हिताचे आहे. भविष्यात, नेपाळप्रमाणे जसे मंत्र्यांना रस्त्यावर पळून पळून मारले, तशी तुमची परिस्थिती झाली तर, संपूर्ण राज्याला दुःख होण्याऐवजी 'आनंदाच्या उकळ्या' फुटतील हे मात्र नक्की. कारण, पुण्याचे वैष्णवी हगवणे आणि पोर्शे कार प्रकरण असो. मस्साजोगचे संतोष देशमुख हत्या प्रकरण, ड्रगमाफिया ललित पाटील प्रकरण, सुशांतसिंग- दिशा सालियन प्रकरण, मनसुख हिरेन प्रकरण, आज चर्चेत असणारे सावली डान्स बार आणि घायवळ बंधू प्रकरण असो. कोणत्याही प्रकरणाचे नाव घ्या, त्यात कोणत्यातरी पक्षाच्या नेत्याचा सहभाग हा असतोच असतो. नाशिकचे तीन चार माजी नगरसेवक आज जेलची हवा खात आहेत. तर, काही त्या मार्गावर आहेत.

अपेक्षा एवढीच आहे की, त्यांना कठोरात कठोर शिक्षा व्हावी; आणि नंतर ती रद्द होऊ नये. पोलिसांची ही अभिमानास्पद कारवाई केवळ फार्स ठरू नये. ती कायमस्वरूपी चालू रहावी. कारण 'म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावतोय' याचे वाटते, असो.

**प्रदीप व्ही. खोलमकर, नाशिक.**
**मोबाईल- ८७६७५९२९८०**

## दीपावलीच्या तेजाला फटाक्यांची काजळी!

गेल्या काही वर्षांपासून दिवाळीनिमित्त एवढ्या प्रचंड प्रमाणात फटाके फोडले जातात कि फटाके हीच दिवाळीची खरी ओळख आहे की काय असा प्रश्न पडतो. वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, यमद्वितीया म्हणजेच भाऊबीज अशी सहा दिवसांची दिवाळी. या प्रत्येक दिवसाचे वेगळे महत्व आहे. त्या प्रत्येक दिवसाला वेगळा इतिहास आहे आणि त्या दिवशीचा सण कसा साजरा करावा यामागील शास्त्रही ठरलेले आहे. अर्थात राज्यपरत्वे, स्थानपरत्वे या सणांच्या मागील वेगवेगळ्या कथा आणि इतिहास ऐकायला मिळतात. मात्र संपूर्ण भारतभरात उत्साहाने साजरी होणाऱ्या दिवाळीतील सामायिक बाब म्हणजे या दिवसांत सर्वत्र मोठ्या प्रमाणात दिवे लावले जातात. दीपावली शब्दाचाच अर्थ दीप +आवली अर्थात दिव्यांची रांग असा आहे. दीपावली हा दिव्यांचा उत्सव आहे. तिमिराकडून तेजाकडे म्हणजेच अंधाराकडून प्रकाशाकडे नेण्याची शिकवण दीप आपल्याला देतो. कोणी कितीही गरीब असला तरी त्याच्या घरी दिवाळी दरवर्षी साजरी होतेच. दिवाळीच्या निमित्ताने घर आणि सभोवतालचा परिसर स्वच्छ केला जातो, घराला रंगरंगोटी केली जाते, या सहा दिवसांत दाराबाहेर आकाशकंदील लावला जातो. दाराजवळ सुबक रांगोळी काढली जाते. दारात आणि तुळशीजवळ तेलाच्या पणत्या लावल्या जातात. घरोघरी लाडू, चकली कारंज्यांचा फराळ बनवला जातो. आप्तेष्टांना, मित्र मंडळींना दिवाळीच्या आणि पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या जातात. हीच दिवाळी साजरी करण्याची परंपरागत पद्धत. या सर्वांत फटाके वाजवणे कुठेच बसत नाही, मग ही प्रथा दिवाळीत शिरली तरी कुठून ? एरव्ही लग्न समारंभ, उदघाटनाच्या कार्यक्रमांत, मिरवणुकांमध्ये आणि राजकीय सभांच्या वेळी आतषबाजी म्हणून फटाके फोडणे एकवेळ मान्य; मात्र दिवाळीसारख्या धार्मिक सणाचा आणि फटाके फोडण्याचा काय संबंध ?

सुमारे २२०० वर्षांपूर्वी चीनच्या लुईयाँग प्रांतात फटाके फोडल्याचा संदर्भ आढळतो. आगपेटीच्या काडीप्रमाणे काठ्यांच्या टोकाला ज्वालाग्राही पदार्थाची गाठ बनवली जाई आणि ही गाठ आगीत धरल्यावर तिचा आवाज येत असे. ही आतषबाजी पुढे लग्नसमारंभांना होऊ लागली. १९२३ मध्ये भारतातील कोलकात्यामध्ये नाडर बंधूंनी आगपेटीच्या कारखान्यांमध्ये सर्वप्रथम फटाक्यांची निर्मिती केली. १९४० मध्ये तामिळनाडूतील शिवकाशी येथे फटाक्यांचा पहिला कारखाना सुरु झाला. तेव्हापासून आजतागायत शिवकाशी मध्ये अविरतपणे फटाक्यांची निर्मिती सुरु आहे. आजमितीला शिवकाशी येथे फटाक्यांचे मोठमोठे कारखाने तयार झाले आहेत. येथून संपूर्ण भारतात फटाके पुरवले जातात. शिवकाशी येथे तयार केल्या जाणाऱ्या फटाक्यांना भारतभरातून विशेष मागणी आहे. दिवाळी सणाला सहस्रो वर्षांचा इतिहास आहे आणि फटाके बनवणारा पहिला कारखाना भारतात ८३ वर्षांपूर्वी तयार झाला आहे याचाच अर्थ दिवाळीत फटाके फोडण्याच्या प्रथेला कोणताही शास्त्रीय आधार नाही. पूर्वीचे राजे महाराजे आनंदाच्या क्षणी आतषबाजी करत असल्याचे दाखले इतिहासात सापडतात. ही आतषबाजी आता फटाक्यांच्या रूपाने दिवाळीत सर्वत्र होऊ लागली आहे. स्वातंत्र्य दिनाच्या किंवा सांस्कृतिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांत आतषबाजी करण्याची प्रथा पाश्चात्य देशांमध्ये सुद्धा आहे, मात्र ही आतषबाजी केवळ शोभेच्या फटाक्यांपुरती सीमित असते. आपल्याकडे मात्र शोभेपेक्षा अधिकाधिक आवाजाच्या फटाक्यांचीच स्पर्धा प्रतिवर्षी पाहायला मिळते.

दिवाळीच्या तोंडावर दरवर्षी प्रशासनाकडून फटाके फोडण्यासंदर्भातील नियमावली जाहीर केली जाते ज्यामध्ये आवाजाच्या मर्यादेपासून फटाके फोडण्यासाठीची निषध्द क्षेत्रेही नमूद केलेली असतात. मात्र शहरासारख्या ठिकाणी या नियमावलीला सर्रासपणे हरताळ फासला जातो. सर्वत्रच फटाक्यांची आतषबाजी सुरु असल्याने कारवाई तरी कोणावर करणार, असा यक्ष प्रश्न प्रशासनासमोर असतो. आजमितीला लोकसंख्येत अव्वल असलेल्या भारतातील बराचसा भाग दारिद्र्यरेषेखाली जीवन कंठत आहे, ज्यांना दोन वेळेचे पोटभर अन्न मिळणेही दुरापास्त आहे. देशातील कित्येक गावे कुपोषित आहेत. दिवसागणिक वाढत जाणाऱ्या महागाईने सर्वसामान्यांचे जगणे मुश्किल केले आहे. अशा परिस्थितीत केवळ क्षणिक मौजेखातर फटाक्यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची राख-रांगोळी करणे कितपत योग्य आहे ? शिवकाशी हे ठिकाण अव्वल दर्जाचे फटाके बनविण्यासाठी देशभर प्रसिद्ध आहे ; मात्र याच शिवकाशीमध्ये दरवर्षी फटाक्यांच्या कारखान्यांना आगी लागून जीवित आणि वित्तहानी होण्याच्या अनेक घटना घडत असतात. या कारखान्यांतील दारूच्या प्रभावामुळे कारखान्यांत काम करणाऱ्या कितीतरी लहान मुलांना, कामगारांना असाध्य आजार जडतात, कायमचे अपंगत्व येते. याशिवाय दिवाळीच्या दरम्यान फटाक्यांच्या गोदामांना, दुकानांना आगी लागल्याच्या अनेक बातम्या दरवर्षी वाचनात येतात. फटाके फोडताना कित्येक जण भाजतात, जळके फटाके इतरत्र उडाल्यामुळे आगी लागण्याच्या घटना घडतात ज्यामध्ये दरवर्षी शेकडो जण मृत्युमुखी पडतात तर हजारो जण जखमी होतात. याकाळात अग्निशमन दलावर प्रचंड ताण असतो. याशिवाय केवळ फटाक्यांच्या कारणावरून अनेक ठिकाणी भांडणे, मारामाऱ्या होतात त्या वेगळ्या.



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई**
**मो.क्र. ९६६४५५९७८०**

कानठळ्या बसवणाऱ्या आवाजाच्या फटाक्यांमुळे इमारतींना तडे जातात, खिडक्यांच्या काचा फुटतात तसेच सिलींगचे प्लास्टरिंग सैल होण्याचाही धोका असतो. विजेचे काचेचे बल्बही फटाक्यांच्या आवाजामुळे फुटतात. दिवाळीत फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांमुळे लोकांच्या आरोग्यावर सर्वाधिक परिणाम होतो. कानठळ्या बसवणाऱ्या फटाक्यांमुळे कायमचा बहिरेपणा येऊ शकतो. अतिआवाजामुळे कान बधीर होतात. श्रवणयंत्रणातील पेशी एकदा मृत झाल्या की, त्या पुन्हा नव्याने निर्माण होत नाहीत. गर्भवती महिला, दीर्घ आजाराने ग्रस्त असलेले रुग्ण आणि नवजात बालके यांच्यावर फटाक्यांच्या आवाजाचा भयंकर परिणाम होतो. मायग्रेन, रक्तदाब आणि हृदयविकाराचा त्रास असणाऱ्या रुग्णांच्या त्रासामध्ये फटाक्यांच्या अतिआवाजामुळे अधिक वाढ होण्याची शक्यता असते. फटाके फोडल्यावर निर्माण होणाऱ्या विषारी धुरामुळे प्रचंड वायुप्रदूषण होते ज्याचा त्रास लहान मुलांसह अस्थमा आणि फुफुसाचा आजार असलेल्यांना अधिक होत असतो. अमेरिकेसारख्या विकसित देशात मानवी आरोग्यावर परिणाम करणाऱ्या फटाक्यांवर बंदी घालण्यात आली आहे. न्यूझीलंड, इटली, फ्रान्स, बेल्जियम या देशांत केवळ प्रौढ व्यक्तींनाच फटाके विकत घेण्यास आणि फोडण्यास अनुमती आहे. आपल्याकडे मात्र असे कोणतेही धोरण प्रशासनाने आखलेले नाही. उलट इथे घरातील प्रौढच फटाके आणून ती लहानांना फोडण्यासाठी उपलब्ध करून देतात.

दिवाळीतील लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घराघरात श्री महालक्ष्मी आणि श्री कुबेराचे पूजन केले जाते. लक्ष्मी ही धनाची देवता आहे तर कुबेर हा धनसंचयाचा देव आहे. एकीकडे योग्य मार्गाने धन प्राप्ती होण्यासाठी देवी लक्ष्मीची आणि आलेले धन टिकून राहावे यासाठी कुबेराची पूजा करायची आणि दुसरीकडे लक्ष्मीच्या कृपेने मिळालेले धन फटाक्यांच्या माध्यमातून विनाकारण व्यय करायचे हा विरोधाभास नव्हे काय ? प्राचीन युगात राक्षस नागरिकांना त्रास देऊन असुरी आनंद मिळवायचे. आताच्या काळी फटाके फोडून इतरांना त्रास देऊन साजरा केल्या जाणाऱ्या आनंदाला असुरी आनंदच म्हणावे लागेल. आपल्याला एखादा आजार झाला कि त्यावर वेळीच उपचार घेऊन आपण त्याचे निराकरण करतो. फटाक्यांच्या रूपाने आपल्या हिंदू संस्कृतीतील दीपावली सारख्या व्यापक आणि सात्विक सणाला एकप्रकारचा आजारच जडला आहे. तो दूर करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. दीपावलीच्या तेजाला लागलेली फटाक्यांची काजळी दूर करून तिला पुनर्रतेज प्राप्त करून द्यायचे असेल, तर सुरुवात आपल्या घरापासूनच करावी लागेल.

## गोरगरीब, निराधारांसोबत दिवाळी साजरी करूया...

एकीकडे श्रीमंतांची दिवाळी धुमधडाक्यात, आनंदात व फटाक्याच्या आतिषबाजीत मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरी होते. महागडे कपडे, रंगीबेरंगी हायफाय साड्या, आकाश कंदील, दिव्यांची रोषणाई, वेगवेगळ्या प्रकारचे अंगावर दागिने, हजारो रुपयांचे फटाके आणि चांगल्या कालिटीचे फराळाचे विविध पदार्थ बनवून श्रीमंतांची दिवाळी शाही थाटात साजरी होते. ही दिवाळी म्हणजे श्रीमंतांचाच सण आहे की काय? असे वाटते. श्रीमंतांनी शाही थाटात दिवाळी साजरी करायची आणि गरिबांनी त्यांचा थाट व रुबाब बघतच राहायचा, हे असे कसे चालणार? गोरगरीब, निराधार, शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर व वृद्धाश्रमात खितपत पडलेले ज्येष्ठ नागरिक यांची दिवाळी मात्र सालाचे बारा महिने सारखीच आहे. यांच्या जीवनातील दुःखाचा डोंगर नष्ट होऊन आनंदाचे क्षण कधी येतील ? वाटत होते, यंदा पाऊस काळ चांगला झाला आहे, शेतकऱ्यांची व कष्टकऱ्यांची दिवाळी आनंदात साजरी होईल. परंतु नेमकीच शेतकऱ्यांच्या हातात आलेली सुगी अतिवृष्टीने हिरावून नेली. आणि शेतकऱ्यांचे अर्थचक्र पूर्णतः कोलमडून गेले. अवेळी धो धो बरसणाऱ्या पावसाने शेतकऱ्यांच्या आशा व अपेक्षा उध्वस्त करून टाकल्या. शेतकऱ्यांनी अगोदरच कर्ज काढून शेतात पेरणी केली होती. आणि आता त्यातच पावसाने शेतीची अवस्था बटबटीत करून टाकली आहे. त्यामुळे यंदा शेतकऱ्यांची दिवाळी गोड होईल, असे मला तर वाटत नाही. त्यासाठी श्रीमंतांनी गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी व शेतमजुरांचा विचार करून आपल्या कमाईतील काही हिस्सा शेतकऱ्यांना देऊन शेतकऱ्यांची दिवाळी गोड करावी. फूटपाथवर राहणारे, रस्त्याच्या कडेला राहणारे, पालात राहणारे आणि वृद्धाश्रमात व अनाथाश्रमात खितपत पडलेल्या गरजू व निराधार लोकांना आर्थिक मदत करून त्यांची दिवाळी गोड साजरी केली तर तुमच्या जीवनात निर्माण होणारा आनंद खरोखरच आगळावेगळा व अवर्णनीय असेल. परिवारा सोबत दिवाळी साजरी करण्यापेक्षा निराधारांसोबत दिवाळी साजरी करून त्यांच्या जीवनात आनंद निर्माण केला तर तुमच्या जीवनात आनंदाची मंगलमय पहाट उगवायला वेळ लागणार नाही. परिवारासोबत दिवाळी साजरी करण्यात आनंद तर आहेच पण गोरगरीब, निराधार, शेतकरी व शेतमजुरांसोबत दिवाळी साजरी करण्यात त्यापेक्षाही अधिक आनंद आहे. त्यासाठी ज्यांचे आर्थिक उत्पन्न जास्त आहे, अशा श्रीमंत लोकांना विनंती आहे की बाबांनो, वृद्धाश्रमात जाऊन तेथील वृद्धांना विविध प्रकारचे फराळ, नवेकोरे कपडे आणि इतर भेटवस्तू देऊन एक दिवस त्यांच्या समवेत दिवाळी साजरी करावी. अनाथांना, निराधारांना व शेतकऱ्यांना आपल्या परीने शक्य होईल तेवढी आर्थिक मदत करून त्यांची ही दिवाळी गोड करावी..ज्यांना आई-वडील नाहीत अशा निराधारांना व अनाथांना अनाथाश्रमात जाऊन त्यांना आर्थिक व मानसिक आधार देऊन त्यांचे अश्रू पुसले तर खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल. पण एवढ्या दानशूर व उदार मनाचे परोपकारी माणसे आपल्या देशात खरंच आहेत का ? असले तरीही त्यांच्या मनात गोरगरिबांप्रती व निराधारांप्रती सहानुभूती व करुणा आहे का? राजकीय क्षेत्रात, क्रीडा क्षेत्रात, कलाक्षेत्रात, चित्रपट क्षेत्रात आणि शासकीय क्षेत्रात मोठ्या पदावर विराजमान असणाऱ्या महान हस्ती आपल्या देशात खूप आहेत. त्यांच्याकडे गरजेपेक्षा जास्त पैसा आहे. त्यांच्या शेकडोपिढ्या त्या पैशावर बसून खातील एवढा अमाप पैसा व संपत्ती त्यांच्या नावे आहे. त्यांनी आपल्या कमाईतील थोडाफार पैसा गोरगरीब, निराधार, शेतकरी, कष्टकरी, दुःखी व पीडित लोकांच्या भल्यासाठी व कल्याणासाठी लावला तर आपला भारत देश प्रगतीचे आणखीन एक दमदार पाऊल टाकेल. हजारो रुपयांचे फटाके फोडून प्रदूषण करण्यापेक्षा, हजारो रुपये दारू व मटक्यावर उधळण्यापेक्षा, वाढदिवसावर भरमसाठ पैसा खर्च करण्यापेक्षा तोच पैसा दिवाळीच्या निमित्ताने वृद्धाश्रमांना, अनाथाश्रमांना, कर्जबाजारी शेतकऱ्यांना, दुःखी व पिढीत लोकांना आणि गरजू व निराधार लोकांना आर्थिक सहाय्य म्हणून दिला तर त्यांच्या जीवनात आनंदाचे क्षण व आनंदाचा गोडवा नक्कीच निर्माण होईल. आणि त्यांना मदत केल्याचा आगळावेगळा आनंद तुमच्याही जीवनात प्राप्त होईल. म्हणून यंदा दिवाळीच्या निमित्ताने संकल्प करूया की, आपल्याने शक्य होईल तेवढी आर्थिक मदत शेतकऱ्यांना, शेतमजुरांना, निराधारांना व गरजूंना करून त्यांच्या जीवनात आनंदाचे क्षण व आनंदाचा गोडवा आणून आपल्याही जीवनात आनंदाची पेरणी करूया...त्यासाठी शासनाची वाट बघत बसू नका.... शासन एकमेकांवर टीका करण्यात व एकमेकांच्या चुका शोधण्यात रममान झाले आहे..शासन शेतकऱ्यांना व निराधारांना मदत करेल याची शाश्वती कोणीही देऊ शकत नाही..कारण आजकालचे सरकार गरिबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे न राहता श्रीमंतांच्या पाठीशी उभे राहत आहे.. त्यांना गरिबांपेक्षा धन दांडग्यांचीच जास्त काळजी असते... ज्या दिवशी सरकार तन-मन-धनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहुन शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेईल व शेतकऱ्यांना आर्थिक व मानसिक पाठबळ देईल त्यादिवशी आपला देश प्रगतीच्या उंबरठ्यावर असेल...

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर
मो.७४९८७१५६६१

### अशोकायन...

**कर्जमाफीचा नाद ?**

व्यक्ति तितक्या प्रकृती
प्रकृती नुसार असती नाद
त्याबद्दल आपण -
कशाला करायचा वाद . .

निसर्गाला नाद आहे
बळीला करणे त्रस्त
दरवर्षी घेऊन येतो
विविध समस्याचे अस्त्र . .

बळी तरी काय करेल -
निसर्गापुढे पत्करतो शरणागती
फुकटात तुम्हाले सत्ता देतो
म्हणून करतोय -
कर्जमाफीची विनंती . .



**प्रा.अशोक सारडा मेहकर**
**(९४२२३९४३३९)**

# नेस्ले इंडियाने वर्ल्ड फूड इंडिया येथे अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयासोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी



**मुंबई, १३ ऑक्टोबर :** नेस्ले इंडियाने भारताप्रती आपली कटिबद्धता अधिक दृढ केली, जेथे ओडिशामधील व त्यांच्या विद्यमान उत्पादन ठिकाणी ग्रीन फिल्ड व ब्राऊन फिल्ड प्रकल्पांमध्ये गुंतवणूका वाढवण्यासाठी अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयासोबत (एमओएफपीआय) सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी केली. नवी दिल्लीमध्ये वर्ल्ड फूड इंडिया समिट २०२५ येथे या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

नेस्ले इंडियाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. मनिष तिवारी म्हणाले, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयासोबत या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यामधून पुढील २ ते ३ वर्षांच्या कालावधीत ओडिशा आणि विद्यमान उत्पादन ठिकाणी ग्रीन फिल्ड व ब्राऊन फिल्ड प्रकल्पांमधील अन्न प्रक्रिया क्षेत्रात गुंतवणूक करण्याप्रती नेस्ले इंडियाची कटिबद्धता दिसून येते. यामुळे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार संधी निर्माण होण्याची देखील अपेक्षा आहे, ज्यामुळे भारताच्या विकासगाथेप्रती आमची कटिबद्धता अधिक दृढ होईल, तसेच आम्ही आत्मनिर्भर भारताच्या दिशेने हा प्रवास सुरू ठेवला आहे.

नेस्ले इंडियाने शाश्वत, सर्वसमावेशक व भविष्याकरिता सुसज्ज खाद्य यंत्रणा निर्माण करण्यावर, ब्रँड्स व पायाभूत सुविधेमध्ये गुंतवणूक करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे, जे आर्थिक प्रगतीला चालना देईल आणि सर्व नागरिकांसाठी जीवनाचा दर्जा उंचावतील. तसेच, साहसी नाविन्यतांच्या माध्यमातून कंपनी ग्राहकांना जलदपणे, अधिक मोठ्या प्रमाणात आणि सर्वोत्तम उत्पादने व अनुभव देण्याप्रती कटिबद्ध आहे.

नेस्ले इंडियाच्या कॉर्पोरेट अफेअर्सचे संचालक श्री. कुंवर हिम्मत सिंग म्हणाले, भारतात ११३ वर्षांहून अधिक काळाच्या उपस्थितीसह नेस्ले इंडिया १००,००० हून अधिक शेतकऱ्यांसोबत काम करते, ज्यामध्ये दुग्धव्यवसाय, कॉफी, मसाले, गहू, ऊस व तांदूळ यांचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचा समावेश आहे, तसेच पुरवठादारांसोबत प्रबळ सहयोग देखील आहे. भारतातील आमच्या नऊ फॅक्टरी उच्च दर्जाची व मानकांची उत्पादने उत्पादित करतात, जी १०,००० वितरक व पुनर्वितरक आणि ५.२ दशलक्ष रिटेल आउटलेट्सच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहोचतात.''

नेस्ले इंडियाच्या सामाजिक उपक्रमांनी पोषण जागरूकता उपक्रम, शिक्षण, कचरा व्यवस्थापन, शुद्ध पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, स्वच्छता, आहार सहाय्य हस्तक्षेप आणि रस्त्यावरील खाद्य विक्रेत्यांना अन्न सुरक्षा व स्वच्छतेबाबत प्रशिक्षण अशा उपक्रमांच्या माध्यमातून १६ दशलक्षहून अधिक व्यक्तींच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. तसेच, नेस्ले इंडिया सामुदायिक कल्याण वाढवण्यासाठी भारतातील गाव दत्तक उपक्रमांमध्ये सक्रियपणे सामील होते.

# टाटा एआयजी सर्वेक्षणात दर ४ पैकी ३ कार्डिओलॉजिस्ट्सनी सांगितले की, बहुतांश हृदयरोगी ५० वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत

**मुंबई, १३ ऑक्टोबर :** भारतातील एक आघाडीची जनरल इन्श्युरन्स कंपनी, टाटा एआयजी जनरल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेडने आपल्या राष्ट्रव्यापी सर्वेक्षणाचे निष्कर्ष आज प्रकाशित केले. यामध्ये जवळपास ३०० कार्डिओलॉजिस्ट्सचे प्रतिसाद नोंदवले गेले आहेत. या सर्वेक्षणामध्ये दिसून आले आहे की, हृदयाच्या गंभीर आजारांचा सामना करावा लागण्याचे प्रमाण युवा भारतीयांमध्ये चिंताजनक आहे, त्यासोबतच प्राथमिक लक्षणांबाबत लोकांचे अज्ञान आणि अपुरी आर्थिक तयारी या गोष्टी देखील दिसून आल्या आहेत.

हे सर्वेक्षण गेल्या एका दशकामध्ये हृदयावरील उपचार आणि देखभालीमध्ये घडून आलेले खूप मोठे परिवर्तन दर्शवतात. अभ्यासातून समजून आले आहे की कोणत्या प्रकारचे हृदयाचे आजार युवा भारतीयांना वेगाने प्रभावित करत आहेत, ७४% डॉक्टरांनी सांगितले आहे की, त्यांचे बहुतांश रुग्ण हे ५० वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत. सध्या ३६% डॉक्टरांकडे येणाऱ्या हृदय रुग्णांचा वयोगट ३१ ते ४० या दरम्यानचा आहे, आणि ३८% डॉक्टरांकडे ४१ ते ५० या दरम्यानच्या वयोगटाचे रुग्ण येतात. एक दशकाआधी ८७% केसेस ४१ वर्षे आणि त्यापेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींच्या असायच्या.

सर्वेक्षणाच्या निष्कर्षांबाबत, सिनियर एक्झिक्युटिव्ह व्हाईस प्रेसिडेंट आणि कन्झ्युमर क्लेम्सचे नॅशनल हेड राजगोपाल रुद्राजू यांनी सांगितले, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की, भारतासमोरील हृदयसंबंधी आव्हान मेडिकल आणि आर्थिक दोन्ही आहे. तरुणांमध्ये हृदयरोगाच्या केसेस वाढण्याचा अर्थ असा आहे की, अनेक कुटुंबे या समस्यांसाठी भावनात्मक आणि आर्थिक दोन्ही दृष्ट्या तयार नसतात. गेल्या पाच वर्षात, कार्डिओलॉजी उपचारांचा खर्च जवळपास ६५% नी वाढला आहे. चिंताजनक बाब अशी की, ७८% डॉक्टरांनी सांगितले की, रुग्ण छातीमध्ये वेदना किंवा बेचैनीकडे दुर्लक्ष करतात, पण खरे पाहता हे हृदयसंबंधी समस्यांचे प्राथमिक लक्षण असू शकते. अनेक लोक स्वास घ्यायला त्रास होणे आणि कोणतेही स्पष्ट कारण नसताना थकायला होणे अशा लक्षणांकडे देखील लक्ष देत नाहीत आणि मग निदान करण्यात उशीर होतो. सर्वेक्षणात समजले आहे की, भारतामध्ये हृदयरोगाच्या वाढत्या घटनांमागे एक मुख्य कारण म्हणजे आरोग्याला अपायकारक आहार व खूप जास्त ताणतणाव हे आहे. त्याहीपेक्षा वाईट गोष्ट म्हणजे, अनेक रुग्ण हृदयाचे खूप जास्त नुकसान झाल्यानंतरच वैद्यकीय मदत घ्यायला जातात.

कार्डिओलॉजिस्ट्सनी हे देखील सांगितले आहे की, प्राथमिक लक्षणांकडे दुर्लक्ष केले जाते. जवळपास दहापैकी आठ जणांनी सांगितले आहे की, छातीमध्ये वेदना आणि स्वास घ्यायला त्रास होणे अशी गंभीर लक्षणे दिसून देखील त्याकडे दुर्लक्ष केले जाते, तर काही लोक थकवा आणि ताणतणाव यांना सामान्य मानून त्याकडे दुर्लक्ष करतात. ६०% पेक्षा जास्त कार्डिओलॉजिस्ट्सचे असे मानणे आहे की, साधारणतः रुग्ण हृदयाचे खूप जास्त नुकसान झाल्यानंतर हॉस्पिटलमध्ये येतात.

# जागतिक दर्जाच्या गिअरबॉक्स तंत्रज्ञानावर चालणारे हे नवे ट्रॅक्टर

**अमरावती, १३ ऑक्टोबर :** ग्रोमॅक्स अ‍ॅग्री इक्विपमेंट लिमिटेड (पूर्वीचे महिंद्रा गुजरात ट्रॅक्टर लिमिटेड), जे महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड आणि गुजरात सरकार यांच्यातील संयुक्त उद्यम आहे, यांनी ४डब्ल्यूडी आणि २डब्ल्यूडी कॅटेगिरीमध्ये ८ नवे ट्रॅक्टर लॉन्च केले आहेत. यामध्ये भारतातील पहिली फॅक्टरी-फिटेड केबिन सिरीज (सब-५० एचपी सेगमेंट) समाविष्ट आहे.

या नव्या ट्रॅक्टरशिवाय, ग्रोमॅक्सने आपल्या सबसे सही चुनाव कॅम्पेनअंतर्गत दुसरा डीव्हीसीएच (डिजिटल व्हिडिओ कमर्शियल) लॉन्च केला आहे. या नव्या मोहिमेत ग्रोमॅक्सची उत्पादने परफॉर्मन्स, उत्पादकता आणि नफा या दृष्टीने शेतकऱ्यांसाठी परवडणारी आणि योग्य निवड असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.

लॉन्चच्या वेळी बोलताना वीजय नाकरा प्रेसिडेंट, फार्म इक्विपमेंट बिझनेस, महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड म्हणाले, ग्रोमॅक्समध्ये आमचे ध्येय म्हणजे भारतीय शेतीच्या बदलत्या गरजांना अनुरूप, विश्वासार्ह उत्पादने उपलब्ध करून मॅक्सिमम ग्रोथ साध्य करणे. एका दिवसात ८ नवे ट्रॅक्टर सादर करताना आम्हाला अभिमान वाटतो. प्रत्येक ट्रॅक्टर जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानावर आधारित असून शेतकऱ्यांच्या वर्षभर उत्पादनक्षमतेसाठी सक्षम बनवण्यासाठी डिझाइन केले गेले आहे. भारताचा पहिला सब-५० एचपी फॅक्टरी-फिटेड केबिन ट्रॅक्टर लॉन्च करून, ग्रोमॅक्स मूल्य, परफॉर्मन्स आणि परवडणारी किंमत यांचा आदर्श समतोल शोधणाऱ्या वाढत्या ग्राहकवर्गाची सेवा करत आहे. उत्सव काळात लॉन्च झाल्याने हे नवे ट्रॅक्टर ऑक्टोबर २०२५ पासून ग्रोमॅक्स डिलरशिप्सवर उपलब्ध होणार आहेत.

# मीडियाटेकने डिमेन्सिटी ९५०० चिपसेट सादर केली

**मुंबई, १३ ऑक्टोबर :** दरवर्षी दोन अब्जांहून अधिक कनेक्टेड उपकरणांना सामर्थ्य देणारी अग्रगण्य जागतिक फॅब्लेस सेमीकंडक्टर कंपनी मीडियाटेकने अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) भविष्यास आकार देण्याचा आपला संकल्प मांडला. तसेच, मीडियाटेकने टीएसएमसीसोबत सहकार्य करत एन२पी प्रक्रियावर आधारित पुढील पिढीचे फ्लॅगशिप प्रणाली-ऑन-चिप (एसओसी) विकसित करण्याची घोषणा केली असून, त्याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन पुढील वर्षाच्या अखेरीस अपेक्षित आहे.स्वतःच्या विशेष मीडिया ब्रिफिंगदरम्यान मीडियाटेकने आपले नवीन फ्लॅगशिप चिपसेट मीडियाटेक डिमेन्सिटी ९५०० सादर केले, जे पुढील पिढीच्या फ्लॅगशिप फाईव्ह जी स्मार्टफोनची कार्यक्षमता अधिक वाढवण्यासाठी डिझाइन केले गेले आहे. हे चिपसेट उद्योगातील अग्रगण्य ऑन-डिव्हाइस एआय, कन्सोल-ग्रेड गेमिंग आणि अप्रतिम ऊर्जा कार्यक्षमतेला एकत्र आणून मोबाइल कार्यक्षमतेची नवी व्याख्या घडवते.

मीडियाटेकने आपल्या अत्याधुनिक एआय आणि गेमिंग डेमोद्वारे मीडियाटेक डायमेन्सिटी ९५०० या फ्लॅगशिप चिपसेटची संपूर्ण क्षमता प्रदर्शित केली. यामध्ये इमेज-टू-इमेज स्टाईल कन्व्हर्जन, फोर के रेझोल्यूशन टेक्स्ट-टू-इमेज जनरेशन यासारख्या एआय क्षमतांचा समावेश होता. तसेच, मीडियाटेक डायमेन्सिटी ९५०० चिपसेट अनरियल इंजिन तंत्रज्ञानामधील मेगा लाइट आणि नॅनाईट यांना समर्थन देतो, ज्यामुळे मोबाईल डिव्हाइसेसवर कन्सोल-ग्रेड दर्जाचे रिअल-टाईम दृश्य, डायनॅमिक लाईटिंग आणि एए-गुणवत्तेचे तपशील मिळतात.या सत्रात विवो, ओप्पो, सॅमसंग, टेक्नो आणि लावा यांसारख्या ओईएम भागीदारांनी सहभाग नोंदवला. या वेळी ओप्पो इंडियाचे जनसंपर्क आणि संप्रेषण विभागप्रमुख गोल्डी पटनायक यांनी डायमेन्सिटी ९५०० एसओसी ने सुसज्ज असलेल्या आगामी फाईंड एक्स ९ सिरीजच्या ओप्पोच्या नव्या मालिकेबाबत मुख्य भाषण दिले.

मीडियाटेक इंडिया चे व्यवस्थापकीय संचालक अंकू जैन यांनी सांगितले, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनत असताना, ग्राहकांना अधिक बुद्धिमत्ता, वेग आणि वैयक्तिक अनुभव देणारी तसेच ऊर्जाक्षम उपकरणे अपेक्षित आहेत. आमचा फ्लॅगशिप मीडियाटेक डायमेन्सिटी ९५०० हा ऑन-डिव्हाइस एआयमध्ये क्रांतिकारी प्रगती, उच्च कार्यक्षमता आणि कार्यक्षमतेसह प्रीमियम अनुभवांचा संपूर्ण संच प्रदान करतो, जे आमचे ओईएम भागीदार जगभरातील वापरकर्त्यांपर्यंत पोहोचवू शकतात.

इन्व्हेन्ट टू ट्रान्सफॉर्म या आयएमसी २०२५ च्या विषयाशी सुसंगत राहून, मीडियाटेकने कनेक्टिव्हिटी, संगणन आणि मल्टिमीडिया उत्पादनांतील तसेच तंत्रज्ञानातील आपल्या दीर्घकालीन कौशल्यावर प्रकाश टाकला आहे.मीडियाटेकने आपल्या नवीन तंत्रज्ञान पोर्टफोलिओचेही सादरीकरण केले, ज्यामध्ये जगभरातील अग्रगण्य ब्रँड्सच्या विविध क्षेत्रांतील मीडियाटेक-सक्षम उपकरणांचा समावेश होता. यामधील विशेष आकर्षणांमध्ये मीडियाटेक कॉम्पॅनिओ ५२० वर आधारित एचपी जीएम क्रोमबुक, मीडियाटेक डायमेन्सिटी ९३००+ असलेला विवो एक्स२०० एफई तसेच मीडियाटेक वर आधारित ल्युमिओ आर्क ५ प्रोजेक्टर यांचा समावेश होता.



# वर्ल्ड मेन्टल हेल्थ डे निमित्त कलाकारांनी सांगितल्या टिप्स

**मुंबई, १३ ऑक्टोबर :** वर्ल्ड मेन्टल हेल्थ डे निमित्त एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री प्रियमवदा कांत (लतिका, 'घरवाली पेडवाली'), हिमानी शिवपुरी (कटोरी अम्मा, 'हप्पू की उलटन पलटन') आणि शुभांगी अत्रे (अंगूरी भाबी, 'भाबीजी घर पर है') त्यांचे मानसिक आरोग्य उत्तम ठेवण्याला आणि शोबीझच्या सुरेख गोंधळादरम्यान अंतर्गत शांतता राखण्याला कशाप्रकारे प्राधान्य देतात, याबाबत सांगत आहेत. आगामी मालिका 'घरवाली पेडवाली'मधील प्रियमवदा कांत ऊर्फ लतिका म्हणाल्या, ''मी मानसिक आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी अधूनमधून ब्रेक घेते, तसेच कामामध्ये काहीशा मर्यादा राखते, ज्यामुळे मला शांतता मिळते. आमच्या कामाचा अनेकदा भावनिक त्रास होतो, म्हणून मी सेटवरून आल्यानंतर कामापासून पूर्णतः दूर राहते.''

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील हिमानी शिवपुरी ऊर्फ कटोरी अम्मा म्हणाल्या, ''आमची पिढी मानसिक आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष करते, पण आजची तरुण पिढी मला त्यांची जागरूकता व मोकळेपणासह प्रेरित करते. मी सकाळी प्रार्थना करते आणि निसर्गाच्या सान्निध्यात काही मिनिटे जॉगिंग करते.''

मालिका 'भाबीजी घर पर है'मधील शुभांगी अत्रे ऊर्फ अंगूरी भाबी म्हणाल्या, ''आमचे प्रोफेशन भावनांवर आधारित आहे, ज्यामुळे आमच्या मानसिक आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. माझा ऊर्जेवर संतुलन राखण्यावर विश्वास आहे.

# शुभांगी अत्रे २५ वर्षांनंतर आपल्या मूळगावी परतल्या



**मुंबई, १३ ऑक्टोबर :** एण्ड टीव्हीवरील मालिका भाबीजी घर पर है'मध्ये अंगूरी भाबीची भूमिका साकारण्यासाठी लोकप्रिय शुभांगी अत्रे यांनी नुकतेच भावनिक जुन्या आठवणींचा अनुभव घेतला, जेथे त्या २५ वर्षांनंतर आपल्या मूळगावी परतल्या. शुभांगी यांनी सोशल मीडियावर त्यांच्या प्रवासाबाबत सांगितले, ज्यामध्ये त्यांच्या गावामधील हिरवेगार शेत व जवळच्या अंतरावर असलेले मंदिर आणि हृदयस्पर्शी कौटुंबिक क्षणांचा समावेश होता.

आपल्या हृदयस्पर्शी भावना व्यक्त करत शुभांगी अत्रे ऊर्फ अंगूरी भाबी म्हणाल्या, २५ वर्षांनंतर माझे मूळगाव इंदौरमधील माझ्या गावी परतल्यानंतर काही क्षणांत माझ्या बालपणीच्या आठवणी जागृत झाल्या. प्रत्येक कोपरा, प्रत्येक मार्गाची सांगण्याची एक कथा होती. मी एकेकाळी खेळलेल्या त्याच ब्रिजवर उभे राहण्याचा, बालपणी मी प्रार्थना करायची त्या मंदिराला भेट देण्याचा आणि ज्यांच्यासोबत लहानाची मोठी झाली त्यांना भेटण्याचा अनुभव उत्साहवर्धक होता. यामधून मला निरागसता आणि साधेपणाची आठवण आली, ज्यामुळे मी आजवर इथपर्यंत पोहोचली आहे. मला वेळ थांबल्यासारखे आणि त्या जुन्या आठवणी पुन्हा परतल्यासारखे वाटले. माझ्या गावाला पुन्हा परतल्यानंतर माझे मन कृतज्ञता आणि समाधानाने भरून आले.''

आपल्या भावना व्यक्त करत त्या पुढे म्हणाल्या, माझा वाटते की, मला माझ्या मूळ संस्कृतीशी संलग्न राहण्याचे महत्त्व माहित आहे. या वर्षाच्या सुरूवातीला देखील मी माझ्या मूळगावाला भेट दिली होती आणि जवळपास १८ वर्षांनंतर माझ्या कथक गुरूंची भेट घेतली होती. या पुनर्मिलनाने नृत्याप्रती माझ्या आवडीला पुन्हा जागृत केले आणि मला माझ्या जीवनात आणलेली शिस्तबद्धता व आनंदाची आठवण करून दिली. वेळ थांबल्यासारखे वाटले, जेथे मी माझा प्रवास सुरूवात केलेला क्षण आठवत भारावून गेले. २५ वर्षांनंतर माझ्या गावी परतल्यानंतर अनेक आठवणी व भावना जागृत झाल्या, ज्या माझ्या मनाच्या खूप जवळ आहेत.''

# सोनी सबचे कलाकार आपल्या दिवाळीच्या कौटुंबिक परंपरा आणि सुंदर आठवणींना उजाळा देत आहेत

**मुंबई, १३ ऑक्टोबर :** दिव्यांचा सण म्हणून साजरी होणारी दिवाळी आपल्यासोबत सुंदर आठवणी, धार्मिक विधी आणि कौटुंबिक परांपरांची आस्था घेऊन येते. दिव्यांच्या प्रकाशाने घर उजळून निघते हृदय कृतज्ञतेने भरते आणि वातावरणात फराळाचा सुगंध दरवळतो. हा दीपोत्सव साजरा करताना वयाचे बंधन आड येत नाही. समस्त कुटुंब एकत्र येते, हास्याची कारंजी उडतात, सगळे मिळून देवाची प्रार्थना करतात आणि कौटुंबिक रिवाज पाळतात. सोनी सबवरील कलाकार- श्रेनु परीख, गरिमा परिहार, समृद्ध बावा, नेहा एसके मेहता आणि ऋषी सक्सेना आपल्या दिवाळीच्या आठवणी, धार्मिक विधी आणि सणाचा आनंद द्विगुणित करणाऱ्या भेटी-गाठी याविषयी सांगत आहेत -

गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय मालिकेत देवी पार्वतीची भूमिका करणारी श्रेनु परीख म्हणते, माझ्यासाठी दिवाळी म्हणजे सगळ्यांनी एकत्र येणे आणि परंपरा. मला आठवते आहे, माझ्या आजी-आजोबांकडे आम्ही दिवाळी साजरी करायचो. माझा मामा वेगवेगळे फटाके घेऊन यायचा, माझी आजी मगज, करंज्या आणि बुंदी सारखे सुग्रास पदार्थ बनवायची आणि सगळा परिसर आनंदाने फुलून जायचा. वसूबारसेपासून ते लक्ष्मीपूजन आणि धनाची पूजा करण्यापासून ते रांगोळी काढण्यापर्यंतचे सर्व विधी माझ्या मनात रुतून बसले आहेत. आजही मी



तितक्याच उत्साहाने, आनंदाने आणि कृतज्ञ भावनेने माझ्या कुटुंबासोबत दिवाळी साजरी करते. 'गणेश कार्तिकेय' मालिकेत मी सध्या पार्वतीची भूमिका करत असल्याने यंदा हा सण माझ्यासाठी आणखी खास आहे.


पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दीप्तीची भूमिका करणारी गरिमा परिहार म्हणते, दिवाळी मला माझ्या बालपणात घेऊन जाते. माझी चुलत भावंडं आणि मी तासन तास रांगोळी काढण्यात आणि फटाके फोडण्यात घालवायचो. माझी आजी तिचे खास लाडू बनवायची, त्याचा सुगंध अजून माझ्या स्मरणात आहे. वयाने मी कितीही मोठी झाले तरी दिवाळीची बालसुलभ उत्सुकता मात्र तशीच राहील!

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत अश्विनची भूमिका करणारा समृद्ध बावा म्हणतो, माझ्यासाठी दिवाळी म्हणजे प्रकाश, फराळ आणि आनंदीआनंद. दिवाळीच्या आधी माझ्या आईला मी गुजिया बनवण्यात आणि घराची सफाई करण्यात मदत करायचो, ते मला स्पष्ट आठवते आहे. आजही, शूटिंगमध्ये कितीही व्यस्त असलो, तरी मी हा सण माझ्या कुटुंबासोबत आणि मित्रपरिवारासोबत साजरा करतो. आम्ही एकत्र मिळून देवाची आरती करतो आणि फराळावर ताव मरतो. दिवाळी नेहमी आपलेपणा आणि सकारात्मकता घेऊन येते.

इत्ती सी खुशी मालिकेत हेतलची भूमिका करणारी नेहा एसके मेहता म्हणते, माझ्यासाठी दिवाळी म्हणजे थोडी उसंत काढून मला घडवणाऱ्या परंपरांचा मान राखणे. मी वडनगरची आहे. आमच्याकडे दिवाळी हा कधीच छानछोकीचा सण नव्हता, तर सगळ्यांनी एकत्र येण्याला महत्त्व होते. घर सजवण्यात, पूजा करण्यात मी मदत करायचे. आम्ही शेजाऱ्यांशी फराळाची देवाणघेवाण करायचो, त्यात खूप आनंद होता. थिएटर आणि पडद्यावर अनेक वर्षे काम केल्यानंतर ते छोटे छोटे विधी आजही मला लोभस वाटतात. दिवाळी म्हणजे केवळ प्रकाश आणि मिठाई नाही तर दिवाळी म्हणजे नूतनीकरण, कृतज्ञता आणि सार्थक गोष्टींची जोपासना.

इत्ती सी खुशी मालिकेत संजयची भूमिका करणारा ऋषी सक्सेना म्हणतो, माझ्यासाठी पाहिल्यापासून दिवाळी म्हणजे अंतर्मुख होण्याचा आणि नातेसंबंधांचा सण आहे. मला आठवते आहे, संध्याकाळी आम्ही सर्व कुटुंबीय एकत्र असायचो, लक्ष्मीपूजा करायचो आणि मग गच्चीत जाऊन फटाके फोडायचो. या छोट्या छोट्या परंपरा सदैव तुमच्यासोबत राहतात. आजही, मला दिवाळी साधेपणाने पण दिवे प्रज्वलित करून, मिठाई वाटून आणि प्रियजनांसोबत समय व्यतीत करून, आपलेपणाने साजरी करायला आवडते.

# शब्दकोडे क्रमांक २२३९



**आडवे शब्द:-**
१) स्वातंत्र्यवीरांचे संपूर्ण नाव
११) कागदी चलन
१२) झाडाभोवतीचा कट्टा
१३) रममाण, निमग्न
१४) शिखराच्या छताचा मध्यभाग
१६) वाकलेला
१९) वारा
२०) हिंदीत सर्व
२१) दुसरे लग्न करणारी स्त्री
२२) दहावी रास
२४) पगारपत्रक
२७) नगरवासी
२८) सांभाळणारा, एक पालेभाजी
२९) पत्र
३२) विशेष
३३) एक चर्मवाद्य
३५) वयाने जास्त असलेला
३७) कलावंत
३९) दुधाच्या वड्या
४१) कडक
४२) नूतन
४३) मालाचा पुरवठा
४४) कल्लोळ, गोंधळ
४६) एखाद्या कामात सतत अडथळा येणे या अर्थाची म्हण
५०) रेशमी धोतर
५१) शिवसेनेचे पहिले मुख्यमंत्री मनोहर **
५२) पाताळ
५५) घागरा
५८) वार्ताहर
६१) बूड
६३) बाज विणण्याची सुती पट्टी
६५) मला
६६) वरच्या टरफलासह तांदूळ
६७) गोव्याची राजधानी
६८) आश्चर्याची गोष्ट, आश्चर्य
६९) काम, नशीब
७०) चाफा


**उभे शब्द:-**
१) भूदान यज्ञाचे प्रणेते
२) रंगमंचावर सादर होणारे नाट्य
३) खबदाडी
४) दरवाजा
५) उग्र वास
६) शेणामातीने जमीन गुळगुळीत करणे
७) देश, जमीन
८) कमळाचे तळे
९) दात
१०) जेमतेम
१५) फोडातील द्रव
१७) वणवा
१८) त्रासाची भुणभुण, बडबड
१९) परीक्षा देण्याची जागा
२१) भांडे
२२) सुसर
२३) जिनसांची यादी
२५) तपासणी करणारा
२६) धर
३०) अग्नी
३१) संगीतातील एक राग
३२) पणजोबांचे वडील
३४) मोटरसायकल
३६) रमापती
३७) श्रम मेहनत
३८) कर्णेंद्रिय
४०) सुळे, मोठे दात
४४) येणारा जाणारा, पै पाहुणा
४५) बोबडी वळाल्यानंतरची भाषा
४७) कदर करणारा
४८) लोचट, कोडगा, अतिशय बोलणारा
४९) पायजमा
५२) सांडलेले भाताचे कण
५४) उंट हाकणारा
५६) रत्न
५७) वेदनेची उसळी, खटका
५९) ठाणवई
६०) तास
६२) बांबू
६४) आवाज, ध्वनी
६६) सर्प

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# सॅमसंग फॅब ग्रॅब फेस्टने यंदा सणासुदीच्या काळात सर्वात मोठ्या ऑफर्ससह एआयची क्षमता आणली



**मुंबई, १३ ऑक्टोबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने ग्राहकांना यंदा सणासुदीच्या काळामध्ये आजपासून सुरू होत असलेला त्यांचा सर्वात मोठा शॉपिंग इव्हेण्ट 'फॅब ग्रॅब फेस्ट'दरम्यान आकर्षक किमतींत आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय)च्या क्षमतेचा अनुभव घेण्यास आवाहन केले आहे.

सॅमसंगच्या एआय-समर्थित टीव्ही, रेफ्रिजरेटर्स, वॉशिंग मशिन्स, स्मार्टफोन्स, मॉनिटर्स, साऊंड डिवाईसेसच्या व्यापक पोर्टफोलिओमध्ये विशेष उत्सवी ऑफर्ससह फॅब ग्रॅब फेस्ट ग्राहकांसाठी सॅमसंगच्या सर्वोत्तम परिसंस्थेत अपग्रेड होण्याकरिता अल्टिमेट संधी आहे, जे दैनंदिन राहणीमानाला उत्साहित करतात.

उल्लेखनीय बाब म्हणजे, जीएसटी कपातीनंतर नवीन कमी झालेल्या किमती आता एसी, टीव्ही आणि मॉनिटर्सवर देखील लागू आहे.


यंदा सणासुदीच्या काळात सॅमसंग आपल्या एआय-संचालित नाविन्यतांच्या शक्तिशाली पोर्टफोलिओसह प्रत्येक घरामध्ये भावी स्मार्ट राहणीमान घेऊन येत आहे. रिअल-टाइम भाषांतर, सर्वोत्तम फोटो एडिटिंग आणि उत्पादकता टूल्स सक्षम करणाऱ्या स्मार्टफोन्समधील उल्लेखनीय गॅलेक्सी एआयपासून कन्टेन्ट ऑप्टिमाइज करणारे एआय-सक्षम टेलिव्हिजन्स आणि सुधारित कार्यक्षमतेसाठी वापराच्या पद्धती जाणून घेणाऱ्या अप्लायन्सेसपर्यंत सॅमसंग आर्टिफिशियल इंटेलिजन्सला सहजसाध्य व प्रभावी करत आहे. स्मार्टफोन, टीव्ही, रेफ्रिजरेटर किंवा वॉशिंग मशिन असो प्रत्येक डिवाईस दैनंदिन टास्क्स सर्वोत्तम, वैयक्तिकृत आणि कनेक्टेड करण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे.

ग्राहक सॅमसंगच्या गॅलेक्सी स्मार्टफोन्स व लॅपटॉप्सच्या नवीन श्रेणीसह भविष्याकडे अपग्रेड होऊ शकतात, जे आता अपवादात्मक उत्सवी किमतींमध्ये उपलब्ध आहेत. ग्राहकांना गॅलेक्झी झेड फोल्ड७, गॅलेक्झी झेड फ्लिप७, गॅलेक्सी एस२५ अल्ट्रा, गॅलेक्सी एस२४ एफई, गॅलेक्सी ए५६ अशा प्रीमियम गॅलेक्सी स्मार्टफोन्सवर जवळपास ५३ टक्क्यांची सूट मिळवू शकतात.

चालता-फिरता उत्पादकतेसाठी गॅलेक्सी बुक५ प्रो ३६०, गॅलेक्सी बुक५ आणि बुक४ सिरीज आता जवळपास ५९ टक्के सूट व १७,४९० रूपयांच्या त्वरित बँक सूटसह उपलब्ध आहेत. आकर्षक डिझाइन्स, सर्वोत्तम डिस्प्ले आणि शक्तिशाली कार्यक्षमतेसह हे एआय-एकीकृत लॅपटॉप्स काम, सर्जनशीलता आणि सर्व गोष्टींसाठी उपयुक्त आहेत.

ग्राहक सॅमसंगच्या ब्लॉकबस्टर टीव्ही डिल्ससह घरामध्ये सिनेमॅटिक उत्कृष्टतेचा आनंद घेऊ शकतात. ग्राहक लोकप्रिय फ्रेम व निओ क्यूएलईडी मॉडेल्ससह सॅमसंग टेलिव्हिजन्सच्या व्यापक श्रेणीवर जवळपास ५१ टक्के सूटचा आनंद घेऊ शकतात.

जवळपास ५००० रूपयांचा एक्स्चेंज बोनस, जवळपास ३० महिन्यांसाठी स्थिर ईएमआय पर्याय आणि ३-वर्षांच्या वॉरंटीसह सॅमसंग बिग स्क्रिन घरी आणण्यासाठी ही सर्वोत्तम वेळ आहे.



# सानंद वर्मा यांनी यशाचे श्रेय सोशल मीडियापेक्षा कला व सकारात्मकतेला दिले!

**मुंबई, १३ ऑक्टोबर :** आजच्या धावपळीच्या युगामध्ये अनेक व्यक्ती सतत त्याच्या फोनमध्ये व्यस्त असतात, लाइक्स, फॉलोअर्स आणि क्षणभुंगर क्षणांचा पाठलाग यांमध्ये गुंतून जातात. पण सानंद वर्मा त्यांच्यापेक्षा वेगळे आहेत. ते एण्ड टीव्हीवरील मालिका 'भाबीजी घर पर है'मध्ये विलक्षण भूमिकेसाठी लोकप्रिय आहेत. विविध चित्रपटांमधील प्रभावी अभिनयासाठी त्यांचे कौतुक करण्यात आले आहे, ज्यासह त्यांना त्यांचा स्वत:चा मार्ग मिळाला आहे, ज्यामध्ये साधेपणा, सर्जनशीलता आणि मन:शांती सामावलेली आहे. त्यांचा प्रवास आठवण करून देतो की, खरे यश डिजिटल युगामध्ये नाही तर अर्थपूर्ण काम आणि वैयक्तिक विकासामध्ये सामावलेले आहे. सानंद वर्मा ऊर्फ अनोखेलाल सक्सेना म्हणाले, ''माझा दृष्टिकोन अत्यंत वेगळा आहे. मी सोशल मीडियावर स्क्रॉलिंग करण्यामध्ये वेळ व्यतित करत नाही. मला इतर व्यक्तींचे व्हिडिओ पाहण्यामध्ये कोणतीच रूची नाही. मी फक्त मला आवडणाऱ्या गोष्टी करतो, ते म्हणजे गायन, अभिनय आणि माझे स्वत:चे व्हिडिओ बनवणे. माझ्यासाठी कला फक्त व्यवसाय नाही तर जीवनाचा मार्ग आहे, कोणत्याही व्यत्ययाशिवाय स्वत:शी व इतरांशी जुडले जाण्याचा मार्ग आहे. मी नेहमी सहज व सर्जनशील राहण्याला प्राधान्य देतो. शक्यतो सकारात्मक काम करा. आरोग्य, योगा, चिंतन, व्यायाम, खेळावर लक्ष केंद्रित करा. पुस्तके वाचा, तुमच्या कलेचा सराव करा, तुमची आवड जोपासा, सोशल मीडिया व बातम्यांवर कमी वेळ व्यतित करा. दिवसातून १५ ते २० मिनिटे पुरेशी आहेत. त्यानंतर तुमचे काम व विकासावर लक्ष केंद्रित करा.''

## शुद्धिपत्रक

वैदर्भीय गाडीलोहर तत्समजाती महासंघाची निवडणूक कार्यक्रम दैनिक महासागर च्या पान क्रमांक ५ वर दिनांक ११/१०/२०२५ चे सर्व आवृत्ती मध्ये प्रकाशित करण्यात आली होती. त्यात त्रैवार्षिक चे ऐवजी त्रैमासिक असे लिहिण्यात आले होते. यात सुधारणा करण्यात आली असून वाचक, सभासद पदाधिकारी, निवडणूक अधिकारी यांनी त्रैमासिक ऐवजी त्रैवार्षिक असे वाचावे.

चुकी बद्दल क्षमस्व दिलगिरी व्यक्त करतो.

संपादक.

# कपाशी पिकावरील तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीचा झाला प्रादुर्भाव

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १३ :

कपाशीवरील तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव झाला आहे. याची दखल घेत प्रादुर्भावावरील नियंत्रणासाठी कृषि विद्यापीठाच्या कापूस संशोधन विभागाकडून शेतकऱ्यांच्या शेतांची पाहणी करण्यात आली. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील कापूस संशोधन विभागाच्या वतीने विविध गावांतील शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रांना दिनांक भेट देण्यात आल्या. यावेळी कपाशी पिकावर तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आला. या अळीच्या प्रादुर्भावामुळे पिकाचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर

अळीमुळे होणार हानी, कृषि विभाग, डॉ. देशमुख कृषि विद्यापीठाकडून पाहणी



शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन देण्यासाठी संशोधन विभागाचे तज्ज्ञ शेतकऱ्यांच्या शेतांवर गेले. तरोडा, कुटासा, दिनोडा, रोहनखेड, जउळका, रोंदळा, पारोळा आदी गावांतील शेतांवर भेट देऊन कापूस पिकाची सद्यस्थिती, कीड प्रादुर्भावाचे निरीक्षण आणि पुढील पीक व्यवस्थापनाचे नियोजन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी कापूस कीटकशास्त्रज्ञ पी. पी. पाटील , मंडळ कृषी अधिकारी निलेश सुरडकर, कापूस विभागातील मंगेश खाडे आणि श्री. श्रीकांत सरप उपस्थित होते. शेतभेटीमध्ये शेतकऱ्यांचा प्रतिसाद लाभला. या प्रसंगी प्रवीण साबळे, अवि साबळे, योगेश साबळे, वैभव शेळके, संजय खेकडे, झांबरे, विनोद कडू, रामदास काळे आदी शेतकरी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना दिली माहिती कापूस कीटकशास्त्रज्ञ पी. पी. पाटील यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी तंबाखूची पाने खाणाऱ्या अळीची ओळख, नुकसानीचे प्रकार, जीवनचक्र तसेच एकात्मिक कीड नियंत्रण (खझच) याबाबत शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली. आर्थिक नुकसान पातळी (सुमारे ५ टक्के फुले, पाते व बोंडांचे नुकसान) दिसून आली असेल, तर खालील कीटकनाशकांपैकी कोणतेही एक कीटकनाशक फवारावे. (क्लोरँट्रानिलीप्रोल १८.५% ईसी – ३ मिली प्रति १ लिटर पाणी किंवा स्पिनेटोरम ११.७% एससी –१० मिली प्रति १० लिटर पाणी किंवा क्लोरोपेरिफॉस ५० % + सायपरमिथ्रीन ५% ईसी – २० मिली प्रति १० लिटर पाणी) ही औषधे योग्य प्रमाणात वापरल्यास या किडीचा प्रादुर्भाव आटोक्यात आणता येतो, असे त्यांनी नमूद केले.

**मास्क लावा :** कृषी विभागातील मंडळ अधिकारी सुरडकर यांनी शेतकऱ्यांना कीटकनाशक फवारणीवेळी तोंडावर मास्क लावणे आणि शरीराचे संरक्षण करण्यासाठी योग्य उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे आवाहन केले.

# 'पिंक ईरिक्षा' योजना सुरू
## राजकन्या खंडारे पहिल्या चालक

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १३ :



अचलपूर तालुक्यात राज्य शासनाची 'गुलाबी ई-रिक्षा'(पिंक ऑटो) योजना सुरू झाली आहे. या योजनेअंतर्गत स्वयंरोजगाराचा मार्ग स्वीकारणाऱ्या राजकन्या खंडारे या तालुक्यातील पहिल्या महिला ठरल्या आहेत. कविठा येथील रहिवासी असलेल्या राजकन्या खंडारे आता ई-रिक्षा चालवून आत्मनिर्भर बनल्या आहेत. राजकन्या प्रशांत खंडारे (वय २८) यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी अथक प्रयत्न केले. दहावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या राजकन्या यांच्या पतीचे निधन झाल्यानंतर त्यांच्यावर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी आली. या परिस्थितीत हतबल न होता, स्वतःच्या आणि मुलाच्या भविष्यासाठी त्यांनी गुलाबी ऑटो चालवण्याचा निर्णय घेतला. यासाठी त्यांनी पंचायत समितीच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत प्रस्ताव सादर केला. या योजनेअंतर्गत ७० टक्के कर्ज बँकेकडून आणि उर्वरित ३० टक्के रक्कम शासनाकडून मंजूर करण्यात आली. यामुळे त्यांना ई-रिक्षा खरेदी करणे शक्य झाले.सध्या राजकन्या दररोज जुळ्या शहरांमध्ये ई-रिक्षा चालवतात. यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून त्या बँकेच्या कर्जाची नियमित परतफेड करतात आणि कुटुंबाचा गाडा प्रामाणिकपणे चालवतात. पुरुषप्रधान समजल्या जाणाऱ्या या व्यवसायातही त्यांना सहकारी ऑटो चालकांकडून पूर्ण सहकार्य मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. 'कुठलाही व्यवसाय लहान नसतो. प्रामाणिकपणे काम केल्यास अडचणी दूर होतात,' असा विश्वास राजकन्या खंडारे यांनी व्यक्त केला. त्यांच्या या धाडसी पावलामुळे अचलपूर तालुक्यातील अनेक महिलांना स्वयंरोजगार आणि आत्मनिर्भरतेची प्रेरणा मिळत आहे. राजकन्या खंडारे यांच्या मते, पूर्वी त्यांच्या कुटुंबाचे उत्पन्न मर्यादित होते. मात्र, पिंक रिक्षा मिळाल्यापासून उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली असून कुटुंबाला मोठी आर्थिक मदत झाली आहे. कुटुंबातील प्रत्येक सदस्याची गरज पूर्ण करण्यासाठी आता सक्षम झाल्या आहेत. महिलांच्या आत्मनिर्भरतेसाठी शासनाने सुरू केलेली ही योजना अत्यंत कौतुकास्पद असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

# अतिवृष्टीग्रस्तांसाठी निवृत्त शिक्षक सरसावले
## पेन्शनर टिचर्स फोरमचा पुढाकार: घरोघरी जात केले अर्थसाहाय्याचे संकलन

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १३ :

जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी सेवानिवृत्त शिक्षकांची संघटना असलेली पेन्शनर टिचर्स फोरम पुढे सरसावली आहे. संघटनेचे पदाधिकारी सेवानिवृत्त शिक्षकांच्या घरोघरी जाऊन शेतकरी बांधवांसाठी सहाय्य करण्याची विनंती करत आहेत. हे अभियान संपूर्ण महिना चालणार आहे. यंदा अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे पिकांचे प्रचंड नुकसान झाले. पिकांच्या रुपाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून घेतला. अनेकांच्या घरातही पुराचे पाणी घुसले. परिणामी गृहोपयोगी साहित्य वाहून गेले. घरातील धान्याची नासाडी झाली. शैक्षणिक साहित्यही भिजले. पूरग्रस्त संकटात असून, शेतकऱ्यांच्या आर्थिक बोजा वाढणारच आहे. आगामी रब्बी हंगामात पीक कसे घ्यावे आणि पैसेच नसल्याने संपूर्ण वर्षभर संसाराचा गाढा कसा हाकावा, असे एक ना अनेक प्रश्न शेतकऱ्यांसमोर आ वासून उभे आहेत. दरम्यान शेतकऱ्यांना



मदतीचा हात देण्यासाठी पेन्शनर टिचर्स फोरमने पुढाकार घेतला आहे. पेन्शनर टिचर्स फोरमचे जिल्हाध्यक्ष जयंत हरिभाऊ घाटोळ यांनी दिलेल्या माहितीनुसार शेतकऱ्यांसाठीचे हे अभियान सुरू झाले आहे. सामाजिक दायित्वाच्या भावनेतून हे अभियान महिनाभर राबवण्यात येणार आहे. वयोवृद्ध सेवानिवृत्त शिक्षकांचा पुढाकार आयुष्यभर देशाची भावी पिढी असलेल्या विद्यार्थ्यांना शाळेत घडवणारे शिक्षक आता सेवानिवृत्तीनंतर शेतकऱ्यांच्या मदतीसाठी धावत आहेत. सेवानिवृत्त शिक्षक हे निसर्गनियमाने वयोवृद्ध आहेत आणि प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या आजाराने पिडीत आहे. मात्र, जिल्ह्यातील ८० टक्के सेवानिवृत्त शिक्षकांचा वडिलोपार्जित व्यवसाय हा शेती आहे. सेवानिवृत्तीनंतर ते आता पुन्हा आपला मूळ व्यवसाय असलेल्या शेतीकडे वळले असून संकटकाळात शेतकऱ्यांना मदतीचा हात देणार आहेत.

# नांदगाव पेठमधून बीडच्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १३ :

मराठवाड्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीनंतर मदतीचा हात पुढे आला आहे. अमरावती येथील स्व. हिराबाई तुळशीरामजी गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्ट आणि नांदगाव पेठ येथील श्रीरामचंद्र संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील मजरथ गावातील शेतकऱ्यांसाठी जीवनावश्यक वस्तू पाठवण्यात आल्या. आमदार राजेश वानखडे आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत या मदतवाहनाला हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले. या सामाजिक उपक्रमांतर्गत १०० गरीब कुटुंबांना किराणा, शालेय वस्तू आणि संसारोपयोगी साहित्य पुरवण्यात आले. अतिवृष्टीमुळे शेती आणि घरांचे मोठे नुकसान झालेल्या शेतकरी कुटुंबांना दिलासा देण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. श्रीराम मंदिर, नांदगाव पेठ येथे आयोजित एका कार्यक्रमात हे मदतवाहन बीडकडे रवाना करण्यात आले. यावेळी श्रीराम मंदिर संस्थानचे अध्यक्ष प्रा. डॉ. अरविंद



देशमुख, नीलकंठ व्यायाम मंडळाचे अध्यक्ष दीपक गुल्हाने, नितीन गुडधे, मिलिंद पाटील, सुभाष श्रीखंडे, प्रदीप गौरखेडे, शरद बैस, श्रीकृष्ण जीरापुरे, तसेच ट्रस्टचे अध्यक्ष आणि भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. ट्रस्टचे अध्यक्ष विवेक गुल्हाने यांनी यावेळी बोलताना सांगितले की, शेतकरी संकटात असताना त्यांच्या पाठीशी उभे राहणे हे आपले कर्तव्य आहे, केवळ मदत नाही. या प्रा. मोरेश्वर इंगळे, माजी जि. प. सदस्य भारती गेडाम, निलेश मरोडकर, वीरेंद्र लंगडे, राजेंद्र तुळे, आकाश गुल्हाने, करण मांडवकर, नितीन टाले, गौरव राठोड, तेजस वानखडे, विलास धोटे, संजय कोहळे, सुधीर जाधव, चेतन ठाकरे, सागर खरते, नितीन काळे, मोनिका पिहुलकर, भैया चौधरी, विजय झटाले यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी, कार्यकर्ते, भाजपा पदाधिकारी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. श्रीराम संस्थानचे अध्यक्ष डॉ. अरविंद देशमुख यांनी या मदतीला 'श्रीरामाचा प्रसाद' असे संबोधले. ते म्हणाले, 'दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी पाठवलेले धान्य, कपडे आणि जीवनावश्यक वस्तू या केवळ भौतिक वस्तू नसून, त्या श्रीरामाच्या 'प्रसाद' स्वरूपात आहेत. हा प्रसाद म्हणजे करुणा, संवेदना आणि सहभावनेचा दैवी संदेश आहे. ज्या भावनेतून आपण ही मदत करत आहोत, तीच खरी भक्ती आणि माणुसकीची सेवा आहे.

# प्रगत राष्ट्रनिर्मितीसाठी ग्रामीण भागाचा उत्कर्षच महत्वाचा डॉ. विजय भटकर



**अकोला:** भारताला सर्वांगीण अधिक सक्षम करायचे असल्याने प्रथम ग्रामीण भागाचा उत्कर्ष साधने महत्वाचे असून यासाठी संशोधन ज्ञानाचा विकास करणारे विद्यार्थी हे या कार्याचे देवदूत ठरतील, असे प्रतिपादन संगणक शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांनी केले. बाभूळगाव येथील अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेद्वारे संपन्न झालेल्या जन्मोत्सव २०२५ कार्यक्रमात डॉ. भटकर बोलत होते. डॉ. भटकर यांनी उपस्थितांना ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन केले. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ हेही ऑनलाईन सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी शोध निबंध वाचनाचे सातत्य ठेऊन महाविद्यालयीन इन्क्युबेशन सेंटर हे अधिकाधिक प्रबल करण्यास योगदान नोंदवत राहावे, असे ते म्हणाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत थोरात यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला मुरंबा या डॉ. भटकर यांच्या गावच्या सरपंच धनश्री भटकर व डॉ. भटकर उपस्थित होते. सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी रीया अंभोरे तर प्रास्ताविक प्रा. आदित्य गणगणे यांनी केले.

आभार प्रा. वैष्णवी वानखडे यांनी मानले. विद्यार्थ्यांचा सहभाग कॉम्प्युटर विभागाचे प्रा. डॉ. सचिन अग्रवाल यांनी परीक्षण केलेल्या या स्पर्धेत महाविद्यालयातील कॉम्प्यूटर, आय. टी., केमिकल, मॅकेनिकल, आर्किटेक्चर व सिव्हील या सर्वच विभागातील विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला. विजयी स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपयांचे रोख पारितोषिक व गुणवत्तेनुसार प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. माजी विद्यार्थी संघटनेचे पदाधिकारी तथा महाविद्यालयात कार्यरत माजी विद्यार्थी प्राध्यापक यांच्या सहकार्याने कार्यक्रम झाला.

# दिवाळीच्या स्वागताची नांदी; आठवीचा सण

■ महासागर प्रतिनिधी , अमरावती, दि. १३ :

आश्विन महिन्यातील आठवी अर्थात कराष्टमीला देवीचीच पूजा केली जाते. जिल्ह्यासह विदर्भात या दिवशी शेतीसह पिकांची पूजा केली जाते. याला आठवीची पूजा असे म्हणतात. म्हणून या दिवशी ज्वारीची कणसं लागलेले पाच धांडे एकत्र बांधून त्यांची झोपडी तयार करतात. त्या खोपडीच्या खाली पाटावर दोन मडके ठेवून त्यात बोरं, आवळा, चिंच घालून वर झाकण ठेवले जाते. या झाकणांवर रव्याच्या पुरीद्वारे सूर्य व चंद्र तयार करून ठेवले जातात. आंबिल, फुलोरा तसेच करंज्यांसह नैवेद्य अर्पण केला जातो. हा सण म्हणजे निसर्गाला धन्यवाद देण्याची परंपरा होय. म्हणूनच या सणाला दिवाळीच्या स्वागताची नांदी समजले जाते. काही ठिकाणी चांदीचा

## खोपडी, आवळा, बोरं, सूर्य, चंद्राची करतात पूजा, ८ दिवसांनी येते दिवाळी



किंवा मातीचा हत्ती ठेवून त्याचीही पूजा केली जाते. हत्ती हे ऐश्वर्याचे प्रतिक असून लक्ष्मीचे वाहन असल्याची धारणा आहे. त्यामुळे त्यांचीही पूजा करण्याची पद्धत आहे. आठवीची पूजा म्हणजे एकप्रकारे श्री लक्ष्मीला आमंत्रण समजले जाते. या दिवशी भाविक दिवसभर उपवास करतात. तसेच दही-भाताचा नैवेद्यही देवीच्या फोटोपुढे अर्पण करतात. बाजारात खोपडी, झेंडूची फुले, खण, नारळ, विड्याची पाने, कागदावर ठप्प्याने चितारलेला देवीचा फोटो, हिरव्या बांगड्या विक्रीसाठी चौका-चौकात उपलब्ध असल्याचे पूर्वसंध्येला दृश्य दिसत होते.


कार्यालय

**नगर परिषद वाडी जिल्हा- नागपूर**

जाहीरात क्र : नपवा/बां. वि./ २१३०/२०२५ दिनांक : ०९/१०/२०२५

**ई - निविदा सूचना क्रमांक - १/२०२५-२६**

मुख्याधिकारी, नगर परिषद वाडी, जिल्हा नागपूर यांच्या वतीने वाडी नगर परिषद हद्यीतील सन २०२५-२०२६ वर्षातील नागरी दलीत्तेतर वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील नमुद कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे बी-१ कराराचे नमुन्यात ऑनलाईन दोन लिफाफा पध्दतीने ई - निवीदा महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये योग्य त्या वर्गवारीत पंजीकृत कंत्राटदाराकडुन मागविण्यात येत आहे. सदर कामाची निविदा केवळ ई - निवीदा पध्दतीनेच सादर करावयाची आहे. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १३/१०/२०२५ ला दुपारी ४.०० वाजेपासुन पाहण्यास उपलब्ध राहील.

मुख्याधिकारी
नगर परिषद वाडी


# सुस्कांरातून 'आरएसएस' आदर्श व्यक्ती निर्माणाचे कार्य करतोश्रीधरराव गाडगे

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १३ :

मागील शंभर वर्षांपासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखा सुसंस्कारातून आदर्श व्यक्ती निर्माणाचा कार्याकरता समर्पित असून समाजसेवेसोबत आदर्श व सुसंस्कारी पिढी घडवण्याचे कार्य संघ करीत आहे, असे मार्गदर्शन ११ ऑक्टोबर रोजी यांनी केले. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालय जळगाव जामोद येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणुन प्रांत सहसंघचालक श्रीधरराव गाडगे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून भेंडवळ मांडणीचे प्रणेते चंद्रभान महाराज यांचे वंशज पुंजाजी महाराज



वाघ, तालुका संघचालक एडवोकेट गिरीश माळपांडे व नगर संघचालक मिलिंद जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमापूर्वी शहरातील प्रमुख मार्गावरून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांचे पथसंचलन काढण्यात आले. यावेळी शहरातील संघप्रेमी नागरिकांना घरासमोर रांगोळींची आरास, जेसीबी व घरासमोरून पुष्पवृष्टी तसेच स्वागत कमानी उभारून स्वयंसेवकांचे स्वागत केले. पथसंचलनानंतर मार्गदर्शनपर कार्यक्रमाला श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालयात सुरुवात झाली. उत्सवाचे प्रास्ताविक अनिल भन्साली नगर कार्यवाह यांनी केले त्यांनी प्रास्ताविकातून संघ कार्याची माहिती यावेळी दिली.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **GAUSIYAPRAVIN MOBIN SIDDIKI**. NOW MY NEW NAME IS **GAUSIYA SAHNEWAJALI SIDDIQUI.**
**ADD :** H. NO. 2, WARD NO. 4, DAHEGAON (RANGARI), NAGPUR - 441113

MY OLD NAME WAS **DURGA RUSHI MESHRAM**. NOW MY NEW NAME IS **DURGABAI GANPATRAO GADPAYLE.**
**ADD :** PLOT NO 51/B VRUNDAWAN NAGAR NAGPUR 440009

MY OLD NAME WAS **SAYYAD ANJUM SAYYADSALAR**. NOW MY NEW NAME IS **ANJUM SAYYED SALAR.**
**ADD :** USMAN NAGAR ATPOST, WAI BAZAR TQ, MAHUR DISTRICT, NANDED 431721

MY OLD NAME WAS **ABDUL VAHID JOSHMAHMAD**. NOW MY NEW NAME IS **ABDUL WAHID JAISH MUJAWAR.**
**ADD :** PLOT NO. 6, MOHITE INDUSTRIAL AREA WANADONGRI NAGPUR

MY OLD NAME WAS **MOHAMMED SAAD MOHAMMED SHAFIQUE DAWOOD**. NOW MY NEW NAME IS **MOHD SAAD MOHD SHAFIQUE DAWOOD.**
**ADD :** ROOM NO.402 AMRUT NAGAR THANE 400612
PASSPORT NO. **P0959328**

MY OLD NAME WAS **KAHKASHA ABDUL SALIM KHAN/ KAHKASHA KHAN**. NOW MY NEW NAME IS **KAHKASHA ANJUM ABDUL SALIM KHAN.**
**ADD :** TEACHER COLONY BADA TAJBAGH NAGPUR 440024

MY OLD NAME WAS **SHEIKH ZUFISHAN FATIMA MOHAMMAD TAHIR**. NOW MY NEW NAME IS **SAMEEN FATEMA MOHAMMAD AMEEN.**
**ADD :** PLOT NO. 837 SAIFY NAGAR MOMINPURA NAGPUR 440018

MY OLD PASSPORT NO. **N3374854**, MY OLD NAME WAS **GIRISHKUMAR MARKANDRAO PARDHI**, NOW MY NEW NAME IS, **GIRISH MARKANDRAO PARDHI.**
**ADD:** PLOT NO.4, CENTRAL EXCISE COLONY NAGPUR

MY OLD NAME WAS **MEENAXI SHYAMRAO MANWATKAR**. NOW MY NEW NAME IS **MEENA SUREDRA BORKAR.**
**ADD :** PLOT NO.134,NARI ROAD,MAITRI COLONY,NEAR KAPIL NAGAR, UPPALWADI, NAGPUR - 440026

MY OLD NAME WAS **JAYA KATHALE**. NOW MY NEW NAME IS **JAYASHRI KATHALE.**
**ADD :** KALAMB YAVATMAL

MY OLD NAME WAS **BURHANUDDIN**. NOW MY NEW NAME IS **BURHANUDDIN ARVIWALA.**
**ADD :** HOUSE NO.101 NAJMI MANZIL GANJAKHET NAGPUR 440002
PASSPORT NO. **P4230731**

MY OLD NAME WAS **MAHESHKUMAR BACCHUMAL PANJWANI**. NOW MY NEW NAME IS **MAHESH BACCHUMAL PANJWANI .**
**ADD :** PLOT NO. 23, B, HEMU COLONY BARA KHOLI CHOWK JARIPATKA NAGPUR

I **ASHVWINI SHRAWAN BORKARR** RESIDING AT EKATMATA NAGAR, NEAR SAI KIRANA STORES, JAITALA ,NAGPUR 440024 HEREBY DECLARE THAT I HAVE CHANGED / ADDED MY MIDDLE NAME FROM **ASHVWINI BORKARR** TO **ASHVWINI SHRAWAN BORKARR.** HENCEFORTH, I SHALL BE KNOWN AS **ASHVWINI SHRAWAN BORKARR** FOR ALL OFFICIAL PURPOSES.



**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(आकाशवाणी चौक, सिव्हिल लाईन, नागपूर पिन कोड-४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५
प्र.क्र.१६१/प्रसु-३/तह.नाग (शहर)/कावि-५५६/२०२५ दिनांक : २१/०९/२०२५
वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-स.अ.वि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. अर्जदार फरीदा हमीद खान पठाण, प्लॉट नं. १०४, राठोड लेआऊट, अनंत नगर, ताज किराणा, पोलीस लाईन नागपूर

-: जाहिरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार फरीदा हमीद खान पठाण, यांनी त्यांचे पुतण्याचे जन्म तारखेची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू यांचे पुतण्या नामे अरसान नौशाद खान पठाण जन्म दिनांक ११/१२/२०१२ रोजी डागा हॉस्पीटल, नागपूर येथे झालेला आहे. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित कार्यवाही करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५
क.स.म.अ./तह.नाग/(शहर)/कवि-११३०/२०२५ दिनांक : ०७/१०/२०२५
वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-स.अ.वि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. अंसारी फरजाना परवीन जमाल, रा. शिवशक्ती नगर, प्लॉट नं. ए-१/१३४, वांजरी लेआऊट, नागपूर यांचा अर्ज दिनांक १८/०८/२०२५

-: जाहिरनामा :-

ज्याअर्थी अर्जदारअंसारी फरजाना परवीन जमाल, रा. शिवशक्ती नगर, नागपूर यांनी त्यांच्या मुलीच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अरीबा फातमा अफजल रहमान हिचा जन्म दिनांक ०५/०२/२०१३ त्यांचे राहते घरी, शिवशक्ती नगर, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता



**कोर्ट विद्यमान श्रीमती पुनम कदम, अप्पर तहसीलदार, देवलापार यांचे न्यायालय**
प्र.क्र. /एम.आर.सी. ८१/२०२५
मौजा कडबिखेडा, ता. रामटेक
जि. नागपूर

-: जाहिरनामा :-

ज्याअर्थी श्री. अशोक फाग्या तुमडाम, रा. कडबिखेडा, ता. रामटेक, जिल्हा, नागपूर यांनी त्यांची आत्या नामे जुग्गो निरा तुमडाम यांच्या मृत्यू दिनांक २५/१०/२००० रोजी मौजा कडबिखेडा, ता. रामटेक येथे झाला परंतू त्यावेळेस अर्जदाराच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीनी अर्जदारांच्या आत्याच्या मृत्यूची नोंद संबधीत गट ग्रामपंचायत कार्यालय डोंगरताल, ता. रामटेक येथे केली नाही. त्याबाबत गट ग्रामपंचायत डोंगरताल यांनी दिनांक १६/०९/२०२५ रोजी प्रमाणपत्र दिले आहे. करिता अर्जदार यांच्या आत्याच्या मृत्यूची नोंद गट ग्रामपंचायत डोंगरताल, ता. रामटेक येथे करण्याबाबत आदेश देणे करिता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहिरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त नामे जुग्गो निरा तुमडाम, यांचा मृत्यू दिनांक २५/१०/२००० ची नोंद मौजा कडबिखेडा, ता. रामटेक येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक १६/१०/२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ०१/१०/२०२५ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.
स्थळ :- देवलापार
दिनांक :- ०१/१०/२०२५

कार्यकारी दंडाधिकारी,
तथा अप्पर तहसीलदार, देवलापार



**कोर्ट विद्यमान श्रीमती पुनम कदम, अप्पर तहसीलदार, देवलापार यांचे न्यायालय**
प्र.क्र. /एम.आर.सी. ८१/२०२५
मौजा कडबिखेडा, ता. रामटेक
जि. नागपूर

-: जाहिरनामा :-

ज्याअर्थी श्री. धर्मराज गुलाब टेकाम, रा. टूयापार, ता. रामटेक, जिल्हा. नागपूर यांनी स्वतःच्या जन्म दिनांक १५/०६/१९७९ रोजी राहते घरी टूयापार, ता. रामटेक, जि. नागपुर येथे झाला परंतू त्यावेळेस अर्जदाराच्या कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीनी अर्जदारांच्या जन्माची नोंद संबधीत गट ग्रामपंचायत कार्यालय वडांबा, ता. रामटेक येथे केली नाही. त्याबाबत गट ग्रामपंचायत वडांबा यांनी दिनांक १७/०९/२०२५ रोजी प्रमाणपत्र दिले आहे. करिता अर्जदार यांच्या जन्माची नोंद गट ग्रामपंचायत वडांबा, ता. रामटेक येथे करण्याबाबत आदेश देणे करिता अर्ज सादर केले आहे.

त्याअर्थी या जाहिरनाम्याव्दारे असे सुचित करण्यात येते की, उपरोक्त नामे धर्मराज गुलाब टेकाम, यांचा जन्म दिनांक १५/०६/१९७९ ची नोंद मौजा टूयापार, ता. रामटेक येथे घेण्यास इतर कुणाचेही कोणतेही प्रकारचे आक्षेप अथवा उजर तक्रार असल्यास आपण दिनांक २३/१०/२०२५ पावेतो आपले आक्षेप अथवा उजर तक्रार लेखी स्वरुपात स्वतः उपस्थित राहून या न्यायालयात समक्ष सादर करावे. नियोजीत तारखेनंतर मिळालेल्या आक्षेपावर विचार करण्यात येणार नाही, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दिनांक ०६/१०/२०२५ रोजी माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.
स्थळ :- देवलापार
दिनांक :- ०६/१०/२०२५

कार्यकारी दंडाधिकारी,
तथा अप्पर तहसीलदार, देवलापार


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# गरमागरम मूग डाळ टिक्की

**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, शिक्षण किंवा नोकरीनिमित्ताने बाहेरगावी रहाताना घरच्या चवीची आठवण येत असते. रोजच्या धावपळीत झटपट होणारे तेच ते पदार्थ खावे लागतात. मात्र एखाद्या दिवशी निवांत वेळ असल्यावर तुमच्यातला शेफ जागा होतो. मग एखादी वेगळी रेसिपी ट्राय करता येते. अर्थात ही रेसिपी पौष्टिकही असायला हवी. म्हणूनच प्रथिनयुक्त डाळीपासून टिक्की बनवता येईल. यासाठी मूग डाळ वापरता येईल. चला तर मग मूग डाळीची टिक्की बनवूया.

**सामग्री:** एक वाटी मूग डाळ, आल्याचा छोटा तुकडा, दोन हिरव्या मिरच्या, चिरलेली/कोथिंबिर, एक चिरलेला कांदा आणि सिमला मिरची, प्रत्येकी एक चमचा जिरेपूड आणि धनेपूड, एक चमचा कॉर्नफ्लोर, अर्धा चमचा आमचूर, चाट मसाला, ५० ग्रॅम पनीर, मीठ आणि तेल.

**कृती:** एका भांड्यात पाणी गरम करायला ठेवा. त्यात मूग डाळ घालून उकळून घ्या. डाळीतलं पाणी काढून टाका. आता ही डाळ थंड पाण्याने धुवून बाजूला ठेवा. डाळ थंड झाल्यावर मिक्सरच्या भांड्यात डाळ, आलं, हिरवी मिरची आणि कोथिंबिर घालून वाटून घ्या. हे वाटण एका भांड्यात काढा. आता यात चिरलेला कांदा, सिमला मिरची, जिरेपूड, कॉर्नफ्लोर,



आमचूर, चाट मसाला, कुस्करलेलं पनीर आणि मीठ घाला. सर्व घटक नीट मिसळून घ्या. हाताला थोडं तेल लावा. मूग डाळीचं मिश्रण घ्या. त्याला टिक्कीप्रमाणे गोल आकार द्या. अशाप्रकारे सर्व टिक्की बनवून घ्या. गॅसवर तवा ठेवा. त्यावर तेल घाला. गरम झाल्यावर तव्यावर टिक्की ठेवा. दो »


# जोश

## शेर की जुबानी

| | | |
|---|---|---|
| एक परवाह ही बताती है कि ख्याल कितना है, वरना कोई तराजू नहीं होता, रिश्तों में। | जिंदगी गुजर जाए, पर दोस्ती कम ना हो, याद हमें रखना चाहे पास हम ना हो। | काश दिल की आवाज में इतना असर हो जाए, हम याद करें और उसको खबर हो जाए। |

# उभे केले कोट्यवधींचे साम्राज्य...

**अचिव्हर**



दक्षिण कोरियाची ऑटो कंपनी 'ह्युंदाई'ला वेगळ्या ओळखीची गरज नाही. आज ती जगातील सर्वात मोठ्या ऑटोमोबाईल साम्राज्यांपैकी एक आहे. या ब्रँडच्या गाड्या लाखो लोकांचे आवडत्या बनल्या आहेत; पण यामागे संघर्ष, कठोर परिश्रम आणि चिकाटीची कथा आहे. ती प्रेरणा देते की परिस्थिती कितीही कठीण असली, तरी अंगी धाडस असेल तर स्वप्ने साध्य करता येतात. ही ह्युंदाईचे संस्थापक चुंग जू-युंग यांची कहाणी आहे. ही एका माणसाची कथा आहे, ज्याला पोट भरण्यासाठी फक्त झाडाची साल खावी लागत होती; परंतु या परिस्थितीवर मात करून त्यांनी जगप्रसिद्ध कार ब्रँड ह्युंदाईची स्थापना केली.

२५ नोव्हेंबर १९१५ रोजी एका गरीब कोरियन शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या चुंग जू-युंग यांचे जीवन संघर्षांचे पुस्तक आहे. त्यांनी त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक क्षण संघर्षात जगला; परंतु दृढनिश्चय केला, की गरिबी त्यांच्या प्रगतीच्या आड येणार नाही. अभ्यासादरम्यान चुंग जु-युंग यांनी कुटुंबाला मदत करण्यासाठी छोटी छोटी कामे केली; परंतु त्यांचे स्वप्न स्वस्थ बसू देत नव्हते. १९४७ मध्ये त्यांनी एक लहान बांधकाम कंपनी सुरू केली.

सुरुवातीच्या संघर्षांना आणि संसाधनांच्या कमतरतेला न जुमानता, चुंग जु-युंग अढळ राहिले. आधुनिक तंत्रज्ञान शिकण्यासाठी त्यांनी जपान आणि अमेरिकेत प्रवास केला आणि त्यांच्या कंपनीला नवीन उंचीवर नेण्याची योजना आखली. १९६७ मध्ये, त्यांनी 'ह्युंदाई मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज'ची स्थापना केली. हळूहळू कंपनी दक्षिण कोरियाच्या सीमेपलीकडे विस्तारली आणि जगातील आघाडीच्या कार कंपन्यांपैकी एक बनली.

चुंग जु-युंग यांनी हे सिद्ध केले, की कठोर परिश्रम, धैर्य आणि दूरदृष्टीने अशक्य गोष्ट शक्य करता येते. २००१ मध्ये त्यांचे निधन झाले; परंतु त्यांचे जीवन आणि त्यांची कंपनी » खो

## ॲप स्टोरी

### लॅपटॉप चालणार अँड्राईडवर



आता मोबाईलप्रमाणे लॅपटॉपही अँड्रॉइडवर चालणार आहेत. 'गुगल' ने 'क्वालकॉम' बरोबर भागीदारी करून याची तयारी केली आहे. 'गुगल'ने यापूर्वीच 'क्रोमओएस' चलित लॅपटॉप विकसित केले आहेत; परंतु ते विंडोज आणि मॅकच्या तुलनेत वेगळी ओळख निर्माण करण्यात अयशस्वी ठरले. आता अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टमसह नवीन लॅपटॉप लाँच करण्याची तयारी सुरू आहे. 'गुगल' ने जाहीर केले, की पुढच्या वर्षी अँड्रॉइडची पीसी आवृत्ती लाँच केली जाईल. अद्याप या संबंधीची तपशीलवार माहिती शेअर केली गेलेली नसली तरी गुगल २०२६ मध्ये त्याची घोषणा करण्याचा अंदाज आहे. यामुळे वापरकर्त्यांना एकाच ठिकाणी मोबाइल आणि पीसी सेवांचा आनंद घेता येईल. 'क्रोमओएस' आणि 'अँड्रॉइड'चा अनुभव लक्षात घेता मानले जाते, की 'गुगल अँड्रॉइड' सारखा इंटरफेस आणि 'क्रोमओएस'च्या मल्टीटास्किंग स्वरूपासह एक नवीन प्लॅटफॉर्म विकसित करेल. या दोघांना एकत्र केल्याने पीसी आणि लॅपटॉपसाठी एक नवीन ऑपरेटिंग सिस्टम तयार होईल. »

# ...अन्यथा लवकर म्हातारे व्हाल

**फिटनेस फंडा**



दोस्तांनो, व्यायामामुळे तुम्ही तंदुरुस्त होता. वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते. सकाळी छान ताजंतवानं वाटतं. हे जरी खरं असलं तरी काही चुकांमुळे तुम्ही खूप लवकर म्हातारे दिसू लागता. व्यायाम करताना कोणत्या चुका होतात ? जाणून घेऊ.

* व्यायाम करताना शारीरिक स्थितीचा विचार करा. जीममध्ये व्यायाम करताना चुकीच्या पद्धतीने उभं राहिल्याने, वाकल्याने तुम्हाला त्रास होऊ शकतो. यामुळे पाठीच्या कण्याला बाक येतो. मग तुम्ही वाकून चालू लागता. हे टाळण्यासाठी व्यायाम करताना शरीराच्या स्थितीकडे लक्ष द्या. चुकीच्या शारीरिक स्थितीमुळे तुम्ही म्हातारे दिसू लागता.

* कार्डिओ हा खूप चांगला व्यायामप्रकार असला तरी त्याच्या अतिरेकाने शरीराचं नुकसान होऊ शकतं. विशिष्ट वयानंतर हाडं आणि स्नायूंना पुरेसा व्यायाम मिळाला नाही तर त्याच्या कार्य मंदावतं. तसंच १८ ते ५० या वयोगटातल्या व्यक्तींनी वेट लिफ्टिंग आणि स्ट्रेंथ ट्रेनिंग करावं, असं एक संशोधन सांगतं. स्ट्रेंथ ट्रेनिंगमुळे स्नायूंना बळकटी मिळते. शिवाय कॅलरीही खर्च होतात.

* 'हाय इंटेसिटी इंटरवल ट्रेनिंग' गरजेचं आहे. या व्यायामामुळे वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते. शारीरिक क्षमताही वाढते. या सगळ्यामुळे आपण बराच काळ तरुण रहातो.

* शरीर ताणण्याच्या व्यायामाकडे दुर्लक्ष करू नये. व्यायामाआधी आणि नंतर शरीर ताणायला हवं. शरीर ताणण्याचे व्यायाम केले नाहीत तर स्नायू आणि त्यातल्या टिश्यूंवर अकारण ताण येतो. तसंच या व्यायामांमुळे शरीर लवचिक होतं आणि व्यायाम करताना त्रास होत नाही.

* सतत जीममध्ये व्यायाम करत राहिल्याने आपण तंदुरुस्त राहू हा समज चुकीचा आहे. व्यायामाप्रमाणेच शरीराला विश्रांतीचीही गरज असते. स्नायूंची झीज भरून काढण्यासाठी शरीराला वेळ देणं गरजेचं आहे. »

# तिच्या पालकांचा विरोध आहे!

**मॅच मेकिंग**



मी २८ वर्षांचा तरुण असून गेल्या चार वर्षांपासून रिलेशनशीपमध्ये आहे. आमच्या दोघांच्या नात्यात जातीचा अडसर आहे. आमची जात वेगळी असल्यामुळे तिच्या घरच्यांचा आमच्या नात्याला विरोध आहे. आमच्या नात्याबद्दल कळल्यानंतर तिच्या घरच्यांची तिच्याशी अबोला धरला आहे. माझ्या घरातून वडिलांचा पाठींबा आहे. पण मैत्रिणीचे पालक खूपच जुन्या विचारांचे असल्याने त्यांनी तिला सक्त ताकीद दिली आहे. माझ्याशी संपर्क ठेवला तर ते तिचं बाहेर जाणंच बंद केलं जाणार आहे. त्यामुळे तिनेही हे नातं संपवायचं ठरवलं आहे. पण आमचं एकमेकांवर खूप प्रेम आहे. एकमेकांपासून दूर जाण्याचा विचार आम्ही करू शकत नाही. अशा परिस्थितीत मी काय करू?

उत्तर : तुमचं नातं खूपच गुंतागुंतीचं होऊन बसलं आहे. अशा परिस्थितीत तिच्या पालकांना समजावून सांगणं गरजेचं आहे. यासाठी कोणीतरी पुढाकार घ्यायला हवा. तुझ्या मैत्रिणीला पालकांशी बोलायची भीती वाटत असेल तर नात्यातल्या काही लोकांना याची जबाबदारी देता येईल. नात्याला असणारा विरोध ही बाब फारच नाजूक आहे. मुलीच्या पालकांचं मन वळवण्यासाठी बरीच मेहनत करावी लागेल. तुम्हाला धीर धरावा लागेल. त्यांची समजूत घालणं नक्कीच सोपं नाही. यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतील. पण तू धीर सोडू नकोस. तुला नक्कीच मार्ग मिळेल. »

# कलाक्षेत्र खुणावतेय?

**वेगळ्या वाटा**



चित्रकला, सृजनशीलता आणि अभिव्यक्तीची आवड असणाऱ्यांसाठी 'बीएफए' हा करिअरचा उत्तम मार्ग ठरतो. यामध्ये केवळ कला शिकवली जात नाही तर ती एक व्यावसायिक कौशल्य बनवून स्वतःचे स्थान निर्माण करण्याचा विचार यातून दिला जातो. आजच्या घडीला पारंपरिक शिक्षणाच्या पलीकडे जाऊन अनेक विद्यार्थी सृजनात्मक आणि कलात्मक क्षेत्रांकडे वळत आहेत. विशेषतः कला आणि डिझाईनमध्ये रस असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'बॅचलर ऑफ फाइन आर्ट्स' हा एक उत्तम आणि भविष्यकाळात संधी देणारा पर्याय ठरतो. या पदवीअंतर्गत विद्यार्थ्यांना कलाक्षेत्रातील विविध अंगांमध्ये सखोल प्रशिक्षण दिले जाते. ते कलागुणांना व्यावसायिक स्वरूपात विकसित करण्यास मदत करते.

**'बीएफए' म्हणजे नेमके काय?**

'बॅचलर ऑफ फाइन आर्ट्स' ही चार वर्षांची पदवी असून ती संगीत, नृत्य, नाट्य, चित्रकला, मूर्तिकला, ॲनिमेशन, ग्राफिक डिझाईन, फोटोग्राफी, फॅशन डिझाईन आणि आर्ट हिस्टरी अशा विविध कलात्मक शाखांमध्ये मिळवता येते. ही पदवी केवळ कलात्मक शिकवणीपुरती मर्यादित नसून सैद्धांतिक ज्ञान, सौंदर्यदृष्टी, इतिहास आणि सृजनशीलतेतेही शिक्षण यात दिले जाते.

**कोण करू शकतो 'बीएफए?**

'बीएफए'मध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी १२वी उत्तीर्ण केलेली असावी. काही विद्यापीठांमध्ये कलाशाखेतील १२वीचा अभ्यासक्रम आवश्यक असतो तर काही ठिकाणी सर्व शाखांमधील विद्यार्थी पात्र असतात. याशिवाय अनेक संस्था प्रवेशासाठी 'अप्टिट्यूड टेस्ट' किंवा पोर्टफोलिओ सबमिशनही घेतात.

**काय शिकवले जाते या कोर्समध्ये?**

या कोर्समध्ये विद्यार्थ्यांना रंगसंगती, रेखाटन, फिगर ड्रॉइंग, व्हिज्युअल स्टोरीटेलिंग, थ्री डी डिझाईन, डिजिटल आर्ट्स, फोटोग्राफी, स्कल्पचर आणि विविध माध्यमांचा वापर शिकवला जातो. यासोबतच आर्ट हिस्ट्री, सौंदर्यशास्त्र आणि कलेचं समाजाशी नातं या गोष्टींचंही ज्ञान दिले जाते.

**करिअरच्या संधी कोणत्या?**

'बीएफए' पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना अनेक क्षेत्रांमध्ये करिअर करता येते. चित्रकार, ग्राफिक डिझायनर, ॲनिमेटर, आर्ट डायरेक्टर, फॅशन डिझायनर, इन्टिरियर डिझायनर, टॅटू आर्टिस्ट, फोटोग्राफर, आर्ट टीचर किंवा ॲकॅडेमिक रिसर्चर अशा अनेक संधी त्यांच्या समोर खुल्या असतात. विविध जाहिरात कंपन्या, मीडिया हाऊसेस, एनिमेशन स्टुडिओ, थिएटर ग्'प्स आणि डिझाईन फर्म्समध्ये या क्षेत्रातील तज्ज्ञांची मोठी मागणी आहे.

**स्वतंत्र कलाकार म्हणूनही संधी**

या क्षेत्रातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे स्वतंत्र कलाकार म्हणून काम करण्याची मिळणारी संधी. चित्रकार, छायाचित्रकार, शिल्पकार किंवा डिजिटल कलाकार म्हणून आपण स्वतःचे ब्रँड तयार करू शकतो. 'सोशल मीडिया'च्या युगात ही संधी अधिक व्यापक बनली आहे. »

## नेटवर्कींग

### 'लिंक्डइन'मुळे गोपनीयता धोक्यात



नोकरी शोधण्यासाठी 'लिंक्डइन' हा सर्वात मोठा व्यावसायिक नेटवर्किंग प्लॅटफॉर्म मानला जातो. तथापि, लवकरच या ॲपमध्ये काही बदल संभवत असून यामुळे वापरकर्त्यांची गोपनीयताही धोक्यात येऊ शकते. याचे कारण कंपनी आपल्या गोपनीयता धोरणात मोठे बदल करत आहे. कंपनीने जाहीर केले आहे, की तीन नोव्हेंबरपासून 'मायक्रोसॉफ्ट'ला 'एआय मॉडेल्स'ना प्रशिक्षण देण्यासाठी तसेच वैयक्तिकृत जाहिराती देण्यासाठी वापरकर्त्यांचा डेटा वापरण्याची परवानगी दिली जाईल. म्हणजेच 'लिंक्डइन'नुसार प्रोफाइल कामाचा इतिहास, शिक्षण तपशील, पोस्ट आणि टिप्पण्या यासारख्या डेटाचा वापर केला जाईल. तथापि, कंपनीने स्पष्ट केले आहे, की खासगी संदेश पूर्णपणे सुरक्षित राहतील आणि कोणत्याही प्रकारे शेअर केले जाणार नाहीत. या बदलात दोन महत्त्वाचे घटक समाविष्ट आहेत. पहिला, सामग्री-निर्मिती करणारे 'एआय मॉडेल्स' सुधारण्यासाठी वापरकर्त्यांची क्रियाकलाप आणि माहिती वापरली जाईल. याव्यतिरिक्त, जाहिराती अधिक वैयक्तिकृत करण्यासाठी 'मायक्रोसॉफ्ट' आणि त्याचे भागीदार वापरकर्त्यांच्या डेटामध्ये प्रवेश मिळवतील. असे असले तरी लिंक्डइनने वापरकर्त्यांना 'एआय' प्रशिक्षण किंवा जाहिरातींसाठी त्यांचा डेटा वापरण्यापासून दूर राहण्याचा पर्याय दिला आहे. वापरकर्ते कधीही संमती रद्द करू शकतात. »

## सोशल मीडिया

### 'मेटा'चे नवे फीचर



'मेटा' सोशल मीडियात वादळ निर्माण करणार आहे. नुकतेच त्यांनी 'व्हायब्स' नावाचा एक नवीन 'एआय व्हिडीओ फीड लाँच' केला आहे. तिथे वापरकर्ते 'एआय-जनरेटेड' व्हिडीओ तयार आणि रीमिक्स करू शकतील. 'सोशल कंटेंट'मध्ये नवीन श्रेणी तयार करण्यासाठी कंपनीने हे धाडसी पाऊल उचलले असून हे 'टिकटॉक' सारख्या इतर प्लॅटफॉर्मना आव्हान देईल. 'मेटा'ने या फीडद्वारे 'एआय-जनरेटेड कंटेंट'वर डाव खेळला आहे. 'व्हायब्स' मेटा एआय ॲप आणि वेबसाइटद्वारे ॲक्सेस करता येते. हा एक प्रकारचा 'एआय चॅटबॉट' असून तो क्रिएटिव्ह हब म्हणून काम करेल. उदाहरणार्थ, सध्या तुम्हाला 'सोशल मीडिया'वर इतरांनी तयार केलेले व्हिडीओ दिसतात; परंतु 'व्हायब्स'वर 'एआय'ने तयार केलेले व्हिडीओ मानवी प्रॉम्प्टनंतर दिसतील. एखादा व्हिडीओ आवडला तर प्लॅटफॉर्म तो रीमिक्स करण्याचा पर्याय देईल. तुम्ही यात संगीत जोडू शकता, व्हिज्युअल बदलू शकता किंवा आवडीचा नवीन प्रॉम्प्ट देऊन पूर्णपणे नवीन व्हिडीओही तयार करू शकता. 'टिकटॉक'शी नवीन पद्धतीने स्पर्धा करण्यासोबतच, 'मेटा'ने एक नवीन श्रेणीदेखील दिली आहे. काही दिवसांपूर्वीच, एलन मस्क यांनी घोषणा केली, की बंद पडलेले वाईन ॲप आता पुन्हा सुरू केले जाऊ शकते. त्यात 'एआय-जनरेटेड' व्हिडीओंचा समावेश आहे. 'मस्क' यांच्या योजना पूर्ण होण्यापूर्वीच 'मेटा'ने एक नवीन प्लॅटफॉर्म लाँच केला आहे. »

# करिअर कसे निवडाल ?

**करीअरवेध**

दहावीचा टप्पा पार करतो न करतो तोच पुढे काय करायचे हा तोच प्रश्न पडू लागतो. पण आपल्याला नेमके कशात करियर करायचे आहे, हे बऱ्याच विद्यार्थ्यांना पदवीचे शिक्षण पूर्ण होईपर्यंतही कळत नाही. कारण बऱ्याचदा निवडलेले करियर पालकांच्या, इतरांच्या सल्ल्याने निवडलेले असते. त्यामुळे पुढची सगळीच गणिते चुकत जातात. हा धोका टाळण्यासाठी योग्य वेळी, योग्य वयात, योग्य करियर निवडणे खूप गरजेचे असते.

आपल्याला काय करायचे आहे आणि आपण काय करत आहोत याचा विचार स्पष्ट नसला, यात घोळ झाला तर अनेक समस्या निर्माण होतात. एकवेळी यातून आपल्याला पैसे मिळतातही पण कामाचे समाधान मात्र कधीही मिळत नाही. म्हणून, करियर निवडताना खूप सावध राहायला हवे. जसे की, करियर निवडण्यापुढे स्वत:ला काही प्रश्न विचारणे गरजेचे आहे. ते म्हणजे मी कोण आहे, माझी तत्व काय आहेत, मला काय करायला आवडते, मला काय येते, आपण काय पेलू शकतो, माझ्यात कोणती कौशल्ये आहेत... प्रत्येकाने या प्रश्नांची उत्तरे मिळवायला हवीत. एकदा ती मिळाली की नेमके कोणत्या क्षेत्रात पुढे जायचे हे निश्चित होईल आणि करियर निवडणे




सोपे जाईल.

बऱ्याचदा आपल्यापुढे अनेक पर्याय असतात. खूप काही येत असते आणि खूप काही करावेसे वाटत असते. अशावेळी त्यातले सर्वात जास्त काय आवडते, कोणती आवड आपण काम म्हणून स्वीकारली तर बराच काळ सांभाळू शकतो हे विचारात घ्यावे. एकदा याची खात्री झाली की करियर निवडणे अधिक सोपे होईल. करियर निवडताना आपणच आपले मूल्यमापन करणे गरजेचे ठरते. आपले शिक्षण काय, पात्रता काय, अंगी कोणते गुण आहेत हे पारखणे गरजेचे असते. पात्रतेनुसार कोणते क्षेत्र आपल्याला करियर करण्यासाठी योग्य आहे याचा विचार नक्की करावा कारण पुढे जाऊन निवडलेल्या क्षेत्रात यशस्वीरित्या काम करणे ही मोठी जबाबदारी असते.

**पुढचा विचार महत्त्वाचा**

करियर निवडताना आवड लक्षात घेतल्यानंतर सगळ्यात महत्त्वाचा भाग म्हणजे आपण स्वतःला कुठे पाहतो. कारण करियर निवडायचे असेल तर आपल्यापुढे एक लक्ष्य असायला हवे. पुढच्या पाच ते दहा वर्षांत मला कोणत्या विशिष्ट ठिकाणी पोहोचायचे आहे हे निश्चित असायला हवे. मग ते एखादे पद असेल, उपाधी असेल किंवा आर्थिक वृद्धी असेल. त्याचा विचार करूनच करियर निवडावे. त्यामुळे तिथे पोहोचणे सोपे होते.

जगण्यासाठी लागतो तो पैसा. हल्लीच्या महागाईच्या जगात तर पैशाशिवाय काहीच शक्य नाही. त्यामुळे आपण निवडतो आहोत, त्या क्षेत्रातून पैसे कसे मिळवायचे, त्यात जास्त पैसे मिळत नसतील तर पूरक आणि पोषक असे दुसरे कोणते क्षेत्र आहे, त्याचाही विचार करायला हवा. कारण समाधानासोबत आर्थिक गरज भागणे तितकेच महत्त्वाचे आहे. »

# शेरवानी खरेदी करताय?

**स्टाईल स्टेटमेंट**



एक काळ असा होता, की लग्नाच्या तयारीत वधूची अधिक लगबग असे. परंतु आजकाल वरालाही लग्नाच्या दिवशी खास दिसायचे असते. अर्थातच यासाठी परिपूर्ण पोशाख असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे लक्षात घेता अनेकजण शेरवानीला प्राधान्य देतात. मात्र शेरवानी खरेदी करताना काही लहानसहान गोष्टीही लक्षात ठेवल्या पाहिजेत. त्याकडे दुर्लक्ष झाले तर लूक बिघडू शकतो.

पहिली बाब म्हणजे शेरवानी योग्य आकारात नसेल तर लूक खराब होऊ शकतो. खूप सैल किंवा अति घट्ट शेरवानीत योग्य लूक मिळणे कठीण आहे. आरामदायी वाटेल आणि स्टायलिश दिसेल असे फिटिंग असणे गरजेचे आहे. हे लक्षात घेता इतरांच्या आवडीनुसार शेरवानी निवडू नका. लग्नाची थीम आणि तुमच्या त्वचेच्या रंगावर आधारित शेरवानीचा रंग निवडा. शेरवानींसाठी काही रंग सदाहरित मानले जातात. त्यात सोनेरी, क्रीम आणि पांढऱ्या रंगाचा समावेश होतो. आजकाल मुलांमध्ये पेस्टल रंगाच्या शेरवानीदेखील लोकप्रिय आहेत. कधीही स्वस्त स्त्रोताकडून शेरवानी खरेदी करू नका.

शेरवानीची गुणवत्ता चांगली असावी. चांगल्या मटेरियलपासून बनवलेले हे देखणे कपडे जास्त काळ टिकतात आणि चांगला लूक देतात. शेरवानी आयुष्यभर जपली जाते कारण त्यात लग्नाच्या आठवणी असतात. तेव्हा थीमनुसार हलकी किंवा भरजरी काम केलेली शेरवानी निवडा. अर्थात जास्त भरतकाम आवडत नसेल तर अशी शेरवानी टाळा. दुसरे म्हणजे वराचा लूक केवळ शेरवानीने पूर्ण होत नाही. तेव्हा पगडी, शूज, नेकपीस किंवा अंगठी आदी ॲक्सेसरीजही शेरवानीशी पूर्णपणे जुळत असल्याची खात्री करा.

पूर्वी कॉन्ट्रास्टिंग ॲक्सेसरीज घालण्याचा ट्रेंड असायचा; परंतु आता वर चप्पलांपासून पगडीपर्यंत सर्व काही शेरवानीशी जुळणारे घालतात. हा ट्रेंड लक्षात घ्या. कधीही एका दिवसात शेरवानी खरेदी करू नका. प्रथम आपल्याला काय शोभते आणि काय ट्रेंडिंग आहे हे पाहण्यासाठी बाजारात फेरफटका मारा. ट्रायल घेऊन काळजीपूर्वक विचार केल्यानंतर निवड अंतिम करा. डिलिव्हरी घेण्यापूर्वी लूक परिपूर्ण असल्याची खात्री करणारी ट्रायलही अवश्य घ्या. »

# गझल सम्राट सुरेश भटांचा अंदाज-ए-बयाँ और ...






■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १३ :

न तो हसने को न हसाने को गजल कहते है
हम तो हाल ए दिल सुनाने को गजल कहते है
ये आसू है ईन्हे फुलो मे शबनम की तरह रखना
ये तो एहसास है एहसास को गजल कहते है

मराठीतील ३० पेक्षा अधिक काव्यप्रकारापैकी सर्वात लोकप्रिय असलेली गझल काय आहे याचा अर्थ, उलगडत जीवनातील भावना, संवेदना सुख, दु:ख, वेदना या अनुभूतींचा अविष्कार आपल्या गझलामध्ये गझल सम्राट सुरेश भट जेवढ्या ताकदीने करतात तेवढ्याच संवेदनशीलतेने त्याला सौंदर्य स्पर्श होतो. सुरेश भट म्हणतात जीवन हे अपूर्ण आहे पण त्याची पूर्तता जीवनाच्या जखमा करीत असतात. या जखमांना मी अर्थ मागतो आणि तो शब्दांना देतो. म्हणूनच त्यांचे दु:ख हे व्यक्तिगत न राहता सामाजिक होत वैश्विक बनते. जीवन जगण्यातील उत्कटता आणि आत्मनिष्ठा अधिक तीव्रतेने त्यांच्या गझलांमध्ये उमटत असल्यानेच त्यांच्या गझला मराठी रसिकांच्या हदयावर अधिराज्य गाजवित आहे. असे सांगत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष अक्षयकुमार काळे यांनी गझल सम्राट सुरेश भट यांच्या गझलातील ताकद उलगडत सुरेश भट म्हणजे अंदाज-ए-बयाँ और आहे अशा शब्दात त्यांच्या गझल कौशल्याचे अनोखेपण दाखविले.

चिटणवीस सेंटर येथे कविवर्य सुरेश भट यांच्या गझलांवर आधारित गीत गझल संध्याचे आयोजन केले होते. यावेळी सुरेश भट यांचे शिष्य लेखक, गझलकार प्रदीप निफाडकर यांच्या मराठी गझल के उस्ताद सुरेश भट और... या पुस्तकाचे प्रकाशन अक्षयकुमार काळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान वनराईचे विश्वस्त डॉ. गिरीश गांधी यांनी भूषविले. मंचावर दैनिक महासागरचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक व प्रदीप निफाडकर उपस्थित होते.






## डॉ. अक्षयकुमार काळे यांनी उलगडली सुरेश भटांच्या गझलांची ताकद

यावेळी गझल म्हणजे प्रियतमाशी केलेली हितगुज आणि त्यातील संवेदना, वेदना जितक्या उत्कटतेने सुरेश भट आपल्या गझलांमध्ये मांडतात तितक्या त्या समाजनिष्ठेचे परिमाण आहेत. म्हणूनच जितक्या आर्ततेने ते मलमली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे लिहितात तितक्याच क्रांतिकारी विचारांनी उष:काल होता होता काळरात्र झाली हेही लिहितात. असे ते म्हणाले. सुरेश भटांच्या गझला जितक्या सामान्यांचे मनोरंजन करतात तितक्याच नवोदितांसाठी दीपस्तंभ ठरतात. यावेळी त्यांनी सुरेश भट यांच्याबद्दल प्रदीप निफाडकर यांचे असलेले अतूट प्रेम हे त्यांच्या पुस्तकातील पानापानांत दिसून येत आहे. आणि ही श्रद्धाच त्यांना गझल निर्मितीचे बळ देते.

साय मी खातो मराठीची
मी कुणाचा उंबरा झिजवू कशाला

असे म्हणणारे सुरेश भट प्रखर मराठी स्वाभिमानी होते. म्हणून त्यांनी हिंदीत थोड्याच गझला लिहिल्या. त्यामुळे ते महाराष्ट्रापुरते सिमित राहिले. ते जेवढे हयात असताना उपेक्षित राहिले तितकेच त्यांच्या जाण्यानंतरही उपेक्षित राहिले. हे आपले दुर्दैव आहे. त्यांच्या गझलांवरील हिंदी पुस्तक प्रकाशित होऊ नये म्हणून हिंदी साहित्य अकादमीने अनेक प्रयत्न केले. इतक्या ताकदीच्या सुरेश भट यांना सर्व देशाने ओळखावे म्हणून सर्व भारतीय भाषांमध्ये मी त्यांचे पुस्तक आणणार आहे असा मानस यावेळी प्रदीप निफाडकर यांनी व्यक्त केला. श्रीकृष्ण चांडक यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल समाधान व्यक्त करीत म्हटले की, साहित्य, कला, संस्कृती यांच्या मैफलीतून मानव समृद्ध होत जातो. याच जाणिवेतून संस्कृतीदर्शनाचा स्पर्श घडवून देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. यावेळी डॉ गिरीश गांधी यांनी प्रदीप निफाडकर यांनी आपल्या गुरुवारील जी श्रद्धा दाखविली त्याचे कौतुक केले.

यानंतर सुरेश भट यांच्या गझलांवर आधारित शाम जैन व श्रुती जैन यांच्या सुमधुर गायनाचा गीत गझल संध्या हा कार्यक्रम प्रस्तुत करण्यात आला. यावेळी केव्हातरी पहाटे उलटून रात्र गेली, चांदण्यात फिरताना, सुन्या सुन्या मैफलीत माझ्या, पहाटे पहाटे मला जाग आली, तरुण आहे रात्र अजुनी, इतकेच मला जाताना सरणावर कळले होते यासारख्या एकापेक्षा एक सुरेख गझलांचे सादरीकरण करण्यात आले व सोबतच प्रत्येक गझलेच्या घडणामागील कहाणी सांगत प्रदीप निफाडकर यांनी सुरेश भटांचे अंतरंग उलगडले. तत्पूर्वी विष्णू मनोहर यांनी सुरेश भटांच्या हुबेहूब आवाजात गझल प्रस्तुत केली.आयोजक ऋतुराज एंटरटेनमेंटच्या संचालिका भक्ती यांना श्रीकृष्ण चांडक यांनी सन्मानित केले.

व्यवस्थापकीय संपादक पंकज चांडक, मुख्य कार्यकारी अधिकारी यु. एस. लाल, मुख्य कार्यकारी संपादक मनोज बागडे, निलेश लोणारे ,आशिष कौशल यांनी मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी सभागृहात बाल कुलकर्णी,लोकनाथ यशवंत, किशोर कण्हेर, मनीष सोनी, प्रभाकर दुपारे, शुभदा फडणवीस व समस्त चांडक परिवार उपस्थित होते कार्यक्रमाचे संचालन व आभार धनश्री सेवलकर यांनी मानले.

# मालगाडीच्या धडकेत वाघाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

बल्लारशाह - गोंदिया रेल्वे मार्गावर ब्रम्हपुरी वनक्षेत्रात आलेवाही-सिंदेवाहीच्या मधात रात्री मालगाडीच्या धडकेत बिट्टु या पट्टेदार वाघाचा मृत्यू झाला आहे. या वर्षातील वाघाचा मृत्यू होण्याची ही दुसरी घटना आहे. या मार्गावर आतापर्यंत सुमारे १८ वाघ मृत्युमुखी पडले आहे.

या अपघातामुळे या महामार्गावर यंदाच्या वर्षात मृत्यू पावलेल्या वन्यजीवांचा संख्या आठ झाली आहे. दिवसागणिक हा रेल्वे मार्ग वन्यजीवांसाठी धोक्याचा ठरत असून वाघाचा मृत्यू झाल्यावरच वन विभाग जागे होणार आहे का, असा सवाल स्थानिक वन्यजीवप्रेमी करत आहेत. बल्लारशाह-गोंदिया रेल्वे मार्गावर यापूर्वी लोहार येथे सोमवार ८ सप्टेंबर रोजी सांबराच्या पिल्लाचा मृतदेह आढळला होता. बल्लारशाह- गोंदिया रेल्वे मार्ग हा ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या लगतच आहे. वाघांचा भ्रमण मार्गाचा एक भाग सुद्धा आहे.

कावल अभयारण्य, उमरेड-कऱ्हांडला अभयारण्याच्या वन्यजीव भ्रमण मार्गात हा रेल्वे मार्ग येतो. हाच रेल्वे मार्ग पुढे बालाघाट- नैनपूर मध्य प्रदेशमधून जातो.



## महासागर मीडिया ग्रुपच्या मुख्य समूह संपादकपदी
# संदीप काळे यांची नियुक्ती



संपादक, लेखक आणि संघटक म्हणून ओळखले जाणारे संदीप रामराव काळे यांची दैनिक महासागर मीडिया ग्रुपच्या मुख्य समूह संपादकपदी निवड करण्यात आली आहे.

गेल्या २६ वर्षांपासून संदीप काळे पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत आहेत. गावकरी, प्रहार, लोकमत, सकाळ या प्रतिष्ठित वर्तमानपत्रांमध्ये तसेच आयबीएन लोकमत आणि जय महाराष्ट्र या न्यूज चॅनेल्समध्ये त्यांनी संपादक आणि विविध पदांवर कार्य केले आहे. त्यांच्या पत्रकारितेतील योगदानाने वाचकांच्या मनात ठसा उमटवला आहे. संदीप काळे यांनी पत्रकारिता आणि इतर चार विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. मुळचे नांदेड जिल्ह्यातील पाटणूर येथील असलेले काळे सध्या मुंबईत वास्तव्यास आहेत. अनेक महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये ते प्राध्यापक म्हणून कार्यरत राहिले असून सामाजिक चळवळीतही त्यांचा सक्रिय सहभाग आहे.

आतापर्यंत त्यांनी ७६ पुस्तके लिहिली असून त्यातील ट्रॅव्हेल फेल या अनुवादित पुस्तकावर आधारित चित्रपट थेट ऑस्करपर्यंत पोहोचला. मु.पो. आई या त्यांच्या प्रसिद्ध पुस्तकाच्या ७८ आवृत्त्या प्रकाशित झाल्या असून ते १३ विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. त्यांच्या आत्मचरित्रावर आधारित ऑल इज वेल या पुस्तकावर लवकरच चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

त्यांच्या लेखनाची दखल इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स आणि लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स यांनी घेतली आहे. भ्रमंती लाईव्ह, वास्तव, आता पुढे काय आणि भ्रमंती लाईव्ह स्टोरी हे त्यांचे दीर्घकाळ चाललेले लोकप्रिय कॉलम वाचकांच्या विशेष पसंतीस उतरले आहेत. काळे यांनी स्थापन केलेली आणि ते आंतरराष्ट्रीय अध्यक्ष म्हणून कार्यरत असलेली व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्ही.ओ.एम. इंटरनॅशनल फोरम ही पत्रकारांसाठीची संघटना आज ५६ देशांमध्ये प्रभावीपणे कार्यरत आहे. या संघटनेत ७ लाख ४० हजारांहून अधिक पत्रकार व पदाधिकारी सक्रीय आहेत. राज्य शासन, सामाजिक संस्था आणि विविध पत्रकार संघटनांकडून त्यांना आजवर २६० पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांनी पाटील आणि महाराष्ट्र फाईल या चित्रपटांत अभिनयही केला आहे.

सध्या दैनिक महासागर (१४ आवृत्त्या), नागपूर पोस्ट (२ इंग्रजी आवृत्त्या) आणि युवाराष्ट्र दर्शन (१ आवृत्ती) ही वृत्तपत्रे महासागर मीडिया समूहांतर्गत यशस्वीरीत्या प्रकाशित होत आहेत. येत्या काळात समूहाच्या नवीन आवृत्त्या सुरू होणार असून, दैनिक महासागर आज महाराष्ट्राबरोबरच ऑनलाईन माध्यमांतून जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचत आहे. डिजिटल, ऑनलाईन, प्रिंट आणि इव्हेंट्स या सर्व क्षेत्रांत अत्याधुनिक क्रांती घडवून आणत, महासागर मीडिया समूहाने आपल्या ५५ वर्षांच्या गौरवशाली परंपरेचे जतन आणि संवर्धन केले आहे. १९७४ साली कवीश्रेष्ठ स्व. सुरेश भट यांनी दैनिक महासागरच्या कार्यकारी संपादकपदाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली होती याशिवाय आजच्या अनेक नामवंत पत्रकारांनी महासागरला आपली सेवा दिली आहे. महासागर परिवारात स्वागत !

**श्रीकृष्ण चांडक**
**मुख्य संपादक व संचालक**

सर्दी खोकल्यावर उपचारानंतर
## बालकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. १३ :

मध्यप्रदेशातील २२ पेक्षा अधिक बालकांचा कप सिरपमुळे मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच यवतमाळातही एका सहा वर्षीय बालकाचा सर्दी, खोकल्यावरील उपचारानंतर मृत्यू झाला. या घटनेमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली असून, अन्न व औषध प्रशासन विभागाने औषधीचे नमुने तपासणीसाठी ताब्यात घेतले. बालकाला सर्दी खोकल्याचा त्रास असल्याने पालकांनी स्थानिक वीर वामनराव चौकातील एका खासगी बाल रुग्णालयात आणले. ४ ऑक्टोबर रोजी प्रकृती दाखवून औषध घेऊन ते गावी परतले.

मात्र आराम न मिळाल्याने पुन्हा ६ ऑक्टोबरला पालकांनी त्याच दवाखान्यात आणले. डॉक्टरने औषधे बदलून दिली. नवीन औषधे घेऊन गावी गेल्यानंतर ७ ऑक्टोबरला त्याची कृती बिघडली. तो बेशुद्ध पडला आणि त्याला श्वास घ्यायला त्रास होऊ लागला.

पालकांनी त्याला पुन्हा त्याच बालरोग तज्ज्ञाकडे नेले. मात्र त्याची प्रकृती चिंताजनक असल्याने खासगी दवाखान्यातील डॉक्टरने त्याच्यावर उपचार करण्यास नकार देऊन त्याला शासकीय रुणालयात रेफर केले. अपघात कक्षातील डॉक्टरांनी तपासले असता शिवमचा मृत्यू झाल्याचे सांगितले. बालकाचे शवविच्छेदन करण्यात आले.



नागपूर

# महासागर वृत्तसागर

■ मंगळवार, दि. १४, ऑक्टोबर २०२५ ■


## पाच वर्षात ४५७ जणांचा रस्ते अपघातात बळी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :**

वाहतुकीच्या नियमांचे वारंवार उल्लंघन केल्यामुळे दिवसेंदिवस रस्ते अपघातात वाढ झाली आहे. गेल्या पाच वर्षात रस्ते अपघात जड वाहनांमुळे शहरात 422 अपघात झाले. यात 457 लोकांचा मृत्यू झाला आहे. तसेच या अपघातात 563 जण गंभीर जखमी झाले असून त्यांना कायमचे अपंगत्व आले आहेत. यादरम्यान घडलेल्या 180 अपघातात 247 जण लोक किरकोळ जखमी झाले. त्यामुळे, जड वाहतुकीला शहरात नो एन्ट्री असणार आहे, अशी माहिती वाहतूक विभागाने दिली आहे.

अन्य राज्यातून किंवा शहरातून उपराजधानीत होणारी वाहतूक वाढत्या अपघाताला कारणीभूत ठरत असल्याचे सांगत नागपूर शहर वाहतूक विभागाचे उपायुक्त लोहित मतानी यांनी शहरातून जड वाहतुकीला बंदी घातली आहे. याबाबतचे परिपत्रक त्यांनी जारी केले. त्यामुळे, बाहेरून येणारी वाहतूक ही आऊटर रिंगरोडच्या मार्गाने शहराबाहेरून प्रवास करतील तर शहरात आवश्यक जड वाहतुकीलाही प्रतिबंध घालण्यात आला आहे.

शहराबाहेरून नागपूर मार्गाने दुसऱ्या स्थानावर जाण्यासाठी आऊटर रिंगरोड असतानाही याचा वापर न करता ही वाहतूक शहरातील अंतर्गत मार्गांवरून होत आहे. यामुळे शहरात अपघातांची संख्या वाढत आहे. मागील पाच वर्षांतील अपघात बघता जड वाहनांमुळे शहरात 422 अपघात झाले असून यात 457 लोकांचा बळी गेला आहे. शहर पोलिसांनी जारी परिपत्रकात विविध मार्गांनी शहराच्या दिशेने होणारी जड वाहतूक आऊटर रिंगरोडच्या कुठल्या मार्गाने वळवावित याबाबत नमूद केले आहेत.

# कोरडवाहू व पाणी टंचाई ग्रस्त गावात

## एसबीआय फाउंडेशनच्या पुढाकारातून ग्राम सक्षम प्रकल्प साकार



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :**

एसबीआय फाउंडेशनच्या 'ग्राम सक्षम' प्रकल्प अंतर्गत नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यातील सावंगी (बु) व सावंगी (खुर्द) या कोरडवाहू व पाणी टंचाई ग्रस्त गावात पावसाच्या पाण्याचे संधारण, संवर्धन व भूजलाचे पुनर्भरण प्रकल्प कार्य साकार झाले. या प्रकल्पा अंतर्गत जलस्त्रोत सावंगी नाल्याचे वाटरशेड विकास आधारित नाल्याचे गाळमुक्तिकरण, खोलीकरण व रुंदीकरण कार्य सद्भावना ग्रामीण विकास संस्था, वर्धा यांचे माध्यमातून पूर्ण झाले.

या कामामुळे कोरडवाहू क्षेत्रातील जलस्त्रोताची साठवण क्षमता व भूजल पुनर्भरण क्षमता मोठ्या प्रमाणात वाढल्याने ग्रामीण व कृषि क्षेत्रासाठी पिण्याचे पाणी, घरगुती वापराचे पाणी, पशुपालनासाठी पाणी व शेती करिता खरिप व रब्बी पिका करिता आवश्यक संरक्षित सिंचनाचे पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध झाले आहे. ज्या प्रमाणे पाण्याच्या दुष्काळापासून परिसर दुष्काळमुक्त झाला त्याच बरोबर जलस्त्रोताच्या विकासामुळे पावसाच्या पाण्याचा पुरामुळे दरवर्षी होणारे नुकसान टळले आहे.

या पुरमुक्त व दुष्काळमुक्त स्थितीमुळे ग्रामीण व शेतकरी लोकांचे अर्थकारन वाढत्या उत्पादनामुळे व वाढलेल्या उत्पनामुळे अर्थव्यवस्था मजबूत झाली आहे. या प्रकल्पामागे प्रेरणा विकास पुरुष केंद्रीय मंत्री . नितीनजी गडकरी यांची असून सहयोग पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्था, माध्यमातून करण्यात आली.

या जलसंधारण कार्या व्यतिरिक्त, एसबीआय फाउंडेशनने त्यांच्या सीएसआर निधीतून गावात "किसान भवन" देखील निर्माण केले. या इमारतीचा उद्देश गावकऱ्यांना एक सामायिक व्यासपीठ प्रदान करणे आहे जिथे ते एकत्रितपणे शेती, पाणी व्यवस्थापन आणि इतर समस्यांवर चर्चा करु शकतात. ही इमारत आधुनिक सुविधांनी सुसज्ज आहे, ज्यामध्ये खुर्चा, टेबल, इंटरनेट, शुद्ध पाण्याचे फिल्टर आणि इतर सर्व आवश्यक वस्तूंचा समावेश आहे आणि त्याची देखभाल आणि दुरुस्तीची जबाबदारी स्थानिक ग्रामस्थांवर सोपवण्यात आली आहे.

या प्रकल्पात कृषी उपजीविका मजबूत करण्यावरही भर देण्यात आला. कृषी विज्ञान केंद्राच्या एक दिवसाच्या अभ्यास दौऱ्याद्वारे ग्रामस्थांना कृषी आणि पूरक व्यवसाय व्यवस्थापनावर मार्गदर्शन मिळाले. याव्यतिरिक्त, शेतकऱ्यांना लहान आकाराचे बियाणे आणि भाजीपाला पिकांचे बियाणे वाटप करण्यात आले आणि लागवड पद्धतींवर कार्यशाळा घेण्यात आल्या.

नाल्याचे खोलीकरण आणि रुंदीकरण केल्याने शेतकऱ्यांमध्ये शेतीबद्दल नवीन उत्साह आणि आत्मविश्वास निर्माण झाला आहे. ग्रामस्थांनी त्यांचे अनुभव सांगितले की, यावर्षी मुसळधार पाऊस असूनही, नाल्याची खोली आणि रुंदी वाढल्याने शेतात पाणी शिरु शकले नाही, त्यामुळे पिकांचे नुकसान टाळता आले. कृषी विज्ञान केंद्र नागपूर चे कृषीतज डॉ. मयूर मेश्राम, हरीश भगत आणि मारुती चवरे सारख्या तज्ञांनी शेती, माती आणि पाणी व्यवस्थापनाचे महत्त्व यावर प्रशिक्षण दिले, त्यांची समज वाढवली आणि त्यांना पाणी पुनर्भरण आणि नाल्याच्या देखभालीचे महत्त्व कळवले. या प्रकल्पाचे समन्वयक सत्यजित जांभुळकर, व सुपरवायझर गौतम मेश्राम यांच्या देखरेखीखाली झालेल्या या कार्यक्रमात शेकडो पुरुष आणि महिलांनी उत्साहाने भाग घेतला. गावकऱ्यांनी एसबीआय फाउंडेशन आणि सद्भावना संस्थेचे यशस्वी अंमलबजावणीसाठी मनापासून आभार मानले, कारण हा उपक्रम "पाणी हेच जीवन आहे" या म्हणीला पुन्हा पुष्टी देतो असे मानले.

## दिवाळीचा फराळ पाठवा थेट परदेशात

### नागपूर टपाल विभागाचा उपक्रम

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :**

परदेशातील नातेवाईकांना दिवाळीच्या फराळाचा आनंद घेता यावा म्हणून फराळ त्यांच्यापर्यंत पोहचविण्यासाठी नागपूर टपाल विभाग यंदाही सज्ज झाला आहे. दिवाळीनिमित्त नागपूर टपाल विभागाने फराळाचे पदार्थ नाममात्र किमतीमध्ये पॅकिजिंग करून माफक दरात परदेशात पाठविण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे, अशी माहिती नागपूर विभागाचे सहायक निदेशक गजेंद्र जाधव यांनी दिली.

दिवाळीचा फराळ करून तयार आहे पण, तो पाठविण्याचा मुहूर्त लागत नाही. तसेच आपल्या दैनंदिन कामातून वेळ काढून टपाल कार्यालयामध्ये येऊ शकत नाहीत, अशा नागरिकांसाठी घरी येऊन फराळ पार्सल घेऊन जाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी पोस्टमन घरी येऊन फराळाच्या पदार्थांचे पार्सल विनामूल्य घेऊन जातील. १९२ देशात सेवा उपलब्धयुके, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युएई, जर्मनी, इंग्लंड, चीन, रशिया अमेरिकासारख्या प्रमुख १९२ देशात सेवा उपलब्ध आहे. चिवडा, लाडु, करंजी, चकली, शेव यासारखे पारंपरिक पदार्थ पाठवता येणार आहे. पार्सलसेवा जवळच्या प्रमुख टपाल कार्यालयात उपलब्ध असून ग्राहकाला फक्त बुकींग करून पत्ता द्यावा लागणार आहे. नोंदणी, पॅकिजिंग आणि शुल्क एकाच ठिकाणी करता येणार आहे. विविध देशात फराळ पाठवण्याचे दर जर्मनी ५८७६, युके ६४५१, यूएई ३४९३, ऑस्ट्रेलिया ११,९१२, रशिया ६७५०, सिंगापूर ४३७८ रुपए लागतात.

इंटरनॅशनल स्पीड स्पोट सेवादिवाळीचा फराळ विदेशात पाठवण्यासाठी इंटरनॅशनल स्पीड स्पोटची सेवा उपलब्ध आहे. नियमित उत्पादने विदेशात पाठवणाऱ्या कंपन्यांसाठी ३५ किलोचे पार्सल डाकघर निर्यात केंद्राद्वारे पाठवता येईल. या शिवाय डाक विभागाचे पीपीयू म्हणजे पार्सल, पॅकिजिंग यूनिट आहे. या यूनिटमध्ये विशिष्ट प्रकारचे पॅकिंग बॉक्स, रॅपिंग पेपर, सेलो टेप आदी सुविधा उपलब्ध आहे.

## महावितरणच्या सेवेत क्रांती

### नागपूर परिमंडलात टारगेट ओरिएंटेड' पुर्नरचनेचा प्रारंभ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :**

महावितरणच्या ग्राहकसेवेत आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांच्या जबाबदारीत अधिक स्पष्टता आणण्याच्या महत्त्वाकांक्षी उद्देशाने कंपनीने हाती घेतलेल्या पुनर्रचना प्रक्रियेला नागपूर परिमंडलात औपचारिकरित्या सुरुवात झाली आहे. या 'लक्ष्य-केंद्रित' पुनर्रचनेमुळे ग्राहकांना जलद आणि अधिक प्रभावी सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे, असा विश्वास महावितरण प्रशासनाने व्यक्त केला आहे.

महावितरण प्रशासनाने जाहीर केलेल्या निर्णयानुसार, या पुनर्रचनेची अंमलबजावणी १३ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू झाली आहे. या महत्त्वपूर्ण बदलाची सुरुवात नागपूर परिमंडलात आज (सोमवार) पासून करण्यात आली आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या प्रशासकीय रचनेत मोठा बदल करण्यात आला आहे. एखाद्या विभागात चार उपविभाग असतील तर आता दोन-दोन उपविभागांना एकत्रित करून त्यांचे प्रामुख्याने दोन विशिष्ट कार्यात्मक उपविभागांमध्ये विभाजन करण्यात येणार आहे:

संचलन व सुव्यवस्था: हा विभाग वीजपुरवठा दुरुस्ती, नवीन वीजजोडणी, देखभाल, तांत्रिक सुरक्षा आणि वीज पुरवठ्यासंबंधी ग्राहक तक्रारींचे निवारण यांसारख्या कामांवर लक्ष केंद्रित करेल.

देयक व महसूल: या विभागात वीजबिल देयके, महसूल संकलन, वीज बिलांबाबत ग्राहकांच्या तक्रारी आणि वसुलीची कामे प्रामुख्याने केली जातील.

नवीन पुनर्रचना निर्णयानुसार कर्मचाऱ्यांची कामांनुसार स्पष्ट विभागणी होणार आहे. यामध्ये प्रत्येक कर्मचाऱ्यावर त्याच्या निवडक कामाचीच जबाबदारी निश्चित केली जाईल. तांत्रिक पथक: वीजपुरवठा दुरुस्ती, ग्राहक तक्रारी निवारण, नवीन वीजजोडणी, देखभाल, दुरुस्ती आणि सुरक्षा. वसुली पथक: देयक संकलन, वीज बिलांच्या तक्रारी आणि थकबाकी वसुली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, थकबाकी वसुलीसाठी नेमलेल्या वसुली पथकावर उपविभागीय कार्यालयाचे थेट नियंत्रण असणार आहे. यामुळे वसुलीच्या कामात अधिक गती आणि पारदर्शकता येण्यास मदत होईल.

कर्मचाऱ्यांवरील कामाचा अनावश्यक ताण कमी होऊन त्यांना विशिष्ट कामावर लक्ष केंद्रित करता येईल, ज्यामुळे कार्यक्षमतेत सुधारणा होईल, अशी महावितरण प्रशासनाची अपेक्षा आहे.

## जिल्हा परिषद निवडणूक विभागाच्या सदस्यांचे आरक्षण सोडत जाहीर



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :**

जिल्हधिकारी डॉ.विपीन इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद निवडणूक विभागाच्या 57 सदस्यांची आरक्षणाची सोडत आज जाहीर करण्यात आली. यावेळी विविध पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हा परिषदेत एकूण 57 निवडणूक विभाग असून अनुसूचित जाती-10 (महिला-5),अनुसूचित जमाती-8 (महिला-4), नागरिकांचा मागासवर्ग-15 (महिला-8) व खुला प्रवर्ग-24 (महिला-12) असे आरक्षण जाहीर करण्यात आले आहेत. नागपूर जिल्हा परिषद निवडणूक विभागातील आरक्षित जागा - २०२५ चा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकाचा मागास प्रवर्ग, खुला प्रवगार्चा तालुकानिहाय तपशिल खालील प्रमाणे आहे.

सावनेर तालुक्यातील बडेगाव - सर्वसाधारण, वाघोडा- नागरिकांचा मागास प्रवर्ग, केळवद - नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), पाटणसावंगी- सर्वसाधारण, वलनी- सर्वसाधारण (महिला), चनकापूर- अनुसूचित जाती, चिचोली- अनुसूचित जाती. पारशिवनी तालुक्यातील माहुली-अनुसूचित जमाती (महिला), करंभाड- सर्वसाधारण (महिला), गोंडेगाव- नागरिकांचा मागास प्रवर्ग, टेकाडी (को.ख.)- सर्वसाधारण, रामटेक तालुक्यातील वडांम्बा- अनुसूचित जमाती, बोथिया (पालोरा)- अनुसूचित जमाती, सोनेघाट- अनुसूचित जमाती (महिला), मनसर -अनुसूचित जमाती (महिला), नगरधन- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) असे आहेत.

मौदा तालुक्यातील अरोली- सर्वसाधारण, खात- सर्वसाधारण (महिला), चाचेर- सर्वसाधारण, तारसा- नागरिकांचा मागास प्रवर्ग, धानला- नागरिकांचा मागास प्रवर्ग. कुही तालुक्यातील राजोला- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), वेलतूर- अनुसूचित जाती (महिला), सिल्ली- सर्वसाधारण, मांढळ- अनुसूचित जाती. कामठी तालुक्यातील कोराडी- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), भिलगाव- सर्वसाधारण (महिला), गुमथळा- सर्वसाधारण (महिला), वडोदा- सर्वसाधारण. नागपूर (ग्रामीण) तालुक्यातील भोकारा- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला), कापसी खुर्द- सर्वसाधारण, दवलामेटी- अनुसूचित जाती (महिला), सोनेगाव निपानी- सर्वसाधारण, बोरखेडी फाटक- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला). कळमेश्वर तालुक्यातील तेलकामठी- नागरिकांचा मागास प्रवर्ग(महिला), धापेवाडा- सर्वसाधारण, गोंडखैरी- नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) असे आहे.

काटोल तालुक्यातील येनवा- अनुसूचित जाती, रिधोरा- नागरिकांचा मागास प्रवर्ग, पारडसिगा- अनुसूचित जाती, दुधाळा- सर्वसाधारण (महिला). नरखेड तालुक्यातील बेलोना-सर्वसाधारण (महिला), सावरगांव- सर्वसाधारण (महिला), जलालखेडा- सर्वसाधारण (महिला), भिष्णुर- सर्वसाधारण. हिंगणा तालुक्यातील रायपूर- सर्वसाधारण (महिला), ईसासनी- अनुसूचित जाती (महिला), टाकळघाट- अनुसूचित जाती (महिला), सावंगी (देवळी)- अनुसूचित जमाती, कान्होलीबारा- अनुसूचित जमाती (महिला). उमरेड तालुक्यातील मकरधोकडा- नागरिकांचा मागास प्रवर्ग, वायगाव- अनुसूचित जाती (महिला), बेला- सर्वसाधारण, सिसी- नागरिकांचा मागास प्रवर्ग. भिवापूर तालुक्यातील तास- सर्वसाधारण (महिला), मालेवाडा- सर्वसाधारण (महिला), नांद- अनुसूचित जमाती असे एकुण 57 जिल्हा परिषद निवडणूक विभागाच्या सदस्यांचे आरक्षण आहेत.

## कारागृहातील ६८० महिलांच्या हातांवर सजली मेहंदी



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :**

खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने महिला सक्षमीकरण आणि सणांचा आनंद पोहोचविण्याच्या उद्देशाने शारदोत्सवात राबविण्यात आलेल्या मेहंदी उत्सवाचा समारोप सोमवारी नागपूर मध्यवर्ती कारागृहात करण्यात आला. संस्कार भारतीच्या अध्यक्षा आणि सामाजिक कार्यकर्त्या कांचनताई गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात कारागृहातील ६८० महिला बंदिवान, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या हातांवर सुंदर मेंहदीचे रेखाटन करण्यात आले. कांचनताईंच्या हते यावेळी कारागृहातील बंदिवानांनी तयार केलेल्या विविध वस्तूंच्या प्रदर्शन-विक्री केंद्राचे तसेच दिवाळी मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले.

कारागृह अधीक्षक वैभव आगे, सहअधिक्षक दीपा आगे, खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा.अनिल सोले, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा.राजेश बागडी, अविनाश घुशे, निशांत गांधी तसेच भाजप महिला आघाडी अध्यक्षा दिव्या धुरडे आणि संयोजिका मनिषा काशिकर उपस्थित होत्या. मेहंदी कलाकार सुनीता धोटे यांच्या चमूने हा उपक्रम यशस्वी होण्यात महत्वाचे योगदान दिले. कांचनताई गडकरी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

### दिवाळीच्या मुहूर्तावर ४०३२ माथाडी कामगारांना

## ६ कोटी ६४ लाख बोनस

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :**

राज्य सरकारच्या कामगार मंत्रालया अतंर्गत नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर मार्फत कार्यरत असलेल्या ४०३२ माथाडी कामगारांना दिवाळी बोनस पोटी (सानुग्रह अनुदान) रु. ६,६३,३५,०७४/- (रुपये सहा कोटी त्रेसष्ठ लाख पस्तीस हजार चो-याहत्तर फक्त दि. ०६.१०.२०२५ रोजी प्रत्येक माथाडी कामगारांचे बैंक खात्यात जमा करण्यांत आलेले आहे. नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नागपूरचे अध्यक्ष संतोष ग. कोकाट व सचिव उत्कर्ष द. मोराणकर, यांनी प्रसिध्दी पत्रकात नमुद केले की, किशोर दहीफळकर अप्पर कामगार आयुक्त, नागपूर (विदर्भ विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली माथाडी मंडळात नोंदीत कार्यरत एकुण ४०३२ माथाडी कामगारांना सन २०२४-२०२५ या वर्षा करीता एकुण रु. ६,६३,३५,०७४/- बोनस (सानुग्रह अनुदान) वाटप करण्यांत आला आहे. माथाडी कामगारांना दिवाळी पुर्वी बोनस मिळाल्याने आनंदाचे वातावरण आहे.

# दिवाळीतील रोषणाई शुभ आणि सुरक्षित हवीच!

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :**

प्रकाशपर्व अर्थात दिवाळी काही दिवसांवर येऊन ठेपले असून, घरोघरी उत्साह, साफसफाई आणि तयारीची लगबग सुरू झाली आहे. या मंगलमय आणि नवचैतन्याच्या वातावरणात दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी, महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी समस्त वीज ग्राहकांना सुरक्षिततेच्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी या निमित्ताने सर्व वीज ग्राहक, कर्मचारी आणि हितचिंतकांना दिवाळी सणाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

दिवाळीतील सजावट, रोषणाई आणि फटाक्यांची आतिषबाजी यामुळे होणारी छोटीशी चूकही दुर्दैवी घटनांना आमंत्रण देऊ शकते. दरवर्षी फटाक्यांमुळे आग लागण्याच्या अनेक घटनांची नोंद होते, ज्यात दुर्दैवाने वित्तहानीसोबतच जीवितहानी होण्याचीही शक्यता असते. निष्काळजीपणा आणि सुरक्षिततेकडे दुर्लक्ष केल्यामुळे असे अपघात घडतात. आपल्या आणि कुटुंबाच्या दिवाळीचा आनंद टिकवून ठेवण्यासाठी, महावितरणने काही महत्त्वाचे खबरदारीचे उपाय सुचवले आहेत, ज्यांचे काटेकोरपणे पालन करणे अत्यावश्यक आहे.

दिवाळीत मोठ्या प्रमाणात होणाऱ्या विद्युत रोषणाईमुळे वीज यंत्रणेवर तात्पुरता ताण येतो. त्यामुळे वीजेचा वापर गरजेनुसार आणि जपून करा. बाजारात आता कमी वीज लागणारे एलईडी दिवे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. या आधुनिक दिव्यांचा वापर केल्यास वीज वापर नियंत्रित राहील आणि वीज बिलही कमी येईल. रोषणाईसाठी नेहमी उच्च दर्जाच्या मार्क असलेल्या) दिव्यांच्या माळा आणि वायर्सचाच वापर करा.

दिवाळीच्या साफसफाई आणि रंगरंगोटी दरम्यान विजेचे अपघात टाळण्यासाठी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. भिंतींना रंग लावण्यापूर्वी, विशेषतः स्विच बोर्ड आणि सॉकेटजवळ काम करताना, त्या भागाचा




मुख्य वीज पुरवठा नक्की बंद करा. रंग लावण्यासाठी वापरली जाणारी शिडी (जिना) कोणत्याही लाईव्ह वायरला स्पर्श करणार नाही याची काळजी घ्या. तसेच, कोणत्याही विद्युत उपकरणांची साफसफाई करण्यापूर्वी ते बंद करा आणि प्लगमधून काढून टाका स्विच बोर्ड्स आणि सॉकिट्स साफ करताना फक्त कोरड्या कपड्याचा वापर करा. ओला कपडा वापरणे टाळा. साफसफाई करताना सॉकिट्स, स्वीचेस आणि वायर्समध्ये तुटफूट किंवा जळाल्याचे चिन्ह आढळल्यास, त्वरित परवानाधारक इलेक्ट्रिशियनकडून दुरुस्त करून घ्या. उंदरांनी कुरतडलेल्या वायर्समुळे शॉर्ट सर्किटचा धोका वाढतो, त्यामुळे अशा वायर्स तात्काळ बदलून घ्या.

रोषणाईचे दिवे पडदे, बिछाना, पंखे किंवा मुख्य वीज तारांपासून लांब आणि सुरक्षित ठिकाणी असतील याची खात्री करा. लहान मुलांना लाईव्ह वायर्स आणि उपकरणांपासून दुर ठेवा. एकाच विद्युत सॉकेटवर अनेक दिव्यांच्या माळा किंवा उपकरणे जोडून अतिरिक्त भार (ओव्हरलोड) टाकणे टाळा. वीज तारांजवळ किंवा विजेच्या उपकरणांजवळ फटाके उडवणे पूर्णपणे टाळा. आतिषबाजी नेहमी मोकळ्या जागेत आणि आवश्यक सुरक्षेच्या उपाययोजना करूनच करा. फटाके उडवल्यानंतर होणारा कचरा वीज यंत्रणेजवळ फेकू नका; त्याची योग्य विल्हेवाट लावा.

ग्राहकांना या प्रकाशपर्वात दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा मिळावा यासाठी वीज वाहिन्या व उपकरणांची देखभाल व दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. या काळात सार्वजनिक ठिकाणी वीज अपघात होऊ नये यासाठी बाजारपेठ परिसरातील कर्मचाऱ्यांनी दक्ष राहून उपाययोजना कराव्यात. तसेच, अखंडित वीजपुरवठ्यासाठी सर्व विभागीय, उपविभागीय आणि शाखा अधिकाऱ्यांनी दिवाळी पूर्ण होईपर्यंत स्वतः उपस्थित राहावे आणि या काळात सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी थांबावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

या सर्व महत्त्वाच्या नियमांचे पालन करून, आपण आपल्या घरात सुरक्षित आणि आनंदी दिवाळी साजरी करू शकता. विद्युत सुरक्षेला महत्त्व देऊन, रोषणाईचा खरा आनंद लुटण्याचे आवाहन दिलीप दोडके यांनी केले




# रामटेक गडमंदिरात काकडा आरतीला प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी
**रामटेक, दि. १३ :**
भगवान श्रीरामचंद्राचे प्रसिद्ध गडमंदिर येथे दि.७ ऑक्टोबर रोजी पहाटे ५ वाजता पारंपरिक पद्धतीने काकडा आरतीला सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती होती. संपूर्ण कार्तिक महिन्यात दररोज पहाटे ५ वाजता आरती होणार असून त्रिपुरी पौर्णिमेच्या दिवशी समारोप केला जाईल.



भोसले देवस्थान गढमंदिरचे रिसिव्हर तथा उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापक चंद्रशेखर बावनकर हे आरतीच्या आयोजनाची व्यवस्था पाहत आहेत. मंदिरात पहाटे साडेचार वाजता भजनानंतर नेमके पाच वाजता आरती केली जाते. श्रीराम मंदिरचे मुख्य पुजारी मोहन पांडे व मंगेश पांडे यांच्या हस्ते व लक्ष्मण मंदिरचे पुजारी धनंजय पांडे, संजय पांडे, अविनाश पांडे आणि सुनील पांडे यांच्या सहभाग राहतो. काकडा आरतीत लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण उत्साहाने सहभागी होत आहेत. दररोज पहाटे विठ्ठल मंदिरातून काकड आरती भक्त परिवारची पहाटे चार वाजता दिंडी निघते व भाविकांसाठी प्रसादाची व्यवस्था केली जाते. ऐतिहासिक दृष्टीने हे मंदिर विशेष मानले जाते.
चौथ्या शतकात वाकाटक राणी प्रभावती यांनी रामपादुका पूजल्या, तर १३ व्या शतकात यादव राजांनी मंदिर बांधले.
इ.स. १७५३ मध्ये प्रथम रघुजी भोसले यांनी राम-सीतेच्या मूर्तींची स्थापना करून मंदिराची स्थायी व्यवस्था केली. मनसरचे ७२ वर्षीय धनराज काठोके सांगतात की, ते दरवर्षी कार्तिक महिनाभर पहाटे तीन वाजता उठून आरतीसाठी येतात.

# महाप्रज्ञा बुद्ध विहार येथे वर्षावास समापन कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. १४ :**
वाडी जवळील न्यू शांती नगर दाभा येथील महाप्रज्ञा बुद्ध विहारात रविवार ला वर्षावास समापन कार्यक्रमानिमित्त विविध धम्ममय व सांस्कृतिक कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले. आषाढ ते अश्विन पोर्णिमे दरम्यान या विहारात भदंत संघकीर्ती महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या संख्येने उपासक-उपासिक यांनी बुध्द वंदना, धम्मदेसना,ध्यान साधना करून वर्षावास पूर्ण केला.या वर्षावास समापन प्रसंगी विविध धम्ममय सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .सकाळी भदंत धम्मशील महाथेरो (सारनाथ) यांचे हस्ते ध्वजारोहण करून महापरित्राण पाठ संपन्न झाले.

**महापरित्राण पाठ, समाजप्रबोधन, भोजनदान, भीमगीत**



तद्नंतर भिक्खू संघाला भोजनदान तर दुपारी हजारो उपासक उपासिकांना भोजन दान करण्यात आले. यावेळी भिक्खू संघास चिवरदान, संघदान नंतर भिक्खु संघाने उपस्थितांना धम्मदेसना व बुद्ध धमाचे महत्व, वर्षावास चे महत्व, समाजाची जबाबदारी इं. वर धम्मदेसना दिली. दुपारी विशेष अतिथी माजी मंत्री रमेशचंद्र बंग, गर्जना सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष महेश ठाकूर, माजी जि.प.सदस्य दिनेश बन्सोड, युवा सेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य हर्षल काकडे , भाजपाचे माजी उपनगराध्यक्ष नरेश चरडे, श्याम मंडपे, आनंदबाबू कदम, माजी सभापती सरिता यादव, राकेश मिश्रा, माजी नगरसेवक दिनेश कोचे, परमानंद राऊत, योगेश चरडे, राजेश जंगले, आशिष नंदागवळी यांचे मार्गदर्शन व विशेष पुरस्कार वितरित करण्यात आले.दुपारी अमरावती येथील सुप्रसिद्ध गायक संविधान मनोहरे व संचाने बहारदार बुद्ध व भीम गीते प्रस्तुत करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.या वर्षावास समारोह दरम्यान रक्तदान,आरोग्य तपासणी, होमियोपॅथी इ.शिबीर सम्पन्न झाले. शिबिराचा उपस्थित हजारो अनुयायांनी लाभ घेतला. समता सैनिक दलाने दिवसभर सम्पूर्ण सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमाला विदर्भ सह नागपूर शहरातील विविध भागांसह वाडी, डिफफेन्स, लाव्हा, दाभा, दौलामेटी, ८ मैल, वडधामना येथील विविध परिसरातील उपासक-उपासिकांची विहारात मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# हर्षीता ढवळे राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेसाठी पात्र



■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. १४ :**
नागपूर विभागीय शालेय कॅरम स्पर्धा नुकतीच गडचिरोली येथे पार पडली. या स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलींच्या गटात जवाहरलाल नेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, वाडी येथील विद्यार्थिनी हर्षीता शरद ढवळे हिने उत्कृष्ट कामगिरी करत कोल्हापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे.
हर्षीताच्या या यशाबद्दल व्ही.एस.पी.एम. ॲकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन संस्थेचे कार्यवाह युवराजजी चालखोर, विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सचिन डेहनकर, उच्च प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक विनोद देऊळकर, क्रीडा शिक्षक पंकज मानेकर, तसेच प्रणय भुयार, निर्मला टेकाडे, पंकज पाटिल, दिनेश निगुट, ज्योती मानकर, अमित गायधने, वर्षा घारपूरे, उषा पांगुळ, शुभांगी काळे, प्रीती रामटेके, वृषाली कोकाटे, शुभम शहारे, जयश्री चौधरी, पूजा ठाकरे, ज्योत्स्ना गमे, अश्विन बाभूळकर, विनोद भोंगाडे आणि केसरी राऊत यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. हर्षीताने केलेल्या या उल्लेखनीय यशामुळे विद्यालयाचे नाव उज्वल झाले असून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तीला शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# विठ्ठल नामाच्या गजरात निघते काकडा दिंडी

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. १४ :**
सोनेगाव ( निपाणी ) येथील श्री हनुमान मंदिरात कार्तिक



महिन्याच्या दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा विठ्ठल नामाच्या गजरात दररोज पहाटे काकडा दिंडी निघत आहे. घरासमोरुन काकडा दिंडी येत असल्यामुळे गावातील महीला पहाटे सडा सारवण करून रांगोळी काढून दिंडीतील वारकरीचे पाय धून स्वागत करतात. दिंडीचे आयोजक श्री हनुमान मंदिर पंचकमेटी सोनेगाव निपाणी असुन शेवटी टिपूर पौर्णिमेला टिपूर जाळून लगेच दुसऱ्यादिवशी गोपाळ काल्याचे कार्यक्रम करून वारकऱ्यांचे माणसन्मान केले जाते गावकरी कार्तिक महिना शांततेत पार पडतात हरिनाम पिढीन पिढी चालवतात त्यांचे आभार व्यक्त करताना पोलिस पाटील विजू कामडे म्हणाले श्री संत तुकाराम महाराज म्हणतातयसुखालागी आला या हो आनंदाच्या पूरय त्याच प्रमाणे हरी नामाने गावात सुख समृद्धी आनंदाच्या पूर येतो सर्व गावकरी व आयोजकाचे पोलिस पाटिल यांनी आभार मानले.

# पेंच व्याघ्र प्रकल्पात जंगल सफारीला सुरुवात

## पर्यटकात आनंदाचे वातावरण, जर्मनीच्या महिला पर्यटकानी वेधले लक्ष



■ महासागर प्रतिनिधी
**रामटेक, दि. १३ :**
वनविभागाने १ जुलैपासून पर्यटकांसाठी जंगल सफारीवर बंदी घातल्याने पर्यटनप्रेमींमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. पावसाळ्यात जंगलातील रस्त्यांची दुरवस्था होत असल्याने पर्यटकांची वाहने अडकण्याचा धोका असतो तर हा कालावधी वन्यप्राण्यांच्या प्रजननाचा असल्याने त्यांच्या अधिवासात मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता. मात्र दि.१२ ऑक्टोंबर ला पेंच व्याघ्र प्रकल्पातील चोरबाहुली गेट पर्यटकांसाठी खुला करण्यात आला. यामुळे पर्यटनप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाले आहे. चोरबाहुली वनपरीक्षेत्राने रोज होणाऱ्या वाघाच्या दर्शनाने व भीमा आणि सुब्रमण्यम नावाच्या हत्तीने पर्यटकांच्या मनात विशेष जागा मिळवली आहे. त्यामुळेच याठिकाणी पर्यटकांची गर्दी पहावयास मिळते. विशेष म्हणजे आज सुरुवातीच्याच दिवशीच जर्मनीवरून आलेल्या विदेशी महिला पर्यटकाने सर्वांचे लक्ष वेधले.तर लहान मुलीच्या हाताने फीत कापून विधिवत जंगल सफारीला सुरुवात करण्यात आली. तसेच नव्याने भरती झालेल्या १४ गाईड यांना गणवेशासह गाईड किट वितरित करण्यात आली. मानसिंगदेव अभयारण्यात असलेल्या चोरबाहुली पर्यटन केंद्राला मोठ्या संख्येने भेट देण्याचे आव्हान यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी जयेश तायडे यांनी केले. यावेळी चोरबाहुलीचे वनपरिक्षेत्र अधिकारी जयेश तायडे, क्षेत्रसहाय्यक सचिन ताकसांडे, क्षेत्रसहाय्यक गणेश खंडाईत, बोरडा येथील सरपंच तुळशीदास राऊत, उपसरपंच पंकज चौधरी, वनरक्षक, गाईड, जीप्सी चालक व पर्यटक उपस्थित होते.



# भाजपा तर्फे सक्करदरा पो.स्टेशन पोलीस निरीक्षकांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. १३ :** भारतीय जनता पार्टी बहादुरा च्या वतीने सक्करदरा पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक यांना निवेदन बालू घोडमारे यांच्या नेतृत्वात देण्यात आले.बहादुरा परिसरात रोज वाढणारी गुन्हेगारी, जुगार, चोरी, मुलीची छेड व इतर विषय बाबतीत निवेदन देण्यात आले. बहादुरा नगरपंचायत झाल्यापासून बहादूऱ्या चे शहरीकरण फार झपाट्याने वाढत असून नागरिक मोठ्या प्रमाणात राहायला येत आहेत. परंतु नागरिक कामावरून येतानी त्यांना वाढत्या गुन्हेगारी लोकांच्या त्रासाला समोरे जावे लागतो. बहादुरा नगराबाहेरील काही नागरिक अव्यध्य कामे करतात,त्यामुळे वस्तीतील नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. या सर्व बाबी पोलीस निरीक्षक यांना अवगत करून देण्यात आले. त्यांनी यावर काही उपाययोजना करण्यास सांगितले व बहादुरा फाट्यावर पोलीस चौकी तयार करून देण्याचे आश्वासन दिले. निवेदन देतेवेळी तालुका अध्यक्ष बालू घोडमारे, माजी जि. प. सदस्य सुभाष गुजरकर, भाजपा अध्यक्ष बहादुरा नरेंद्र नांदुरकर, वैद्यकीय आघाडी अध्यक्ष डॉ. अवध द्विवेदी, डॉ. देवेंद्र बेलखेडे, राहुल गायधने, समीर गायकवाड,राम कावडकर दिवाकर सेलोकर अश्वजीत नाईक,, बाबा बोकडे, सिद्धार्थ नगराळे, तुलाराम लांजेवार, प्रवीण श्रीरामे, व भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

## दिवाळी व छठ सणाच्या काळात नागपूर स्टेशनवर प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर तात्पुरती मर्यादा

**नागपूर, दि. १३ :** दिवाळी व छठ सणाच्या काळात नागपूर रेल्वे स्टेशनवर जास्त गर्दीचे नियंत्रण आणि प्रवाशांच्या सुरळीत हालचालीसाठी मध्य रेल्वे, नागपूर मंडळ ने प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर तात्पुरती मर्यादा घालण्याचा निर्णय घेतला आहे. ही मर्यादा १७ ऑक्टोबर २०२५ ते २७ ऑक्टोबर २०२५ पर्यंत लागू राहणार आहे. या काळात फक्त खरे प्रवासी (लेपर षळवश रींशिप-सशीं) स्टेशन परिसरात प्रवेश करू शकतील, ज्यामुळे अत्याधिक गर्दी टाळता येईल आणि सर्वांसाठी सुरक्षा व सुविधा सुनिश्चित करता येईल. तथापि, वृद्ध / वरिष्ठ नागरिक, आजारी, निरक्षर किंवा स्वत:ची काळजी घेऊ शकत नसलेल्या महिला प्रवाशांसोबत येणाऱ्या व्यक्तींना प्लॅटफॉर्म तिकीटाची सुविधा दिली जाईल. या मर्यादेबाबतची माहिती हिंदी व मराठी या द्विभाषिक नोटीस बोर्डद्वारे स्टेशनच्या प्रमुख ठिकाणी प्रदर्शित केली जाईल.

# कांशीराम यांनी वैयक्तिक स्वार्था ऐवजी समाजासाठी काम केले

## कांशीराम सारख्या महापुरुषांची नितांत गरज : कैप्टन सतीश बेलसरे

■ महासागर प्रतिनिधी
**कन्हान, दि. १३ :**
कन्हान युथ फाउंडेशन चे कैप्टन सतीश बेलसरे यांनी कांशीराम यांच्या पुण्यतिथि सोहळ्यात त्यांचा जीवन चरित्र्यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले . कांशीराम यांनी वैयक्तिक स्वार्था ऐवजी समाजासाठी काम केले , कांशीराम सारख्या महापुरुषांची नितांत गरज देशाला असल्याचे कैप्टन सतीश बेलसरे यांनी संबोधनातुन सांगितले. गुरुवार (दि.९) ऑक्टोंबर रोजी कन्हान युथ फाउंडेशन द्वारे आंबेडकर चौक कन्हान येथे कांशीराम यांच्या पुण्यतिथि निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले .
कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित कैप्टन सतीश बेलसरे यांनी कांशीराम यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले .



यावेळी कैप्टन सतीश बेलसरे यांनी कांशीराम यांच्या जीवन चरित्र्यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले , त्यांनी आपल्या संबोधनात कांशीराम हे शोषित समाजाच्या सुप्त राजकीय जाणीवेला जागृत करणारे पहिले व्यक्ती होते .
बाबासाहेबांनी संविधानाद्वारे शोषित समाजासाठी विकासाचे दरवाजे उघडले , परंतु आदरणीय कांशीराम यांनीच त्यांना विकासाच्या या दरवाज्याबाहेर नेले . बाबा साहेबांनी दलितांना मनोबल निर्माण करण्याचे आवाहन केले , तर कांशीरामांनी समाजाला मनोबल निर्माण करण्यास भाग पाडले . कांशीराम हे अशा महापुरुषांपैकी एक आहेत ज्यांनी वैयक्तिक स्वार्थाऐवजी समाजासाठी काम केले .
त्यांच्या आईला लिहिलेल्या पत्रात, आदरणीय कांशीराम यांनी शोषित समाजाला त्यांचे कुटुंब म्हणून वर्णन केले . आज समाजाला कांशीराम सारख्या महापुरुषांची नितांत गरज आहे . असे सांगितले .
कार्यक्रमात उपस्थित सर्व समाज बांधवांनी व नागरिकांनी कांशीराम यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पित करुन दोन मिनटाचा मौन पाळुन श्रद्धांजलि अर्पित केली . या प्रसंगी कन्हान युथ फाउंडेशन चे कैप्टन सतीश बेलसरे , देविदास तडस , गणेश भालेकर , रॉबीन निकोसे , केतन भिवगडे , अजय चव्हाण , कमलेश शर्मा , चिराल वैद्य , राजेश फुलझले , महेश डोंगडे , नेवालाल पात्रे अमित मोटघरे सह आदि नागरिक उपस्थित होते .

# महायुती व महाविकास आघाडीतच होणार नगराध्यक्षपदाचा रणसंग्राम

## कुणाला मिळणार तिकीट, नगराध्यक्ष होणार कोण?

■ महासागर प्रतिनिधी
**मौदा , दि. १२ :**
मौदा नगरपंचायत निवडणूक २०२५ निवडणुकीसाठी आता थेट जनतेतून नगराध्यक्ष निवडले जाणार असून मौदा नगर पंचायतचे नगराध्यक्षपद यंदा सर्वसाधारण प्रवर्गासाठी निश्चित झाले आहे. ६ ऑक्टोबर रोजी झालेल्या आरक्षण सोडतीत हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे मौदा शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. ही निवडणूक महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपचे माजी आमदार टेकचंद सावरकर, काँग्रेस नेते सुनील केदार व सुरेश भोयर यांच्यासाठी ही प्रतिष्ठेची ठरणार असल्याचे दिसून येत आहे. या निवडणुकीला आता काही कालावधी बाकी असला तरीही महायुती आणि महाविकास आघाडी व इतर पक्षांतील कार्यकर्त्यांनी चांगली कंबर कसली आहे. मात्र, या निवडणुकीत उमेदवारांची खरी कसोटी लागणार आहे. हा गड कोण सर करणार याकडे आता सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. मौदा नगर पंचायत नगराध्यक्षपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुलं झाल्याने अनेकांना चांगलीच संधी उपलब्ध झाली आहे. त्यामुळे विविध सामाजिक, राजकीय आणि व्यावसायिक क्षेत्रातील व्यक्तींनी या पदासाठी रस दाखविला आहे. माजी नगरसेवक तसेच नवे चेहरेही इच्छुकांच्या यादीत समाविष्ट झाले आहेत. दरम्यान, मौदा येथे नगरपंचायतीच्या कार्यकाळात झालेल्या विकासकामांचा आणि नागरिकांच्या अपेक्षांचा मुद्दा या निवडणुकीत महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे. जनतेकडून पारदर्शक प्रशासन आणि मूलभूत सुविधा याबाबतीत अपेक्षा वाढल्या आहेत. राजकीय चर्चामधून पुढील काही दिवसांत संभाव्य उमेदवारांची नावे अधिक स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तर भाजपा कडून राजू सोमनाथे, मोरेश्वर सोरते, यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू असून काँग्रेस कडून



राजेश निनावे. शुभम तिघरे, किशोर सांडेल, यांचे नावे आघाडीवर असले तरी खरी लढत पहायची झाल्यास माजी नगराध्यक्ष उमेश गभने हे कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढतात याकडे सुद्धा शहर वासियांचे लक्ष लागले आहे. उमेश गभणे यांनी जर शिवसेना शिंदे गट यांच्या पक्षाकडून निवडणूक लढवली तर यात भाजपा आणि काँग्रेसला मोठी अडचण निर्माण होणार आहे व दोन्ही पक्षांची मोठी डोकेदुखी वाढणार असल्याची चर्चा सध्या मौदा शहरात सुरू आहे. या निवडणुकीत मौदा नगर पंचायत साठी महायुती व महाविकास आघाडी मधील खरी लढाई पहायला मिळणार आहे, तर शहरात इतर पक्षातील इच्छुकांनी आतापासून निवडणुकीच्या मोर्चे बांधणीला सुरुवात केली आहे. यात सध्या माजी नगराध्यक्ष भारती सोमनाथे यांचे पती राजू सोमनाथे यांचे नाव चर्चेत आहे. यात सोमनाथे यांचा मोठा राजकीय वारसा नसला तरी ही निवडणूक महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासाठी महत्वपूर्ण ठरणार असल्याचे बोलल्या जात आहे. तर काँग्रेस कडून राजेश निनावे, शुभम तिघरे, किशोर सांडेल यांचे नाव जरी चर्चेत असले तरी समोर दोन्ही पक्षाकडून तिकीट साठी रांगा लागणार असल्याचेही दिसून येत आहे, यासाठी भाजपा कडून अनेक कार्यकर्त्यांची नावे सुद्धा नगराध्यक्ष पदासाठी समोर येण्याचे चित्र दिसून येणार आहेत, तर माजी नगराध्यक्षा भारती सोमनाथे यांनी मागील पाच वर्षात नगराध्यक्षा असताना मौदा शहरात स्वच्छ शहर, सुंदर शहर, व प्रभागामध्ये स्वच्छ प्रभाग, सुंदर प्रभाग ही संकल्पना राबविली. केलेली विकास कामे यामुळे त्या जनमानसात लोकप्रिय आहेत. त्यामुळे त्यांचे पती राजू सोमनाथे यांना तिकीट मिळाल्यास ते समोरच्या व्यक्तीला तगडे आव्हान देणार का ? अशाही चर्चा सुरू आहेत, या नगर पंचायतची शेवटची सार्वत्रिक निवडणूक २०१८ मध्ये पार पडली होती. शहरातील तेव्हाच्या आणि सध्याच्या राजकीय परिस्थितीत फार मोठा बदल झाला आहे. राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन महत्त्वाचे पक्ष फुटल्याने पक्षांच्या स्थानिक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्येही विभागणी झाली आहे. त्यातील काहींनी भाजपमध्ये प्रवेश केला, तर काहींनी काँग्रेसचा हात धरला. नगराध्यक्षपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव करण्यात आल्याने इच्छुकांची संख्या आणि दावेदारीत वाढ झाली आहे.

**भाजपला अपक्षांचा आधार** २०१८ च्या निवडणुकीत भाजपने एकूण १७ पैकी आठ जागा जिंकल्या होत्या, तर काँग्रेसने पाच, शिवसेनेने दोन जागांवर विजय संपादन केला होता. दोन जागांवर अपक्षांनी बाजी मारली होती. त्यावेळी भाजपने यात दोन अपक्ष नगरसेवकांची मदत घेतली होती. परिणामी, नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत काँग्रेसच्या रोशनी राजेश निनावे यांना १२८ मतांनी पराभव पत्करावा लागला होता. भाजपच्या भारती राजू सोमनाथे यांनी त्यांना पराभूत केले होते. मौदा शहर रक्ताला जागृत ठेवून मतदान करणार. सध्या इच्छुक असलेल्यांपैकी अनेकजण निवडणूक लढवू शकतील. पण खरी लढाई महाविकास आघाडी व महायुती यांच्यात होईल. या निवडणुकीत भाजपा एमआयएमला कितपत खेळिवल, यावर महाविकास आघाडीचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. गेल्या निवडणुकीतील अनुभव पाहता यावेळी मौदा शहर मात्र आपल्या चळवळी रक्ताला या निवडणुकीत जागृत ठेवूनच मतदान करतील, अशी चर्चा आता होत आहे. सर्वसाधारण प्रवर्गासाठी हे आरक्षण पडल्याने अनेक आजी-माजीनेते, कार्यकर्ते. आपल्या आज कुटुंबातील पुरुषाला व तरुणाला निवडणुकीच्या रिंगणात उतरविण्यासाठी तयारीला लागल्याचे दिसून येत आहे.

**भाजपमध्ये सुरू रस्सीखेच...**
सध्याच्या राजकीय समीकरणात भाजपमध्ये उमेदवारांची मोठी रांग लागली आहे. काही नगरसेवक देखील आपापला दावा मांडत असल्याने भाजपचा उमेदवार कोण असेल यावर मंथन सुरू आहे. निवडणुकी पूर्वी पक्षाकडून सर्वे करण्यात येणार असून सर्वेत ज्याचा नाव समोर त्यालाच तिकीट मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

**राजकीय वातावरणही तापले...**
विधानसभा निवडणुकीनंतर आता नगराध्यक्षपदासाठी हालचालींना वेळ आला आहे. जनतेतून नगराध्यक्ष होणार असल्यामुळे पदाधिकारी व कार्यकर्तेही 'साहेबांच्या' मार्गदर्शनाखाली काम करू लागले आहेत. एकंदर नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या निमित्ताने राजकीय वातावरण तापले असून यामध्ये कोण बाजी मारणार ? याकडे मौदावासीयांचे लक्ष लागले आहे.

**स्थानिक समस्याच ठरविणार...**
१) सर्व उमेदवारांचे भविष्य मिळिवण्यासाठी मौदा शहरात जोरदार लॉबिंग सुरू असून अनेकांना यात पक्षश्रेष्ठींकडून तिकीट होणार असल्याचे चित्र दिसत आहे. कोणत्या पक्षाचा उमेदवार जनता निवडते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. २) शहरात गेल्या काही वर्षात अनेक विकासकामे झाली असली तरीही काही प्रलंबित प्रश्नांमुळे मतदारांमध्ये नाराजीचे वातावरणही आहे. काही ठिकाणी रस्त्यांची दुरवस्था, अतिक्रमण, बाजारपेठेतील वाहतूककोंडी या स्थानिक समस्या आगामी निवडणुकीत निर्णायक ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# डब्लू सी एल येथे सुवर्ण महोत्सवी व्याख्यानमालेत सुश्री जया किशोरी यांचे व्याख्यान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :

कोल इंडिया लिमिटेड आणि डब्लू सी एल च्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने, डब्लू सी एल च्या प्रसिद्ध प्रेरक वक्त्या सुश्री जया किशोरी यांचे व्याख्यान सत्र कविवर्य सुरेश भट, रेशीमबाग, नागपूर येथे आयोजित करण्यात आले होते. कोल इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक पी.एम. प्रसाद आणि डब्लू सी एल चे सीएमडी जे.पी. द्विवेदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या विशेष अतिथी झंकार महिला मंडळाच्या अध्यक्षा आभा द्विवेदी ,प्रमुख पाहुणे पी.एम. प्रसाद, अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक, कोल इंडिया लिमिटेड यांनी आपल्या भाषणात सांगितले की कोळसा उद्योग हा राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे आणि कोल इंडिया ५० वर्षांसाठी देशाची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करेल. ते म्हणाले की कोल इंडिया लिमिटेड हरित, सुरक्षित आणि तंत्रज्ञान-चालित खाणकाम करण्यास सक्षम आहे. आपल्या भाषणात त्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर, कोळसा क्षेत्रातील बदल आणि समस्यांवर भर दिला. पुढे, कोल इंडिया लिमिटेड आणि डब्ल्यूसीएलला त्यांच्या सुवर्ण महोत्सवाबद्दल अभिनंदन.

तुमचे भाषण वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडचे ??सीएमडी जे.पी. द्विवेदी म्हणाले की, कोल इंडियाचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष केवळ कामगिरीचा उत्सव नाही, तर उलट, नवीन उर्जेने भविष्याची दिशा ठरवण्याची ही एक संधी आहे.

ते म्हणाले की व्हर्न कोलफिल्ड्स लिमिटेड देशाची कोळशाची गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांच्या भाषणात त्यांनी शाश्वत विकास, पर्यावरण संतुलन आणि सर्वांगीण प्रयत्नांवर भर दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी, प्रसिद्ध प्रेरक आणि आध्यात्मिक वक्त्या सुश्री जया किशोर यांनी सकारात्मकता, संतुलन आणि जीवनात आत्मविश्वास यावर आपले विचार मांडले. त्यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले की, येशूचा मूळ मंत्र श्रद्धा आणि भक्ती आहे. ते म्हणाले की, जेव्हा आपले काम प्रामाणिकपणा आणि सकारात्मक विचारांनी केले जाते, तेव्हाच सामाजिक संघटना पूर्ण प्रगतीकडे नेईल.

त्यांच्या संकल्पनेच्या शक्तीबद्दल सविस्तर चर्चा केली. ते म्हणाले की, प्रत्येकाच्या आयुष्यात कठीण परिस्थिती येतात. जणू काही केवळ दृढनिश्चयाच्या बळामुळेच आपल्याला पुढे जाण्याचे धाडस मिळते.

सकारात्मकतेने जीवनशैली घडवण्याबद्दल बोलतात, परंतु केवळ अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतच, संयम आणि संयमावर भर दिला जातो. त्यांनी कोल इंडिया लिमिटेड आणि डब्ल्यूसीएलने देशाची कोळसा माहिती पूर्ण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले आहे आणि त्यांना सुवर्ण महोत्सवी वर्षासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

या संधेबर संचालक (वित्त) श्रीक्रम यांनी घोषित केले, संचालक (मानव संसाधन) डॉ. हेमंत शरद पांडे, मुख्य अधिकारी अजय मधुकर म्हेत्रे, झंकार महिला मंडळाच्या अध्यक्षा आभा द्विवेदी आणि उपाध्याय रीना पांडे आणि डॉ.सोनाली म्हेत्रे, लोकशाही मंडळाचे प्रतिनिधी, कोल इंडिया लिमिटेड आणि वेस्ट कोलफिल्ड्स लिमिटेडचे ??अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित आहेत.

कार्यक्रमाचे संवाद आणि आभार मुख्य व्यवस्थापक (मानव संसाधन) अनुपमा टेमुरणीकर प्रशासक आणि जनसंपर्क मिलिंद चहांदे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## दहा फुटाचा आढळला अजगर

**भिवापूर :** जवळी येथे शेतात सोयाबिनची कटाई करीत असतांना दहा फुटाचा अजगर आढळून आला. त्यामुळे शेतमजुरात भितीचे वातावरण तयार झाले. यावेळी सर्पमित्राला पाचारण करण्यात आले होते. शेतामध्ये मजूर काम करत असताना सुरेंद्र पांडे नामक शेतकऱ्याच्या शेतात अचानक एक हा दहा फुट लांबीचा अजगर आढळून आला.

यावेळी सर्पमित्राला पाचारण करण्यात आले. यावेळी योगेश मडावी, सागर हरडे, कुणाल मडावी राकेश परमरे, लोकेश मडावी, रितिक चंदन बावणे हे उपस्थित होते.

पकडण्यात आलेल्या अजगराला उमरेड कऱ्हाडला अभयारण्य येथील अधिकाऱ्याच्या हवाली करण्यात येत आहे.

# कोल इंडिया लि. चे अध्यक्ष पी. एम. प्रसाद यांची डब्ल्यूसीएलला भेट

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १३ :

अध्यक्ष पी. एम. प्रसाद यांनी १२ ऑक्टोबर २०२५ रोजी डब्ल्यूसीएल मुख्यालयात उत्पादन, उत्पादकता, पर्यावरण संरक्षण, सीएसआर आणि भविष्यातील योजनांशी संबंधित विषयांवर आढावा बैठक घेतली.



आढावा बैठकीत त्यांनी टीम डब्ल्यूसीएलच्या कार्यसंस्कृती आणि कामगिरीचे कौतुक केले आणि चालू आर्थिक वर्षात चांगल्या निकालांची अपेक्षा व्यक्त केली.

त्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर, खाणकामांमध्ये सुरक्षितता आणि योग्य नियोजन यावर भर दिला. त्यांनी कोळसा वाहतुकीच्या परिस्थितीबद्दल सविस्तर माहिती घेतली आणि या दिशेने सुधारणा करण्यासाठी सूचना दिल्या.

आढावा बैठकीत, डब्ल्यूसीएलचे सीएमडी जे. पी. द्विवेदी यांनी २०२५-२६च्या वर्षातील कामगिरी आणि योजनांविषयी सविस्तर माहिती दिली.

त्यांनी विश्वास व्यक्त केला की डब्ल्यूसीएल या आर्थिक वर्षाचे त्यांचे कोळसा उत्पादन लक्ष्य साध्य करेल.

संचालक (वित्त) बिक्रम घोष, संचालक (मानव संसाधन) डॉ. हेमंत शरद पांडे आणि मुख्य दक्षता अधिकारी अजय मधुकर म्हेत्रे, मुख्यालयाचे प्रादेशिक महाव्यवस्थापक आणि विभाग प्रमुख बैठकीला प्रमुख म्हणून उपस्थित होते.

# विद्यापीठ हॉलीबॉल स्पर्धेत डॉ.आदमनेचा दबदबा



**सावनेर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हॉलीबॉल स्पर्धेत सीझोन मध्ये सावनेर येथिल डॉ.हरिभाऊ आदमने महाविद्यालयाने नरखेड येथिल पंढरीनाथ महाविद्यालयाला पराभूत करून कबड्डीप्रमाणेच हॉलीबॉलमधेही आपला दबदबा कायम ठेवला आहे. या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख अतिथी सावनेर येथिल पोलिस उपनिरीक्षक उमेश पाटील उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वीरेंद्र जुमडे यांच्या मार्गदर्शनात सदरहू स्पर्धेचे आयोजन केले गेले. यावेळी क्रीडांगणावर प्रमुख पाहुणे डॉ.योगेश पाटील, परीक्षक डॉ.राऊत, प्रा.अतुल भोयर, प्रा.प्रशात पाटील डॉ.प्रगटसिंघ बावरा, प्रा.मोहुर्ले, महाविद्यालयाचे क्रीडा प्रमुख डॉ.दिनेश किमटा या सर्वांनी खेळाडूंचे मनोबल वाढविण्याचे कार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अर्चना पाटील यांनी केले.

# लाव्हा येथे निशुल्क रोग निदान शिबीर



■ महासागर प्रतिनिधी वाडी, दि. १३ :

लाव्हा ग्रामपंचायतच्या वतीने भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड आणि मिशन इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने निशुल्क रोग निदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा लाभ तब्बल १५० नागरिकांनी घेतला.

या प्रसंगी बीपीसीएलचे सेल्स ऑफिसर निशांत भागीया, सरपंच ज्योत्सना नितनवरे, उपसरपंच रॉबिन शेलारे, तसेच प्रकाश कोकाटे, शेषराव गोरले, आकाश चोखांद्रे, देवनाथ गोरले, यादव इंगळे, सारिका सलामे, प्रतिभा मेश्राम आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिरात मिशन इंडियाचे संचालक डॉ. रेझी लुकोज, डॉ. केला, प्रोग्राम कोऑर्डिनेटर वृषाली शेष, ईशा बावणकर, सुनैना सहारे, प्रशांत साखरे, तसेच सुजित नितनवरे, योगेश लोखंडे, नाना मेंढे, काशिनाथ बंजारी आणि ग्रामपंचायत कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे संचालन अजय तायवाडे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# तिडके महाविद्यालय वन्यजीव सप्ताह साजरा

■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. १३ : श्री नरेंद्र तिडके कला वाणिज्य महाविद्यालय रामटेक येथे निसर्ग मंडळ द्वारा वन्यजीव सप्ताह निमित्त विविध उपक्रम राबवण्यात आले.



विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याचे हेतूने विद्यार्थ्यांना वन्यजीव समाहाचे महत्त्व इतिहास आणि आजच्या काळाची गरज हे समजावून सांगण्यात आले. वन्यजीव मानव संघर्ष, निसर्ग आणि वन्यजीव संवर्धन या विषयावरती विद्यार्थी आणि महाविद्यालयातील शिक्षक आणि कर्मचारी यांच्याकरिता चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये या स्पर्धेमध्ये बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्कृष्ट चित्र रेखाटले.

प्रथम क्रमांक तनू बागडे आणि श्रुती टेकाम यांना विभागून देण्यात आला, द्वितीय क्रमांक सुमित निशाने तसेच तृतीय क्रमांक समीक्षा चाम्पुरकर यांना देण्यात आला. शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मधून प्रथम क्रमांक प्रा. अश्विनी डोंगरे द्वितीय क्रमांक अर्चना पारवे आणि तृतीय क्रमांक उर्मिला सोनवणे यांना देण्यात आला. यावप्रसंगी महाविद्यालयात मोह, जांभूळ, बेडा, वड आणि पिंपळ आधी विविध प्रजातींचे झाडे लावण्यात आली. या झाडाचे संगोपन आणि संवर्धन ची जबाबदारी प्रेमसागर धुर्वे, विलास घोडाम, एकलव्य राऊत, आयुष डोंगाडे आणि ईश्वर तांदुळकर यांनी घेतली.

कार्यक्रम यशस्वीतेकरिता निसर्ग मंडळाचे समन्वयक प्रा. स्वप्निल मघे, सदस्य प्रा. दिलीप जेना, प्रा. ठाकरे, प्रा. भोवते, प्रा. लाड, प्रा. विवेक साहू तसेच निखिल तिवारी, सुमित निशाने, कोमल नागपुरे, दीक्षा फुटाणे, प्रणाली भिलकर, श्रुती टेकाम नंदिनी पचारे, आचल बलगेवार, मनीष बिसेन, साहिल वैद्य, सानिया नेवारे इत्यादी विद्यार्थ्यांनी केले.

# समस्या कमकुवत मनाची निर्मिती : बी.के सूरजभाई यांचे प्रतिपादन

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १३ :

प्रजापिता नागपूर ब्रह्मकुमारीजने नुकतेच वसंतनगर येथील सेवा केंद्र, विदर्भ-स्तरीय मुख्यालय येथे 'समाधान' या शीर्षकाच्या परिसंवादाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात राजस्थानमधील माउंट आबू येथील राजयोगी ब्रह्मकुमार सूरजभाई, लोकप्रिय टीव्ही अँकर ब्रह्मकुमार रूपेशभाई उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या शांती आणि जागृती टीव्ही चॅनेलद्वारे समस्या सोडवून, तणावमुक्त जीवन प्रदान करून आणि दिव्य अनुभव देऊन भारत आणि परदेशातील लाखो लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. याप्रसंगी माउंट अबू येथील राजयोग शिक्षिका ब्रह्मकुमारी गीता दीदी, नागपूर सेवा केंद्राच्या संचालिका राजयोगिनी रजनी दीदी आणि सह संचालक बीके मनीषा दीदी उपस्थित होते. बीके गीता दीदी म्हणाल्या, की जेव्हा कोणी खेळ खेळतो तेव्हा एक संघ जिंकतो आणि दुसरा हरतो हे निश्चित असते. पराभव संघाला अनुभवी बनवतो आणि विजयाच्या युक्त्या शिकवतो. त्याचप्रमाणे, मानवी जीवनात चढ-उतार, सुख-दुःख आनंद आणि दुःखाचा खेळ सुरूच राहतो. त्या म्हणाल्या की समस्या नसलेली एकमेव जागा म्हणजे स्मशानभूमी. मन कमकुवत असताना समस्या मोठ्या दिसतात. मानवांकडे त्यांना तोंड देण्यासाठी एक शक्तिशाली मन आणि बुद्धी असते. कार्यक्रमादरम्यान, सूरज भाईनी परिस्थितीशी सामना करण्याची कला, आत्मविश्वास विकसित करण्याच्या पद्धती आणि ध्यानाद्वारे उपाय यावर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की आज पर्यावरणीय प्रभावांमुळे बरेच लोक नकारात्मक बनतात. त्यांनी पुढे म्हटले की, ज्याप्रमाणे हरणाचे पिल्लू सिंह बनते, त्याचप्रमाणे आपणही सर्वशक्तिमान देवाची मुले आहोत. ही जाणीव मानवतेच्या सुप्त शक्तींना जागृत करेल. आजकाल प्रत्येक मानवी मन परावलंबी होत चालले आहे. दिवसभर आपले मन इतरांच्या विचारांनी प्रभावित होत आहे का, हे आपण तपासले पाहिजे यावर त्यांनी भर दिला. समस्या या कमकुवत मनाची निर्मिती आहेत. जरआपण आपल्या मनाला सक्षम करायला शिकलो तर आपल्या अर्ध्या समस्या नाहीशा होतील. कोणतेही काम करण्यापूर्वी एक मिनीट शांतता बाळगा, देवाची शक्ती शोधा आणि वास्तववादी निर्णय घ्या. एका मिनिटाच्या ध्यानामुळे १५ मिनिटांची ऊर्जा वाचेल. जर तुम्ही सकाळी उठताच तुमचे मन सकारात्मक संकल्पांनी भरले तर तुमच्या मनाच्या शक्ती भीती वाटते तेव्हा काय करावे? यावेळी बीके रूपेश भाईनी त्यांना प्रश्न विचारले, ज्यांची उत्तरे सूरज भाईनी दिली. सध्याच्या काळात, जाणूनबुजून किंवा नकळत, चिडचिडेपणासोबत भीती वाढत आहे. मनात अनेक प्रश्न निर्माण होत राहतात. याबद्दल काय करावे? त्यांनी उत्तर दिले की रात्री झोपण्यापूर्वी ज्याला झोपायचे आहे त्याने पाच मिनिटे सकारात्मक संकल्प करावेत, जसे की माझे गुडघे बरे होत आहेत. मी या जगात खूप भाग्यवान आहे. मी निर्भय आणि शक्तिशाली आहे. पुन्हा पुन्हा सकारात्मक संकल्प लिहा. सकारात्मक संकल्प करताना अन्न आणि पाणी प्या. कार्यक्रमात उपस्थित असलेल्या लोकांनी त्यांच्या जीवनातील समस्यांशी संबंधित प्रश्नदेखील विचारले, ज्यांची सूरजभाईनी अचूक उत्तरे दिली. सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी, त्यांनी दररोज ध्यान करण्याचा सल्ला दिला आणि शेवटी सहभागींना राजयोग ध्यानाचा सराव करण्यास मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन बी. के -प्रियंका यांनी केले.



# स्वच्छता पखवाडा २०२५ च्या १३ व्या दिवशी प्रवाशांना स्वच्छता स्पर्धेत भाग घेण्याची संधी

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २५ :

मध्य रेल्वे, नागपूर मंडळ यांच्या तत्वावधानाखाली सुरु असलेल्या स्वच्छता पखवाडा २०२५ च्या १३ व्या दिवशी प्रवाशांसाठी स्वच्छता जागरूकता स्पर्धा आयोजित करण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश प्रवाशांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व वाढवणे आणि सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्याचे महत्व समजावणे हा आहे.



स्पर्धेत प्रवाशांना रेल्वे परिसरातील स्वच्छता आणि निगा राखीशी संबंधित प्रश्न विचारले गेले. योग्य उत्तर देणाऱ्या प्रवाशांना सन्मानित केले गेले व त्यांना झाडांच्या रोपांची भेट देण्यात आली, ज्यामुळे पर्यावरण संरक्षणाबाबत त्यांची जागरूकता आणि उत्साह वाढावा. या कार्यक्रमात रेल्वे कर्मचारी आणि अधिकारी सक्रिय सहभाग घेतला आणि प्रवाशांना स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले. प्रवाशांनी उत्साहाने भाग घेतला आणि रेल्वेच्या स्वच्छता उपक्रमाचे कौतुक केले. मध्य रेल्वे, नागपूर मंडळानुसार, अशा उपक्रमांमुळे फक्त प्रवाशांमध्ये स्वच्छतेची जाणीव वाढत नाही, तर रेल्वे परिसऱ्याही अधिक स्वच्छ, हिरवीगार आणि पर्यावरणपूरक बनतात. पखवाड्याच्या अखेरपर्यंत असे अनेक कार्यक्रम आयोजित केले जातील, ज्यात रेल्वे कर्मचारी, प्रवासी आणि स्थानिक नागरिक सहभागी होतील.

## डॉ.कमलजीत कौर यांना आरोग्य आणि कला भूषण पुरस्कार २०२५ प्रदान



**नागपूर:** नागपूर येथिल विनोबा भावे सभा येथे आयोजित करण्यात आलेल्या एका भव्य कार्यक्रमात दोन प्रतिष्ठित सन्मान ञ्च आरोग्य भूषण पुरस्कार २०२५ आणि कला भूषण पुरस्कार २०२५ प्रदान करण्यात आले. हा कार्यक्रम जय साई नटराज नाट्य चित्रपट कला व सांस्कृतिक संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता, ही संस्था महाराष्ट्र सरकारशी संलग्न आहे. कार्यक्रमाचे आयोजक विजय मनवतकर यांनी डॉ. कमलजीत कौर यांची या सा. संस्थेच्या सल्लागार पदावर नियुक्ती केली.

# आंबेडकरी चळवळीसमोरील आव्हाने आणि उपाय : प्रभाकर सोमकुवर

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १३ :

बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ ही मुख्यतः समाजवादी समाज निर्मिण्याच्या स्वप्नाची प्रेरणा देणारी एक सामाजिक चळवळ होती. दलितांच्या राजकिय चळवळीनी विचारवंतांना लक्ष देणे भाग पाडले आहे. डॉ. बाबासाहेबांनी विविधांगी जीवनांत मिळाले त्याचे मिळेल तेवढे, मिळेल तेव्हा सहकार्य सर्वांचे घेतले. पण त्यांच्या आणि त्यापैकी प्रत्येकांच्या मर्यादांची तीव्र जाणीव त्यांना सतत होती-बोचतहोती आणि म्हणुनच डॉ. आंबेडकर कोणाचे झाले नाहीत, ते आपण-आपलेच एकटेच...म्हणजे शुद्र-अतिशुद्रांचे राहिले आणि त्याबद्दचा कडवा अभिमान त्यांनी दिमाखाने सतत जन्मभर मिरविला ! महात्मा फुल्यांकडुन त्यांनी स्फुर्ती घेतली, आच घेतली. पण परिस्थितीनुसार मार्ग मात्र त्यांचा त्यांनाच शोधुन काढावा लागला. अक्षरक्षः काट्याकुटयातून, खाच-खळग्यांतून, चढ-उतारातून, डोंगर-दऱ्यातून, नदी-नाल्यातून, वाऱ्या-वादळातून, पाण्या-पावसातून,रखरखत्या भयाण एकाकी वाळवंटातून ही वाट त्यांनी खोदून-खणून काढली आणि कोट्यावधी अनुयायांनाही त्यांनी त्या वाटेने अक्षरक्षः बांधून, धरून-ओढुन कधी कधी फरफटत सुध्दा नेले. डॉ. बाबासाहेबांना सतत चटके बसत राहिले आणि त्यांनीही सतत सगळयांना चटके दिले. बाबासाहेबांचे संपूर्ण जीवन हा एक चिरंतन संघर्ष होता. संघर्ष आणि समन्वय हे त्यांच्या चळवळीचे प्रमुख सुत्र होते. सामाजिक समतेचे लढे, आर्थिक मागण्यांचे लढे, वर्गलढे याचा साधा विचार करायलाही कोणाला फारशी फुरसत मिळेनाशी झाली. या सर्वांची लज्जास्पद परिणीती म्हणजे डॉ. बाबासाहेबांच्या रिपब्लिकन पक्षातील व बौध्दजनांतील कार्यकर्ते चार्तुवर्णवादी भाजपात किंवा हिंदु फॅसिस्ट शिवसेनेमध्ये सुध्दा खुशाल दिसु लागले आणि त्यांचे मतदार तर कोठेही कोणाच्याही दारात द्वारपाल म्हणुन चाकरी करताहेत. अशी दुरावस्था पक्षाची सत्ताधाऱ्या व उच्चवर्णीयांकडुन आणि त्यातुनही दुर्दैव म्हणजे संधीसाधु पुढाऱ्यांकडुनही होत आहे आणि हे अव्याहत सुरूच राहणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा आपले व्यक्तिगत हेतू साध्य करण्यासाठी जाणीवपूर्वक उपयोग करून घेतलेल्या त्याचे अनेक दुष्परिणाम दलिचळवळींना भोगावे लागलेत. तसेच त्यामुळे उद्याच्या समग्र परिवर्तन मागणाऱ्या चळवळीही विकलांग झाल्यातच जमा आहेत.

हे नाकारून चालणार नाही, त्याची बोच आज सर्वांना जाणवत आहे. बाबासाहेब केवळ एक तत्वज्ञ नव्हते तर त्यांना भारतात प्रत्यक्ष सामाजिक, राजकिय व सांस्कृतिक चळवळी कराव्या लागल्या आणि त्यासाठी त्यांचा बहुतेक वेळ या चळवळीचे एकमेव नेते या अर्थाने व्यतीत झाला.

उपाव ! समाजाच्या वैशिष्ट्यांपैकी सर्वात ठळक वैशिष्ट्य म्हणजे सुशिक्षित वर्गाची पराकोटीला गेलेली स्वार्थीवृत्ती, आपआपसातील मतभेद व एकीमेकांबद्दलची द्वेषभावना. सुशिक्षित लोकांनी निदान आपल्या भावी पिढीसाठी आपल्या समाजाचा मागील इतिहास विसरून चालणार नाही. कारण आपण आपल्या समाजाचा मागील इतिहास विसरलो तर आपण आपल्या समाजाची प्रगतीच करू शकणार नाही. तेव्हा सुशिक्षित बांधवांनी ही जाणीव ठेवावी की, आपल्याला जे वैभव लाभले आहे, ते केवळ डॉ. बाबासाहेबांच्या अथक परिश्रमामुळे... त्यांच्या पुण्याईनेच. एवढा तरी त्यांनी आपल्या मनात सदैव कृतज्ञतेचा भाव ठेवून इतरांना सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक बाबतीत प्रगतीच्या मार्गाने वाटचाल करण्यासाठी मदत करावी. त्यामुळे त्यांचे कल्याण होईल, त्यांची सर्वांगीण प्रगतीही होईल इतकेच नव्हे तर समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय या उच्चतम नैतिक मुल्यांवर आधारलेल्या एका उच्चतम मानवी संस्कृतीचा उदय होईल.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या १०० प्रकरणांची नोंद

**उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई**

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १३ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. रविवार आणि सोमवार(ता.१२ व १३) रोजी शोध पथकाने १०० प्रकरणांची नोंद करून ५२,४०० रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/- दंड) या अंतर्गत ३० प्रकरणांची नोंद करून १२,००० रुपयांची वसुली करण्यात आली.व्यक्तीने रस्ता,मोकळी जागा,फुटपाथ अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत १ प्रकरणाची नोंद करून रू.१०० रूपयाची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/- दंड) या अंतर्गत ११ प्रकरणांची नोंद करून रू.४,४०० चे दंड वसुली करण्यात आली. मॉल,उपहारगृहे,लॉजिंग बोर्डिंगचे हॉटेल, सिनेमाहॉल, मंगल कार्यालये, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत २ प्रकरणाची नोंद करून रू.४,००० रूपयाची दंड वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करून अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत १८ प्रकरणांची नोंद करून १५,५०० रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास २७ प्रकरणांची नोंद करून ५,४०० रुपयाचा दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास ११ प्रकरणांची नोंद करून रु. ११,००० चे दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. तसेच उपद्रव शोध पथकाने पथकाने धरमपेठ झोन अंतर्गत मे. वसंत अपार्टमेंट यांनी रस्त्यालगत बांधकामाचे साहित्य टाकल्या प्रकरणी रू.१०,००० दंड वसुल करण्यात आले. हनुमाननगर झोन अंतर्गत मे. साई मनिष बिल्डर यांनी रस्त्यालगत बांधकामाचे साहित्य टाकल्या प्रकरणी रू.१०,००० दंड वसुल करण्यात आले. धंतोली झोन अंतर्गत मे.मिनी मिरॅकल स्पीरीच्युल प्ले स्कुल यांनी विनापरवानगी विद्युत खांबावर जाहिरातीचे फलक लावल्या प्रकरणी रू. ५,००० दंड वसुल करण्यात आले.



## श्री संत जगनाडे महाराज मंडाळा तर्फे कोजागिरी कार्यक्रम संपन्न



**नागपूर:** श्री संत जगनाडे महाराज मंडळाकडून कोजागिरी कार्यक्रमाचे एम.पी. हॉल येथे आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी राजकुमार चकोले होते.माजी अध्यक्ष राजु दिपटे, माजी सचिव सुनिल किरपाने तसेच महेश भोले व अतुल दुधे उपस्थित होते. मंडळाचे अध्यक्ष कुलदीप खोबरागडे सचिव संजय मेहर आणि इतर सदस्य कार्यक्रमात सहभागी झाले होते. सर्व तेली समाज बांधवांनी या कार्यक्रमाला सहकार्य केलं. या कार्यक्रमांमध्ये. संताजी मंडळाचे सचिव आणि अध्यक्ष त्याचबरोबर संपूर्ण युवा कार्यकारणी व वरिष्ठांनी खूप मेहनत घेतली आणि कार्यक्रमाला आपलं वेळ आणि सफल बनवण्यासाठी प्रयत्न केलं.

# निरुपयोगी वस्तू स्वीकार केंद्राचे उद्घाटन

## स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी अंतर्गत मनपा मुख्यालयात ही विशेष केंद्र

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १३ :**
दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर घरोघरी होणाऱ्या स्वच्छतेनंतर निघणाऱ्या निरुपयोगी वस्तूंच्या कचऱ्याचा योग्य आणि सुरक्षित निपटारा करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेने 'स्वच्छ दिवाळी, शुभ दिवाळी' अभियान राबवित अत्यंत स्तुत्य पाऊल उचले आहे.

अभियानांतर्गत शहरातील विविध १०२ ठिकाणी निरुपयोगी वस्तू स्वीकार केंद्र' तयार करण्यात आले आहे. यातील सिव्हिल लाईन स्थित मनपा मुख्यालयात उभारण्यात आलेल्या निरुपयोगी वस्तू स्वीकार केंद्राचे मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते सोमवारी(ता.१३) उद्घाटन करण्यात आले.




उद्घाटन प्रसंगी मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. यांच्यासह मनपाचे मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, प्रमोद हिवसे, जितेश धकाते यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आयुक्तांनी सांगितले की, दिवाळीच्या काळात मोठ्या प्रमाणात जुने सामान, भंगार आणि ई-कचरा बाहेर पडतो. या कचऱ्यामुळे शहरात अस्वच्छता पसरू नये, याकरिता मनपाद्वारे हे विशेष अभियान राबविण्यात येत आहे.

तरी नागरिकांनी मनपाच्या केंद्रांवर मोठ्या संख्येत निरुपयोगी वस्तू दान कराव्यात असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यामधील प्राप्त झालेल्या वस्तूंचे वितरण गरजूलोकांना करण्यात येईल. तसेच प्राप्त कपड्यांतून कापडी पिशवी तयार केली जाणार आहे.

निरुपयोगी वस्तू स्वीकार केंद्र नागरिकांना त्यांच्या घरातील जुने फर्निचर, तुटलेले प्लास्टिकचे सामान, ई-कचरा आणि इतर निरुपयोगी वस्तू सोपवण्यासाठी हक्काचे ठिकाण बनेल. यामुळे हा कचरा रस्त्यावर किंवा कचराकुंडीत न टाकता थेट मनपाकडे सुपूर्द करता येईल, ज्यामुळे शहराची स्वच्छता टिकून राहण्यास मदत होईल. नागरिकांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेऊन दिवाळी खऱ्या अर्थाने स्वच्छ आणि शुभ करावी, असे आवाहन मनपा प्रशासनाने केले आहे.

### दानदात्यांना थँक यू स्टिकर्स

स्वच्छ दिवाळी शुभ दिवाळी अभियानाच्या अंतर्गत घरातील निरुपयोगी, पुनर्वापर करण्यायोग्य वस्तू, जुने कपडे, गादी, ई-कचरा, प्लास्टिकच्या वस्तू, जुनी पुस्तके, वर्तमानत्रांची रद्दी, काचेच्या वस्तू आदी साहित्य मनपाच्या स्वीकार केंद्रावर जमा करणाऱ्या नागरिकांना त्यांच्या घर व सोसायटीच्या दारावर लावण्यासाठी नागपूर महानगरपालिकेद्वारे थँक यूचे स्टिकर्स दिले जात आहेत.

# कर्मचे सेवा कार्य निरपेक्ष वृत्तीने : नितीन गडकरी

## अभिनेते विजय गोखले यांच्यासह २५ शिलेदारांचा गौरव



■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १३ :**
कर्म कल्याणकारी संस्थेने गरीब व शोषितांच्या सेवेला आपला धर्म मानले असून मागील २५ वर्षांपासून निरपेक्ष भावनेतून समाजकार्य करीत आहे.भविष्यातही संस्थेने असेच कार्य सुरू ठेवावे, असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

कर्म कल्याणकारी संस्थेच्या रौप्य महोत्सवी सोहळ्याचे आयोजन रविवारी साई सभागृह, शंकर नगर येथे करण्यात आले. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि सुप्रसिद्ध अभिनेते तसेच रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाचे अध्यक्ष विजय गोखले यांची विशेष उपस्थिती लाभली.

नितीन गडकरी यांच्या हस्ते संस्थेच्या कर्मजागर विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी विजय गोखले यांच्यासह संस्थेच्या २५ वर्षांच्या कार्यकाळात उल्लेखनीय कार्य करणा-या २५ शिलेदारांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.शरद निंबाळकर होते.गांधीवादी नेत्या लीलाताई चितळे, आमदार अभिजीत वंजारी, आमदार कृपाल तुमाने, माजी आमदार अशोक धवड, अतुल लोंढे, उद्योजक जयंत खळतकर, शैल जेमिनी, डॉ. नरेश गडेकर, डॉ. विनोद जयस्वाल, ज्ञानेश्वर रक्षक, प्रकाश जाधव, डॉ. डी. बी चौधरी यांची उपस्थिती होती.

या सोहळ्यात स्वरझल्लोष या मराठी आणि हिंदी गीतांच्या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपूर्वा थोरात यांनी केले.

# स्विमिंग पुलमध्ये शॉक लागुन तरुणाचा मृत्यु

■ **महासागर प्रतिनिधी**
**कन्हान, दि. १३ :**
कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत गाडेघाट ते जुनी कामठी रोड वरील राज फार्म हाउस येथे स्विमिंग पुलात शॉक लागुन ३४ वर्षीय तरुणाचा मृत्यु झाला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असुन स्विमिंग पूलमध्ये सुरक्षिततेच्या नियमांकडे दुर्लक्ष केल्याचा मुद्दा समोर आला आहे.

प्राप्त झालेल्या माहिती नुसार शनिवार ते रविवार (दि.१२) ऑक्टोंबर रोजी रात्री १२ बाजता च्या दरम्यान मृतक मयुर सुधाकर मांडवगडे (वय ३३) रा.रुक्मिणी नगर हुडकेश्वर, नागपुर हा आपल्या मित्र शुभम सुरेंद्र राघौरे (वय ३०) रा.विनायक नगर,हुडकेश्वर, नागपुर याचा सोबत मैत्रीणीच्या वाढदिवसाची पार्टी बनविण्याकरिता राज फार्म हाउस जुनी कामठी येथे गेले होते. काही वेळाने मृतक मयुर मांडवगडे हा स्विमिंग पुल मध्ये पोहण्याकरिता उतरला असता पाण्यात करंट लागला आणि तो पाण्यात आढवा पडला. त्याचा नाका, तोडांत पाणी गेल्याने त्याला खाजगी रुग्णालयात नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. सदर घटनेची माहिती कन्हान पोलीसांना मिळताच पोलीस निरीक्षक बैजयंती मांडवधरे, उपनिरीक्षक एकनाथ राठोड स्टॉपसह घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाचा पंचनामा करुन मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदना करिता उपजिल्हा रूग्णालय कामठी येथे नेण्यात आले. या प्रकरणी कन्हान पोलीसांनी शुभम राघौरे याचा तक्रारी वरून गुन्हा दाखल केला.

# कोन्होलीबारा आणि सावंगी देवळी अनुसूचित जमातीसाठी राखीव

**नागपूर :** नागपूर जिल्हा परिषदेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज सर्वांच्या नजरा लागलेल्या ५७ गटांच्या आरक्षण सोडतीकडे वळल्या होत्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन येथे पार पडलेल्या या सोडतीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असून नव्याने तयार झालेले कोन्होलीबारा आणि सावंगी देवळी हे दोन्ही गट अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.

जिल्हा परिषदेत मागील निवडणुकीत काँग्रेसचे वर्चस्व होते. मात्र यंदाच्या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. आजच्या आरक्षण सोडतीनंतर इच्छुक उमेदवारांच्या यादीवर मोठा प्रभाव पडणार असून अनेकांची गणितं बदलण्याची शक्यता आहे.

आरक्षण यादी (गटवार): अनुसूचित जमातीः बाडंबा, बोथीया पळोरा, मनसर, कोन्होलीबारा, सावंगी देवळी, सोनेघाट, महुली, नांद रत्नागिरीतील निवडणुका होणार चुरशीच्या, इच्छुक उमेदवारांची संख्या वाढू लागली. अनुसूचित जातीः दवलामेटी, चिचोली, चांदकापूर, मांढळ, बायगाव, टाकळघाट, येनवा, वेलतूर, इसासनी, पारडसिंगा इतर मागासवर्ग : तारसा, गोंधखैरी, धनला, माकरढोकळा, कोराडी, बोएकेडी फाटक, गोंडेगाव, केळवद, तेल कामठी, वाढोरा, राजोरा, रिधोरा, सिरसी, नागधन, बोकारा.

# डिंगडोह येथील मतदार याद्यांवर राष्ट्रवादी कडून आक्षेप

■ **महासागर प्रतिनिधी**
**हिंगणा, दि. १३ :**
डिगडोह नगर परिषदेने जाहीर केलेल्या मतदान यादीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून आक्षेप घेण्यात आला असून या मतदान याद्यांची परत पडताळणी करण्याची मागणी केली आहे.

आज राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी जिल्हा परिषद गटनेते दिनेश बंग, माजी सभापती बबन आव्हाळे, माजी उपसभापती उमेश राजपूत, माजी पंस. सदस्य आकाश रंगारी, माजी सरपंच विजय मेश्राम यांच्या नेतृत्वात मुख्याधिकारी रामेश्वर पंडागळे यांच्याकडे निवेदन सादर करण्यात आले.

नव्याने जाहीर करण्यात आलेल्या मतदार याद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता असून बऱ्याच प्रभागात अनेकांची नावे गहाळ झाली आहेत. एका प्रभागातील नावे दुसऱ्या प्रभागात समाविष्ट करण्यात आली आहेत. याची पळताळणी करून नव्याने याद्या जाहीर करण्याची मागणी यावेळी परिसरातील नागरिक करण्यात आली. यावेळी राजू हडपे, मोनू सिंग, अविनाश गोतमारे, बंटी भांगे, शैलेश राय, प्रेम कुंवर, गजानन पांडे, तानेश्वर चौधरी हजर होते.



# काटोल येथे बच्चू कडू यांच्या शेतकरी एल्गार सभेचे आयोजन

■ **महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. १३ :**
शेतकरी कर्जमाफी सहा विविध मागण्यांसाठी माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी काढलेली 'शेतकरी-शेतमजूर हक्क यात्रा' बुधवारी (१५ ऑक्टोंबरला) काटोल येथे धडकणार असून यानिमित्ताने काटोल येथील शारदा चौक येथे सायं.६ वाजता 'जाहीर शेतकरी एल्गार सभेचे' आयोजन केलेले आहे, या सभेला माजी गृहमंत्री अनिल देशमुख प्रामुख्याने उपस्थित राहणार असून सर्व समविचारी पक्षाचे नेते मंडळी व परिवर्तनवादी सामाजिक संघटनांचा देखील यामध्ये सहभाग राहणार आहे.

शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, मच्छीमार व मेंढपाळ बांधवांच्या न्याय मागण्यासाठी बच्चू कडू यांनी रायगडाच्या पायथ्यापासून तीन दिवस उपोषण करून सुरुवात केली होती. त्यानंतर गुरुकुंज (मोझरी) येथे सात दिवस अन्नत्याग आंदोलन केलेत, त्यावेळी राज्य सरकारने शेतकरी कर्जमाफी करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने बच्चू कडू यांनी उपोषण मागे घेतले होते परंतु शासनाने शब्द न पाळल्याने परत बच्चू कडू यांनी अमरावती ते यवतमाळ अशी १४० किमीची पदयात्रा काढली तरीसुद्धा सरकारला जाग आली नाही. यावेळी काटोल- नरखेड भागातील शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग आणि सर्वसामान्य नागरिकांशी बच्चू कडू सभेच्या माध्यमातून संवाद साधणार आहेत. जास्तीत जास्त शेतकरी बांधव आणि नागरिकांनी या सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन प्रहार जनशक्ती पक्षाचे काटोल- नरखेड विधानसभा प्रमुख दिनेश निंबाळकर, प्रहार दिव्यांग समितीचे तालुका प्रमुख अजय पांडे, कोंढाळी सर्कल प्रमुख निखिल पाटील, महिला आघाडी काटोल तालुका प्रमुख वंदना क्षिरसागर, महिला आघाडी नरखेड तालुका प्रमुख वर्षा ठोंबरे आदींनी केलेले आहे.

# आरसीएमच्या रूपांतरण यात्रेला नागपुरात उत्स्फूर्त प्रतिसाद

## सेवाभाव, आरोग्य जनजागृती आणि जीवनमूल्यांचा प्रसार

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. १३ :**
आरसीएमची देशव्यापी रूपांतरण यात्रा नागपूर येथे १३ ऑक्टोबर रोजी यशस्वीरीत्या संपन्न झाली. या कार्यक्रमाला स्थानिक समुदाय सदस्य आणि असोसिएट खरेदीदारांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.सध्या आरसीएमकडे देशभरात २० लाखांहून अधिक सक्रिय असोसिएट खरेदीदार आहेत आणि आगामी काळात ही संख्या वाढवण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

आरसीएमच्या २५व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित ही यात्रा १०० दिवसांची असून, ती १७,००० किमीचा प्रवास, ७५ शहरे आणि २५ प्रमुख कार्यक्रमांचा समावेश केला आहे. नागपूर भेटीदरम्यान रूपांतरण यात्रे ने आरसीएमच्या तीन मुख्य स्तंभांना स्वास्थ्य (आरोग्य), सेवा आणि संस्कार नव्याने अधोरेखित केले. नागपूरकरांनी रूपांतरण यात्राचे उत्साहात आणि जल्लोषात स्वागत केले.

नागपूर, येथे झालेल्या भव्य सोहळ्यात शेकडो लोकांनी सहभाग घेतला. दोन भागांमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला होता.




सकाळी आरोग्य आणि सेवेशी संबंधित उपक्रम राबविण्यात आले, तर संध्याकाळी उत्सव आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

हेल्थ झोन मध्ये न्युट्रिचार्ज आणि गॅम्मा उत्पादनांची श्रेणी सादर करण्यात आली, तसेच कीसोल पॅव्हिलियन मध्ये महिलांच्या वस्त्र आणि पादत्राणांचे आकर्षक प्रदर्शनी आयोजित करण्यात आले. फूड कोर्टमध्ये आरसीएमच्या स्वेच्छा आणि गुड डॉट ब्रँडअंतर्गत अनेक स्वादिष्ट आणि पौष्टिक पदार्थांची मेजवानी देण्यात आली. तसेच, एक विशेष रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

व्यवस्थापकीय संचालक सौरभ छाबड़ा म्हणाले, नागपूरमधील उत्स्फूर्त प्रतिसाद हा आमच्या लोकशक्तीवर आधारित चळवळीच्या सामर्थ्याचा आणि आत्म्याचा प्रत्यय आहे.

प्रत्येक कुटुंबाला चांगले आरोग्य, आर्थिक संधी आणि दृढ जीवनमूल्ये प्रदान करण्यासाठी कटिबद्ध आहोत असे मनाले, जेणेकरून स्त्रिया देखील पुरुषांसोबत नवभारताच्या निर्मितीत समान योगदान देऊ शकतील, असे व्यवस्थापकीय संचालक प्रियंका अग्रवाल म्हणाल्या. नागपूरमध्ये रूपांतरण यात्रेने निर्माण केलेला उत्साह आणि उमेद पाहून मला अभिमान वाटतो, असे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज कुमार यांनी आपले मत व्यक्त केले.

**महासागर**
**प्रभाग वार्ता**

# रस्त्यावरील तुटलेल्या चेंबरमुळे नागरिक त्रस्त



**प्रदीप पौनिकर,**
**नागपूर दि.१३**
प्रभाग क्र.५,कुंदनलाल गुप्ता नगर,रस्त्यावरील तुटलेल्या चेंबरमुळे नागरिकांना जाण्या-येण्यासाठी मोठा त्रास होत आहे. या समस्येचे त्वरित निराकरण होणे आवश्यक आहे जेणेकरून नागरिकांची सुरक्षा आणि सुविधा सुनिश्चित होईल. रस्त्यावरील चेंबर तुटलेले आहेत, ज्यामुळे पादचाऱ्यांना आणि वाहनांना धोका निर्माण झाला आहे.

तुटलेल्या चेंबरमुळे अपघात होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. तुटलेल्या चेंबरमधून सांडपाणी आणि घाण बाहेर येत असल्यामुळे रस्त्यावर अस्वच्छता निर्माण झाली आहे.तुटलेल्या चेंबरची त्वरित दुरुस्ती करावी किंवा नवीन चेंबर बसवावे. निवेदन सतरंजीपुरा झोन चे सहाय्यक आयुक्त यांना देण्यात आले समस्येचे निराकरण त्वरित करण्यात यावे अन्यथा हा मागणी पक्षाचा वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला . यावेळी प्रदिप पौनिकर, किशन निमजे, विजय नंदनवार, हेमराज कुंभारे, अनिल संभे, नानक धनवानी, आरती दलाल, संदीप साखरे, किशोर मौंदेकर, केतन ठाकूर, दिपक कोदरलीकर, सुनिल गजभिये, दिलीप रामटेककर, राजू दुधे, मनोज फटींग, क्षितिज वंजारी, निलकंड टाकलीकर, हरिहर पराते,कृष्णा पाठराबे, प्रिती पौनिकर, स्वाती तारवानी, अंशु बिरेवार, अमोल उके, संजू पटले, राजकुमार किटाळीकर, जयघोष कोटांगले, गोविंदा केळवदकर, चेतन निखारे, अरुण गुणारकर,बाबुराव निमजे व आम आदमी पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

**ओसीडब्लूच्या हलगर्जीपणामुळे**

# सेमिनरी हिल्स येथे होत आहेत दुर्घटना



**प्रभागमित्र,**
**नागपूर दि.१३**
सेमिनरी हिल्स येथील एका रहिवाशाच्या घरी ओसीडब्लूने रस्ता कापून नळ कनेक्शन दिले.रस्ता दुरुस्तीसाठी घर मालकाकडून पैसे घेण्यात आले पण रस्ता दुरुस्तच करण्यात आला नाही.याशिवाय पाण्याची पातळी बघण्यासाठी रस्त्याच्या वळणावरच ओसीडब्लूने मोठा खड्डा खोदून ठेवला आहे. तो पूर्णपणे न बुझविल्याने तेथे केवळ दगडे व मातीचा ढिगारा पडून आहे. यामुळे वाहनचालकांना खड्डा दिसत नसल्यामुळे रोजच्या दुर्घटना होत आहेत. याशिवाय एका ठिकाणी पाईपला लावण्यात येणारा वाल्ह उघडाच ठेवण्यात आला आहे. त्यावर चेंबर किंवा झाकण बसविण्याची गरज आहे.याबाबत ओसीडब्लूच्या संबंधितांना बोलावून या समस्येचे अवलोकन करून देण्यात आले. पण दोन महिने होऊनही याकडे लक्ष देण्यात आले नाही.

# जरीपटका मार्केटजवळील उघडी डी.पी. धोकादायक स्थितीत



**तातडीने उपाययोजनांची मागणी**

**प्रमोद जांभूळकर**
**नागपूर दि. १३**
प्रभाग ७ इंदोरा येथील जरीपटका मार्केटबस स्टॉप जवळ असलेली विद्युत वितरणाची डी.पी. (डिस्ट्रीब्युशन बॉक्स) सध्या पूर्णपणे खुली असून नागरिकांच्या आणि विशेषतः विद्यार्थ्यांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला आहे. या ठिकाणी दररोज शेकडो विद्यार्थी आणि स्थानिक नागरिक ये-जा करतात. खुल्या डी.पी.मुळे कधीही मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, स्थानिक रहिवासी सत्यजित लांजेवार, अतीम नेवारे, देवानंद पानतावणे, शैलेंद्र बेहेरे, संजय राऊत आणि भूपेश कांबळे यांनी वीज विभागाकडे तातडीने हस्तक्षेप करून डी.पी. सुरक्षित करण्याची मागणी केली आहे.या ठिकाणी लहान मुले, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक यांची नियमित वर्दळ असते. त्यामुळे लवकरात लवकर योग्य ती दुरुस्ती न झाल्यास संभाव्य अपघाताची जबाबदारी वीज विभागावर राहील, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

# पारडी अंडरपासमध्ये पाणी साचल्याने नागरिक त्रस्त



**अपघाताचा धोका**

**प्रमोद जांभूळकर,**
**नागपूर दि १३**
प्रभाग क्रमांक २३ वर्धमान नगर येथील पारडी चौक ते वाठोडा सीए रोडला जोडणाऱ्या अंडरपासमध्ये सतत पाणी साचत असल्याने स्थानिक नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या ठिकाणी पाणी निचऱ्याची सोय नसल्याने अंडरपासमध्ये साचलेल्या पाण्यामुळे चिखल तयार होत आहे, तसेच अपघाताचा धोका देखील निर्माण झाला आहे.

मनोज रक्षक यांनी सांगितले की, पाण्यातून गाड्या वेगात गेल्यावर पाणी उडून रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांच्या कपड्यांवर पडते, त्यामुळे कपडे खराब होतात. शिवाय, अंडरपासमध्ये पुरेसा लाईट नसल्याने अंधार असतो व त्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढते.अंडरपास हा शाळा, कॉलेजमधील विद्यार्थी, तसेच जवळील प्रजापती मेट्रो स्टेशनकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी महत्वाचा मार्ग आहे. त्यामुळे या समस्येचे गांभीर्य अधिकच वाढले आहे.स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे खालील मागण्या केल्या आहेत:पाणी निचऱ्यासाठी सक्षम ड्रेनेज व्यवस्था तयार करावी अंडरपासमध्ये योग्य प्रकाशयोजना करावी . अपघात टाळण्यासाठी स्पीड ब्रेकर लावावेत . हरीश सहारे, अल्विन गायकवाड, स्वप्निल समर्थ, निशांत श्रीवास्तव, बीरेंद्र बघेल, खुशाल बालबुधे, प्रितीन रंगारी, उमेश गिरडकर, अजय दत्ता, राजेश तेलरांधे, समीर सोनेकर आदी नागरिकांनी एकत्रितपणे प्रशासनाकडे मागणी केली आहे.नागरिकांची मागणी लक्षात घेता प्रशासनाने तातडीने योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.